मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई – ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

निवेदन

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई ही महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेली स्वायत्त संस्था आहे. मराठी भाषा विभागाच्या पत्राप्रमाणे (संदर्भ क्र. मसंस २०१६/प्र.क्र.११५/२०१६/भाषा-२, दि. ३ जानेवारी, २०१७) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे '**महाराष्ट्रातील मराठी संशोधन मंडळ/ संस्थांना अर्थसाहाय्य योजना**' कार्यान्वित करण्यात आली असून या योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील मराठी भाषा, साहित्य व संस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी काम करणाऱ्या महाराष्ट्रातील मान्यताप्राप्त मंडळ/ संस्थांना अर्थसाहाय्य करण्यात येते.

सदर प्रकल्पांतर्गत प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांना राज्य मराठी विकास संस्थेद्वारे नवभारत मासिकांचे ऑक्टोबर १९४७ ते सप्टेंबर २०१७ पर्यंतच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासाठी अर्थसाहाय्य करण्यात आले होते. याअंतर्गत सदर अंकांचे संगणकीकरण करण्यात आले असून **प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांनी हे अंक जतन केलेले असल्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत**.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर असणार नाही.

नवभारत

वर्ष २० वे] मे १९६७ [अंक ८

वार्षिक वर्गणी ९ रु.] [किरकोळ अंक १ रु.

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

प्राज्ञपाठशाळामंडळ वाई, यांचे मासिक

वर्ष विसावे | नवभारत | मे
अंक आठवा | | १९६७

(महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ पुरस्कृत)

संपादक-मंडळ

प्रा. वि. म. बेडेकर—प्रा. गोवर्धन पारीख का. संपादक

वार्षिक रु. ९ | सहामाही रु. ५ | अंकास रु. १

हे मासिक श्री. म. शं. साठे यांनी दी प्राज्ञ प्रेस, ३१५ गंगापुरी, वाई येथे छापून प्रा. वि. म. बेडेकर यांनी प्राज्ञपाठशाळामंडळ वाई यांचेकरिता तेथेच प्रसिद्ध केले.

पत्रव्यवहाराचा पत्ता : १ संपादकीय : कार्यकारी संपादक, 'नवभारत' मासिक,
'गणेश भुवन' २७६, तेलंग रोड, माटुंगा–मुंबई १९

२ व्यवस्थापकीय : व्यवस्थापक, 'नवभारत' मासिक,
C/o प्राज्ञ प्रेस, वाई (जि० सातारा)

३ चौकशी : श्री. वा. वि. कोनकर
१८८ एफ्, भीमराववाडी, मुंबई २
फोन नं. ३५४८५४

प्रा. शं. हि. केळशीकर

प्रतीकात्मक तर्कशास्त्राचा इतिहास

पाश्चिमात्य तर्कशास्त्राची नवी शाखा

प्रतीकात्मक तर्कशास्त्र हे पाश्चात्य तर्कशास्त्राचे एक नवे प्रशस्त दालन आहे. त्याची निर्मिती आणि रचना गेल्या शतकातल्या संशोधनकार्यामुळे झालेली आहे. या नव्या तर्कशास्त्रात संकलित केलेली ज्ञानसामुग्री निश्चितच मनोज्ञ आणि विचारप्रवर्तक आहे.

पाश्चात्य तर्कशास्त्र हे प्राचीन काळी जन्मास आलेले आणि परंपरेच्या वळणावर रुळावलेले असे एक जुने शास्त्र आहे. या पुरातन वृक्षास गेल्या शतकात काहीशा अनपेक्षितरीतीने एक नवी शाखा फुटून फोफावत गेली तिचेच नाव प्रतीकात्मक तर्कशास्त्र होय. तर्कशास्त्राच्या या नव्या शाखेने अल्पशा कालावधीत केलेली प्रगती नेत्रदीपक असून तिच्या ठिकाणी खेळणारे चैतन्य कौतुकास्पद आहे. या शास्त्रशाखेमुळे संशोधनाचे एक नवे क्षेत्र तर उपलब्ध झालेले आहेच. परंतु एकंदर पाश्चात्य तर्कशास्त्राचे स्वरूपही तिच्यायोगे पार बदलून गेलेले आहे.

या नव्या तर्कशास्त्राने तर्कशास्त्रीय ज्ञानभांडारात जी भर टाकलेली आहे तिचे महत्त्व जाणून घेण्यासाठी आपणास पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाच्या व्यापक प्रांताकडेच दृष्टी वळवावी लागते. या तर्कशास्त्राच्या चिकित्सक विवेचनात प्रकट झालेली काही नवीन तत्त्वे इतकी मूलगामी स्वरूपाची आहेत की त्यांच्याद्वारे एकंदर ज्ञानशास्त्रीय आणि अध्यात्मशास्त्रीय समस्यांवर एक नवाच प्रकाश पडल्याचा प्रत्यय येतो. प्रतीकात्मक तर्कशास्त्राने प्रदान केलेल्या बहुमोल देणगीमुळे केवळ पाश्चात्य तर्कशास्त्रावरच नव्हे तर पाश्चात्य तत्त्वज्ञानावरही क्रांतिकारक परिणाम घडून आले आहेत.

तर्कशास्त्राचे उद्दिष्ट : प्रतीकांची उपयुक्तता

तर्कशास्त्र हे विचारांची, युक्तिवादांची, अनुमानपद्धतींची चिकित्सा करणारे शास्त्र आहे. उचित विचारसरणीची लक्षणे कोणती ? उपलब्ध असलेल्या पुराव्यावरून काढलेले निष्कर्ष योग्य आहेत की अयोग्य आहेत ते ठरवावयाचे कसे ? युक्तिवादांचे परीक्षण करतेवेळी कोणते निकष वापरावयाचे असतात ? तर्कदोष केव्हा आणि कसे उद्‌भवतात ? यासारख्या प्रश्नांची उत्तरे देण्याचा हे शास्त्र प्रयत्न करते. नानाविध युक्तिवादांचे परीक्षण आणि विश्लेषण करून विचारांचे मौलिक नियम शोधून काढणे हे या शास्त्राचे आद्य प्रयोजन आहे. याच उद्दिष्टाने प्रेरित होऊन प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञानी ॲरिस्टॉटल (इ. स. पू. ३८४–३२२) याने पाश्चात्य तर्कशास्त्राची मुहूर्तमेढ रोवली. सांप्रतकालीन प्रतीकात्मक तर्कशास्त्रदेखील त्याच उद्दिष्टाचा पाठपुरावा करते. ॲरिस्टॉटलने आपल्या तर्कशास्त्रास "विश्लेषणात्मक शास्त्र" (Analytics) असे नाव दिले. विचारपद्धतींची आणि युक्तिवादाची विश्लेषणात्मक मीमांसा करणे हे कार्य त्यास अभिप्रेत होते. आधुनिक प्रतीकात्मक तर्कशास्त्रदेखील अशा प्रकारची युक्तिवादाची विश्लेषणात्मक चिकित्सा करण्यात व्यापृत झालेले आहे. विश्लेषणाच्या कामी, खास तयार केलेल्या प्रतीकांचा, खुणांचा, चिन्हांचा वापर करणे अत्यंत सोईचे आणि हिताचे असते. यास्तव प्रतीकात्मक तर्कशास्त्रज्ञ हे आपल्या विवेचनात तार्किक प्रतीकांचा कटाक्षाने आणि सढळ हाताने उपयोग करतात. प्रतीकांचा अव्याहत वापर करणे हे या तर्कशास्त्राचे खास वैशिष्ट्य असल्याकारणाने त्यास "प्रतीकात्मक तर्कशास्त्र" असे नाव प्राप्त झालेले आहे.

तर्कशास्त्रीय चिकित्सेत प्रतीकांचा वापर करणे ही काही नवीन गोष्ट नाही. प्राचीन तर्कशास्त्रज्ञदेखील तार्किक विवेचनात प्रतीके वापरीत असत. ॲरिस्टॉटलच्या तर्कशास्त्रात संविधानांची मांडणी प्रतीकाच्या मदतीने केलेली आहे, हे जरी खरे असले तरी जुन्या तर्कशास्त्रात प्रतीके अल्प प्रमाणातच वापरलेली आहेत, यात शंका नाही. त्यामानाने आधुनिक तर्कशास्त्रान तार्किक प्रतीकांची भाषा कितीतरी विकसित केलेली आहे. गणितशास्त्रात जसा संख्यापरिमाणदर्शक

प्रतीकांचा वापर मोठ्या प्रमाणावर करण्यात येतो. तसाच प्रतीकात्मक तर्कशास्त्रात तार्किक प्रतीकांचा वापर केलेला दिसून येतो. आधुनिक तर्कशास्त्रीय संशोधनाच्या समृद्धीसोबत तार्किक प्रतीकांची निर्मितीही वाढत गेली. नवी तार्किक चिन्हे व प्रतीके अवतीर्ण होऊन, विश्लेषणाचे पाते अधिक धारदार बनले. पूर्वी संविधानामधली " उद्देश्य-संयोजक-विधेय " अशा आकाराची केवल विधानेच सहसा प्रतीकांच्या स्वरूपात मांडलेली असत; आणि ती विधाने जरी जवळ जवळ लिहिलेली असत तरी एकत्र जोडून, लिहिलेली नसत. ही जुनी प्रथा मोडून दोन किंवा अधिक केवल विधाने एकत्र जोडून मिश्र विधाने तयार करण्याचे आणि ती प्रतीकांच्या रूपाने मांडण्याचे नवे धोरण आधुनिक प्रतीकात्मक तर्कशास्त्राने अवलंबिले. अशा प्रकारे विधानांविधानांमधले संबंध नव्या तार्किक चिन्हांच्या भाषेत दर्शविण्याची नव्या तर्कशास्त्राने योजिलेली युक्ती अतिशय फलदायक ठरली. तिच्या योगे पाश्चात्य तर्कशास्त्रास खरी खुरी प्रगती करण्याची दिशा व प्रेरणा सांपडली.

प्रतीकात्मक तर्कशास्त्राचे गणितविज्ञानाशी नाते

या नवोदित प्रतीकात्मक तर्कशास्त्राचे गणितविज्ञानाशी उघडच जिव्हाळ्याचे नाते आहे. या तर्कशास्त्राचा उदय आणि विकास गणितशास्त्रीय संशोधनाशी निगडित झालेला आहे. या दोन्ही शास्त्रांची तंत्रे आणि कार्यपद्धती समान आहेत. या साधर्म्यापायी हे नवे तर्कशास्त्र " गणितरूप तर्कशास्त्र " या नावानेही संबोधिले जाते. या तर्कशास्त्राचे परिशीलन करतेवेळी, गणितविज्ञानांतर्गत तर्कशास्त्र आणि तर्कशास्त्रांतर्गत गणितविज्ञान यांचे मनोरम व उद्बोधक दर्शन होते.

तर्कशास्त्र आणि गणितविज्ञान या दोहोंमधली आत्यंतिक जवळीक पूर्वकालीन विचारवंतांच्या ध्यानात तितक्याशा पूर्णांशाने आली नव्हती ही एक ऐतिहासिक वस्तुस्थिती आहे. तसे पाहिले तर सर्व विज्ञानशास्त्रांमध्ये गणितविज्ञान हे तर्कनिष्ठ बुद्धीला समाधान देण्याच्या बाबतीत अग्रेसर आहे. त्याच्या कार्यपद्धती पूर्णपणे तर्कशास्त्राच्या कसोटीस उतरतात. सर्व प्रमेये निःसंदिग्धरीतीने सिद्ध केलेली असून, सिद्धतेचे प्रत्येक पाऊल संशयातीत खात्रीनिशी टाकलेले असते. या कारणांपायी गणितविज्ञानाची महती रीने देकार्त् (१५९६-१६५०), बेनेडिक्ट् स्पिनोझा (१६३२-१६७७) यांच्यासारख्या श्रेष्ठतम तत्त्ववेत्त्यांनी पूर्वीच गायिलेली आहे; आणि अध्यात्मशास्त्राच्या विवेचनातदेखील गणितविज्ञाननिष्ठ विचारसरणीचा अवलंब करणे इष्ट आहे अशी शिफारस त्यांनी मुक्त कंठाने केलेली आहे. हे जरी खरे असले तरी तर्कशास्त्राचे गणितविज्ञानाशी जे घनिष्ट एकात्मतेचे नाते आहे त्याचा संपूर्ण तपशील त्या थोर विचारवंतांना अवगत झालेला नव्हता यात शंका नाही. पाश्चिमात्य विचारवंतांना या दोन शास्त्रांमधल्या परस्परसंबंधाची संपूर्ण आणि यथार्थ कल्पना यावयास काही शतकांचा प्रदीर्घ कालावधी लागला ही घटना जितकी आश्चर्यकारक तितकीच वास्तव आहे.

गतकाळात गणितविज्ञान आणि तर्कशास्त्रही दोन मुळी भिन्न स्वतंत्र शास्त्रे आहेत असेच सर्वसाधारणपणे मानले जाई. गणितविज्ञानाचा संबंध मुख्यतः निसर्गशास्त्रीय संशोधनाशी जोडण्यात येई; आणि तर्कशास्त्राचा संबंध ॲरिस्टॉटलच्या ग्रीक भाषेशी जोडला जाई. विज्ञानाचा अभ्यास भाषेच्या अभ्यासापासून जितका दूर असतो तितके तर्कशास्त्र गणितविज्ञानापासून दूर राहिले. परंपरागत दृष्टिकोन आणि पूर्वग्रह यांच्या प्रभावामुळे या दोन शास्त्रामधला दुरावा शतकानुशतके कायम राहिला. गेल्या शतकात मात्र, परंपरेला फाटा देऊन, तर्कशास्त्रज्ञांनी आणि गणितज्ञांनी आपापल्या शास्त्रांचे नव्याने अध्ययन सुरू केले. तेव्हा त्यांना या दोहोमधली एकात्मता सूर्यप्रकाशासारखी स्पष्ट दिसू लागली. दोन्ही शास्त्रांची मूलतत्त्वे आणि कार्यपद्धती समान असल्याचे आढळून आले आणि त्यांच्यामधली विभाजनरेषा ठळकपणे आखून दाखविणे दुरापास्त होऊन बसले. तर्कशास्त्र हे अधिक गणितस्वरूप बनले; व गणितविज्ञान हे अधिकतर तर्कांकित झाले. आणि, या दोन शास्त्रांच्या संगमावर एका नव्या संशोधन-क्षेत्राचा, प्रतीकात्मक तर्कशास्त्राचा, उदय झाला. या नवीन शास्त्राची उभारणी करण्याच्या कामी, तर्कशास्त्रज्ञांसोबत गणितशास्त्रज्ञांचाही हातभार लागला हे निराळे सांगावयास नकोच.

जुन्या तर्कशास्त्राची सदोषता

जुन्या शास्त्रांच्या सदोषतेची तीव्र जाणीव हीच बहुधा नव्या शास्त्रांच्या निर्मितीस कारणीभूत होते.

प्रतीकात्मक तर्कशास्त्राचा इतिहास

ॲरिस्टॉटलप्रणीत पाश्चात्य तर्कशास्त्र हे काही परिपूर्ण, निर्दोष शास्त्र नव्हते. त्याच्या उणीवा आणि मर्यादा अधूनमधून उघडकीला येत. उदाहरणार्थ, सोळाव्या शतकात जेव्हा पदार्थविज्ञानादी भौतिक शास्त्रांची वाढ होऊ लागली तेव्हा त्या शास्त्रांमध्ये चालू झालेल्या विचार-मंथनास सुयोग्य तार्किक मार्गदर्शन मिळणे जरूरीचे भासू लागले. परंतु त्या प्रकारचे मार्गदर्शन जुन्या तर्कशास्त्राकडून मिळत नव्हते. या वस्तुस्थितीची जाणीव फ्रँसिस बेकन (१५६१–१६२६) आदी निसर्ग-विज्ञानाच्या पुरस्कर्त्यांना होऊन त्यांनी साहजिकच जुन्या तर्कशास्त्रावर टीका करावयास प्रारंभ केला. ॲरि-स्टॉटलप्रणीत तर्कशास्त्र हे वैज्ञानिक विचक्षणेला, भौतिक शास्त्रांच्या प्रगतीला, मुळीच उपयोगी नाही, अशी त्यांनी तक्रार मांडली, आणि वैज्ञानिक विचारसरणीला उपयुक्त ठरेल अशा नव्या तर्कशास्त्राची आवश्यकता प्रतिपादिली. त्यांनी केलेल्या टीकेचा सुयोग्य परिणाम होऊन, जुन्या तर्कशास्त्राहून निराळे असे, वैज्ञानिक विचारसरणींचा परामर्श घेणारे, वैगमनिक तर्कशास्त्र लवकरच आकारित झाले.

याच प्रकाराची गेल्या शतकात पुनरावृत्ती झाली. भौतिक शास्त्रांच्या बरोबरीने गणितविज्ञानाचाही विकास होऊ लागला. त्याच्या निरनिराळ्या शाखात नवे तत्त्वशोधन होऊ लागले. अविवाद्य आणि संशयातीत म्हणून गणल्या गेलेल्या मूलतत्त्वांची नव्याने चिकित्सा करण्यात येऊ लागली. "अंक", "वर्ग", "संबंध", "विधान", आदि पायागत संकल्पनांच्या अर्थाची नव्याने छाननी होऊ लागली. या नव्या विश्लेषणाच्या कार्यात पुन्हा एकवार जुने तर्कशास्त्र निरुपयोगी अस-ल्याचे जाणवू लागले. त्या शास्त्राच्या न्यूनतेपायी निर्माण होणारे असमाधान दिवसेदिवस वाढत गेले. तात्त्विक विवेचनास धार चढून, जुन्या तर्कशास्त्राच्या उणीवांवर टीकेचे घाव पडू लागले. परिणामी, गणित-शास्त्रास पूरक, आणि जुन्या तर्कशास्त्रापेक्षाही अधिक मूलगामी, अशा नव्या प्रतीकात्मक तर्कशास्त्राची रचना होऊ लागली.

या नव्या तर्कशास्त्राच्या पुरस्कर्त्यांनी ॲरिस्टॉटलच्या तर्कशास्त्रावर जी प्रखर टीका केली तिच्यामुळे हे नवे तर्कशास्त्र जुन्या तर्कशास्त्रास विरोधी व विघातक असावे, असाच प्रथम भास होऊ लागला. परंतु हा भास अना-ठायी होता. वास्तविक, नव्या तर्कशास्त्राचे जुन्या तर्क-शास्त्राशी वैर असण्याचे काहीच कारण नाही. एकाच शास्त्राच्या या दोन शाखा आहेत. त्या एकमेकींपासून पूर्णपणे तुटून अलग अलग पडून रहाण्याचे मुळीच प्रयोजन नाही. सोळाव्या शतकात बेकनने पुरस्कारिलेले "विगमनशास्त्र" हे ॲरिस्टॉटलच्या तर्कशास्त्रासोबत गुण्यागोविंदाने नांदत आहे; तद्वतच चालू शतकातले प्रतीकात्मक तर्कशास्त्र नांदावयास हरकत नाही. ज्याप्रमाणे गणितविज्ञानाच्या व्यापक प्रांतात पर्यायी प्रणाली वास करीत असलेल्या दिसतात त्याचप्रमाणे तर्कशास्त्रा-च्याही प्रांतात विविध प्रणाली दिसू लागल्यास त्यात आश्चर्य करण्यासारखे काही नाही. शिवाय असे की प्रतीकात्मक तर्कशास्त्र हे जुन्या तर्कशास्त्राहुन स्वरूपाने भिन्न असले तरी ते त्यास तत्वतः व्याघाती मुळीच नाही. रीमनच्या भूमितीची मूलतत्त्वे युक्लिडच्या भूमितीच्या मूलतत्त्वांस बरोबर व्याघाती आहेत तशी प्रतीकात्मक तर्कशास्त्राची मूलतत्त्वे ॲरि-स्टॉटलच्या तर्कशास्त्रास निश्चितच विरोधी नाहीत. ॲरिस्टॉटलच्या तर्कशास्त्रास संमत असलेले विचारांचे मौलिक नियम प्रतीकात्मक तर्कशास्त्राने झिडकारलेले नाहीत. प्रतीकात्मक तर्कशास्त्रात विचारांचे किती-तरी नवे नियम प्रतिपादन केलेले आहेत. त्यांचा ॲरिस्टॉटलच्या तर्कशास्त्रात नामनिर्देश नसला तरी ते ॲरिस्टॉटलदत्त विचार–नियमास यत्किंचितही बाधक नाहीत. एकूण, या दोन तर्कशास्त्रात भिन्नता असली तरी विरोध खासच नाही. वास्तविक, दोहोंचे उद्दिष्ट एकच असून, ॲरिस्टॉटलने दर्शविलेल्या संशोधनाच्या दिशेनेच प्रतीकात्मक तर्कशास्त्र वाटचाल करीत आहे असे या नव्या तर्कशास्त्राच्या पायिकांचे प्रामाणिक मत आहे.

काळाच्या प्रवाहात पूर्णपणे स्थिर असे काहीच रहात नाही. मानवी ज्ञानाच्या प्रत्येक शाखेत काल-मानानुसार काहीना काही उलथापालथ ही होतच असते. ॲरिस्टॉटलचे तर्कशास्त्र पाश्चात्य जगात पारं-परिक तर्कशास्त्र म्हणून रूढ झाले असे म्हटले जाते. परंतु वस्तुतः ॲरिस्टॉटलचे तर्कशास्त्र पूर्णपणे अवि-चलित, अपरिवर्तनीय अशा अवस्थेत कधीच राहिले नाही. त्यात वारंवार फेरबदल होतच होते. अधूनमधून

थोडीफार नवी भर पडतच होती. शतकांमागून शतके उलटत असताना, ॲरिस्टॉटलच्या लेखणीतून उतरलेले मूळचे तर्कशास्त्र जसेच्या तसे अक्षत अवस्थेत टिकून राहाणे शक्यच नव्हते. ल्यूकाझीविच् सारख्या तर्कशास्त्राच्या इतिहासज्ञांनी, मूळचे ॲरिस्टॉटलप्रणीत तर्कशास्त्र हे मागाहून पारंपरिक म्हणून प्रस्थापित झालेल्या पाश्चात्त्य तर्कशास्त्राहून कसे भिन्न होते याचे मार्मिक दिग्दर्शन केलेले आहे.

तर्कशास्त्रीय अभ्यासाची नवी दिशा

प्रतीकात्मक तर्कशास्त्राचा उदय ही पाश्चात्य तर्कशास्त्राच्या इतिहासामधली एक क्रांतिकारक घटना होय. हे नवे तर्कशास्त्र जुन्या पारंपरिक तर्कशास्त्राहून उघडच भिन्न आहे. नवीन अभ्यासकाला तर प्रथमभेटीत या दोहोंमधली तफावत पराकोटीची असल्याचा भास होतो. ज्याप्रमाणे माध्यमिक शाळेतल्या विद्यार्थ्याला अंकगणित आणि बीजगणित या दोहोत महदंतर असल्यासारखे प्रथम प्रथम वाटते: परंतु अधिक परिचयाअंती ही दोन गणिते मूलतः अभिन्न असल्याची त्यास ओळख पटते. त्याचप्रमाणे पारंपरिक आणि प्रतीकात्मक तर्कशास्त्रांच्या अभ्यासकाला प्रथमदर्शनी या दोहोमधली भिन्नता विशेषत्वाने जाणवते : परंतु अधिक परिचयानंतर मात्र त्यांच्या भिन्नतेची जाणीव कमी होत जाऊन त्यांच्या एकरूपतेचाच अधिकाधिक प्रत्यय येतो.

या दोन्ही तर्कशास्त्रांचा अभ्यासविषय मुळात एकच आहे. परंतु अभ्यासाचा विषय जरी एकच एक असला तरी त्याचे आकलन भिन्न भिन्न अभ्यासकांना भिन्नभिन्न पातळ्यावरून, वेगवेगळ्या दृष्टीकोनातून, करता येणे शक्य असते. अभ्यासविषयक चिकित्सेचा प्रारंभ आणि शेवट कुठे करावयाचा ? अध्ययनाच्या मार्गातले कोणते टप्पे अधिक महत्त्वाचे आणि कोणते कमी महत्त्वाचे आहेत ? संशोधनाचे उत्खनन कोणत्या जागी करण्याची आवश्यकता आहे ? समस्यांची निरगाठ कुठे आणि कशी उकलावयाची ? इत्यादी प्रश्नांची उत्तरे निरनिराळ्या दृष्टिकोनातून निरनिराळी देता येतात. अभ्यासाच्या निरनिराळ्या पातळ्यांवर अभ्यासाच्या आशयातही फरक पडतो.

प्रतीकात्मक तर्कशास्त्र आणि पारंपरिक तर्कशास्त्र या दोहोंमधली तफावत याच स्वरूपाची आहे. आपल्या अभ्यासवस्तूकडे वेगवेगळ्या दृष्टिकोनातून पाहिल्यामुळे त्यांच्या विवेचनाच्या तपशीलात महदंतर पडलेले आहे. उदाहरणार्थ, तार्किक पदांचे विविध प्रकार बारकाईने अभ्यासिणे हे पारंपरिक तर्कशास्त्रास जितके आवश्यक वाटते तितके प्रतीकात्मक तर्कशास्त्रास वाटत नाही. उलट तार्किक विधानांचे विविध प्रकार आणि परस्परसंबंध यांची विस्तृत चिकित्सा करण्याची इष्टता प्रतीकात्मक तर्कशास्त्रास जाणवते तशी पारंपरिक तर्कशास्त्रास जाणवत नाही. त्याचप्रमाणे केवल–विधानात्मक संविधान हे श्रेष्ठ प्रतीचे अनुमान होय असे पारंपरिक तर्कशास्त्र मानते, उलट, ते संविधान म्हणजे अनुमानाच्या अथवा अभिप्रायाच्या अनेक प्रकारांपैकी एक असून त्यास श्रेष्ठ प्रतीचे मानण्याची जरूरी नाही असे प्रतीकात्मक तर्कशास्त्रास आढळून आले आहे. तसेच पारंपरिक तर्कशास्त्रात विचारांच्या तीन मौलिक नियमांना अग्रपूजेचा मान दिला जातो. परंतु प्रतीकात्मक तर्कशास्त्रात या तीन विचारनियमांचे स्थान गृहीत धरलेल्या आद्य तत्त्वांचे जागी नसून सिद्ध केलेल्या प्रमेयांच्या मालिकेत असते, असे दर्शविले जाते.

जे शास्त्र आपल्या अभ्यासविषयाकडे नव्या दृष्टिकोनातून पाहू शकते त्याचेच पाऊल प्रगतिपथावर पडते. पाश्चात्य तर्कशास्त्राच्या बाबतीत नेमके हेच घडले; आणि त्यामुळे या शास्त्रास सध्या ऊर्जितावस्था प्राप्त झाल्याचे दिसून येते. जादूच्या गुहेत सापडावी तशी अपूर्व ज्ञानसंपदा या शास्त्राच्या पदरात पडलेली आहे. काटेकोर परिभाषेच्या अभावी जे तर्कशास्त्रीय सिद्धांत पूर्वी व्यक्त करणे अशक्यप्राय होते ते आता अनुरूप प्रतीकांची परिभाषा उपलब्ध झाल्याकारणाने प्रतिपादन करता येऊ लागले आहेत. जुन्या तर्कशास्त्रीय तत्त्वांमध्ये नवा अर्थ दिसू लागला आहे. कोणत्याही निवेदनातली संदिग्धतेची स्थळे सुकरतेने दर्शविता येऊ लागली आहेत. युक्तिवादांची वैगुण्ये अचूकपणे हेरता येऊ लागली आहेत. तर्कशास्त्रीय आणि संबंधित संशोधनाची क्षितिजे रुंदावलेली असून, प्रगतीच्या नव्या वाटा सापडलेल्या आहेत. शतकानुशतके निश्चेष्टवत् पडलेल्या विचारांच्या मूलगामी शास्त्रामध्ये नव्या चैतन्याचे वारे खेळू लागले आहे.

प्रतीकात्मक तर्कशास्त्राचा संकल्पक

लाइब्निट्झ (१६४६–१७१६) हा थोर जर्मन तत्त्ववेत्ता प्रतीकात्मक तर्कशास्त्राचा आद्य संकल्पक होय.

त्याच्या हातून प्रत्यक्षात या नव्या तर्कशास्त्राची रचना झाली नाही. तथापि या शास्त्राच्या शक्यतेची सुस्पष्ट कल्पना त्याच्या मनात आकारित झालेली होती. गणित-विज्ञानात आपण ज्याप्रमाणे नानाविध संख्या पद्धतशीर रीतीने हाताळतो त्याचप्रमाणे तर्कशास्त्राच्या मदतीने विज्ञानाच्या नानाविध संकल्पना हाताळता आल्या पाहिजेत अशी त्याची धारणा होती. तदनुसार शास्त्रीय ज्ञानाच्या वृद्धीसाठी त्याने आपल्या समकालीनांपुढे दोन–कलमी योजना मांडली, ती अशी : (१) विज्ञानाची एक स्वतंत्र भाषा तयार करणे. (२) विचारांचे एक "कलनशास्त्र" रचणे.

लाइबनिट्झच्या मते, सर्व शास्त्रज्ञांना समान अशी विज्ञानाची एकच एक विश्वव्यापी भाषा असणे अतिशय उपयुक्त आणि हितप्रद ठरेल. राष्ट्राराष्ट्रांमधल्या सीमा जिला अटकवू शकत नाहीत अशी एक सर्वगामी विज्ञानाची भाषा जर प्रचारात आली तर तिच्या माध्यमातून देशोदेशींच्या शास्त्रज्ञांना परस्परांमध्ये अव्याहत दळणवळण राखता येईल. शास्त्रीय कल्पनांच्या मार्गामधले भाषाभिन्नत्वाचे अडथळे दूर होऊन त्या कल्पनांचा सर्वत्र मुक्त संचार होऊ लागेल. अशाप्रकारे वैज्ञानिक ज्ञानाचा अनिर्बंध प्रसार होऊन शास्त्रीय संशोधनास अधिक चालना मिळेल. अर्थात् या सर्वगामी वैज्ञानिक भाषेची मुळाक्षरे खास तयार केली पाहिजेत. प्रचलित भाषांच्या मुळाक्षरांहून ती भिन्न असली पाहिजेत. प्रचलित भाषांची मुळाक्षरे ही केवळ उच्चारदर्शक, आणि अन्यथा अर्थविहीन, अशी आहेत. परंतु आपणास इष्ट असलेल्या विश्वव्यापी भाषेची मुळाक्षरे ही विचार–सूचक अथवा कल्पना निर्देशक असली पाहिजेत. विज्ञानाच्या प्रत्येक कल्पनेचे एक स्वतंत्र प्रतीक अथवा चिन्ह रचलेले असावे शास्त्रीय विचाराचा प्रत्येक कण एकेका स्वतंत्र प्रतीकात बंदिस्त केला पाहिजे. म्हणजे या प्रतीकांसोबत इष्ट तो शास्त्रीय विचार अथवा वैज्ञानिक कल्पना आपणांस डोळ्यांपुढे आणता येईल. सिद्धांतांचे प्रतिपादन आणि विवरण स्वच्छ व सुस्पष्टरीतीने करता येईल. संकल्पनांवर सुयोग्य आणि अखंड नियंत्रण ठेवता येईल. शास्त्रशुद्ध विचारसरणीस आणि वैज्ञानिक विचक्षणेस प्रचलित भाषांमधले शब्द उपकारक ठरत नाहीत ही नित्य परिचयाची गोष्ट आहे. या प्रचलित भाषांमधल्या शब्दांचा आपण दैनंदिन जीवनात नानाविध प्रसंगी वापर करतो; त्यामुळे त्यांना हरतऱ्हेचा व्यावहारिक आणि भावनात्मक अर्थ चिकटलेला असतो. साहजिकच ते शब्द संदिग्ध, अस्थिर, निसटत्या आशयाचे बनलेले असतात. अशा शब्दांचा सूक्ष्म, काटेकोर विश्लेषणात्मक विवेचनास मुळीच उपयोग होत नाही. शास्त्रीय विचारसरणीत असले शब्द टाळणेच इष्ट असते. विज्ञानाच्या भाषेत निःसंदिग्ध अर्थवाही आणि रेखीव कल्पनांचा बिनचूक निर्देश करणारी अशी प्रतीके, चिन्हे, अक्षरे असणे जरूरीचे आहे, असे लाइबनिट्झचे म्हणणे होते.

तसेच वैज्ञानिक विचारसरणीच्या हितासाठी शास्त्रीय संकल्पनांचे एक बीजगणित अथवा कलनशास्त्र रचले पाहिजे अशी त्याची सूचना होती. बीजगणितात ज्याप्रमाणे विविध संख्यांची गुंफण, प्रतीकांच्या व चिन्हांच्या मदतीने, अनंत प्रकारांनी केलेली असते त्याचप्रमाणे विचारांच्या कलनशास्त्रात, शास्त्रीय संकल्पनांची गुंफण अनुरूप प्रतीकांच्या मदतीने नाना तऱ्हांनी कशी करावी यांचे दिग्दर्शन केलेले असावे. म्हणजे या कलनशास्त्राद्वारे शास्त्रीय संकल्पनांचे विश्लेषण आणि संकलन शिस्तबद्ध पद्धतीने कसे करावे याचे जिज्ञासू विचारवंतास वस्तुनिष्ठ पाठ मिळतील; आणि वैज्ञानिक विचारसरणी तर्ककठोर मार्गावरून लीलेने धावू लागेल. शास्त्रीय संकल्पनांची सुरेख छानणी आणि वैज्ञानिक समस्यांची सुसंबद्ध चिकित्सा करण्याचे कार्य कितीतरी प्रमाणात सुकर होईल. ज्याप्रमाणे कितीही गुंतागुंतीची आकडेमोड असली तरी ती आपणास गणितविज्ञानाच्या मार्गदर्शनानुसार निर्वेधपणे सोडविता येते त्याचप्रमाणे वैज्ञानिक समस्यांची गुंतागुंत कितीही जटिल असली तरी ती निःसंदिग्धरीतीने उकलण्याचे कामी वैचारिक कलनशास्त्राचा उपयोग होण्यासारखा आहे. शास्त्रीय विचारांचे सूक्ष्म तरंग टिपणे, विविध कल्पनांमधले बारीकसारीक भेद विशद करणे, जटिल संकल्पनांची परस्परसंबद्ध परंतु रेखीव घटकात फोड करणे इत्यादी बौद्धिक व्यापार करण्याचे बाबतीत वैचारिक कलनशास्त्राचे मार्गदर्शन अजोड आणि अमोल ठरेल असा विश्वास लाइबनिट्झने व्यक्त केला.

वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षी लाइब्निट्झन आपली वैज्ञानिक भाषा आणि वैचारिक कलनशास्त्र यांजविषयींची वरील योजना मांडली. या योजनेला सविस्तर मूर्त स्वरूप देण्याचे कार्य मात्र त्याच्या हातून घडले नाही. ते जर त्याच्या हातून घडले असते तर प्रतीकात्मक तर्कशास्त्राचा उदय दीडदोन शतकांपूर्वीच झाला असता. परंतु तसा योग जुळून आला नाही; आणि या शास्त्राच्या रचनेचे कार्य लांबणीवर पडले.

विधेयपदांचे परिमितीकरण

लाइब्निट्झच्या योजनेनंतर प्रतीकात्मक तर्कशास्त्राच्या प्रादुर्भावास अप्रत्यक्षरीत्या हितावह ठरलेली गोष्ट म्हणजे विल्यम हॅमिल्टन् (१७८८-१८५६) या स्कॉटिश तत्त्ववेत्त्याने मांडलेली तार्किक विधानांमधल्या विधेयपदांचे परिमितीकरण करण्याची कल्पना ही होय. तसे पाहिले तर विधेयपदांच्या परिमितीकरणाची कल्पना ही तितकीशी विकासगर्भ, बहुप्रसवा अथवा क्रांतिकारक सूचना नव्हती. जिच्या मदतीने संशोधनाचा पसारा विस्तृत करता येईल आणि मौलिक तत्त्वांचा शोध लावता येईल अशाप्रकारची ती नवनिर्माणक्षम कल्पना नव्हती. तथापि एका दृष्टीने ती अचूक मार्गदर्शन करणारी होती.

पारंपरिक तर्कशास्त्रामध्ये केवल विधानात उद्देश्य आणि विधेय ही दोनच पदे निर्दिष्ट केलेली असतात; आणि त्यातल्या फक्त उद्देश्यपदांचेच संख्यापरिमाण, " सर्व " " काही " अशी उपपदे जोडून दर्शविण्याचा प्रघात आहे. यात उद्देश्य हे वस्तुवाचक असून विधेय हे गुणवाचक असते असे मत गृहीत धरलेले असते. परंतु हॅमिल्टनने हे गृहीततत्त्व झिडकारून, असे प्रतिपादन केले की, तार्किक विधानात जसे उद्देश्याचे संख्यापरिणाम ठरविता येते तसेच विधेयाचेही ठरविता येण्यासारखे आहे; आणि म्हणून उद्देश्याप्रमाणे विधेयासदेखील संख्यादर्शक उपपदे जोडली पाहिजेत. याचाच अर्थ असा होतो की, तार्किक विधानाच्या दोन घटकांची एकमेकांशी संख्यात्मक तुलना करता येते आणि ती एकमेकास संख्यापरिमाणाने समान आहेत की भिन्न आहेत ते निश्चित करता येते. निराळ्या शब्दात सांगावयाचे म्हणजे तार्किक विधान समीकरणाच्या स्वरूपात मांडता येण्यासारखे आहे. तार्किक विचारसरणीला, काही प्रमाणात, गणितशास्त्रीय स्वरूप प्राप्त होऊ शकते. म्हणजेच तर्कशास्त्र आणि गणितविज्ञान या दोहोत आपण मानतो त्याहून अधिक साम्य आहे ही गोष्ट हॅमिल्टनच्या प्रतिपादनात ध्वनित झाली.

प्रतीकात्मक तर्कशास्त्राचे संस्थापक

लाइब्निट्झ आणि हॅमिल्टन यांच्या कल्पनांनी एक नव्या धर्तीचे तर्कशास्त्र निर्माण करणे तत्त्वतः शक्य असल्याचे केवळ सूचित केले. परंतु त्यानी या शास्त्राची प्रत्यक्ष रचना करावयास काही प्रारंभ केला नाही. ते कार्य इंग्लंडमध्ये गेल्या शतकात घडले. जार्ज बूल (१८१५–१८६४) आणि ऑगस्टस् डीमॉर्गन (१८०६–१८७१) या दोन इंग्लिश विचारवंतांनी प्रतिकात्मक तर्कशास्त्राचे तोरण बांधले. त्यानी तर्कशास्त्रीय बीजगणिताची, तार्किण कलनशास्त्राची, सर्वप्रथम उभारणी केली.

बूलने मुख्यतः वर्गांचे (म्हणजे वस्तूंच्या वा गुणांच्या संहतींचे) कलनशास्त्र निर्मिले. वर्गांची तार्किक बेरीज करणे, त्यांचा तार्किक गुणाकार करणे आणि विशिष्ट वर्गास पूरक अथवा विरोधी अशा अन्य वर्गाची कल्पना करणे या तीन बौद्धिक व्यापारांच्या पायावर त्याने आपले कलनशास्त्र रचले. गणितशास्त्रातल्या " शून्य " या संख्येप्रमाणे तार्किक कलनशास्त्रात " शून्य वर्ग "ची (म्हणजे अभावात्मक अथवा वस्तुरहित वर्गाची) कल्पना उपयुक्त आहे; तिचा प्रथम बूलनेच उपयोग केला. सामान्य बीजगणितात आपण वापरतो ते बेरीज–गुणाकारादी व्यापार तर्कशास्त्रातदेखील अर्थपरत्वे उपयोजिता येतात; आणि तार्किक विधानांची गणितातल्या संख्यांप्रमाणे हाताळणी करता येते हे त्याने प्रत्यक्ष कृती करून दर्शविले. तार्किक विधाने चिन्हांकित केल्यास ती गणितातल्या पदावलींप्रमाणे मांडता येतात. बीजगणितात ज्याप्रमाणे संख्यांचे जागी अ, ब, क, ड अशी प्रतीके आणि बेरीज गुणाकार आदी व्यापारांचे जागी सूचक चिन्हे लिहून नानाप्रकारची समीकरणे तयार करता येतात, त्याचप्रमाणे अनुरूप प्रतीके व चिन्हे वापरून वर्गासंबंधी तार्किक समीकरणे बनविता येतात. त्या तार्किक

समीकरणांना बुद्धिगम्य अर्थ जोडता येतो. सार्थ समीकरणे ही मूलतः तार्किक विधानेच असतात इत्यादी गोष्टी बूलने तपशीलवार विशद करून सांगितल्या. तार्किक विधानांप्रमाणे तार्किक संविधानेदेखील बीजगणिताच्या पद्धतींनुसार प्रतिपादन करता येतात. इतकेच नव्हे तर पारंपरिक तर्कशास्त्रामधले मौलिक विचार-नियमसुद्धा बीजगणिती पद्धतीने सांगता येतात हेही त्याने दाखवून दिले. तार्किक विधाने प्रतीकांच्या परिभाषेत मांडली की त्यांचे एकमेकांशी असलेले संबंध सुसूत्र रीतीने विशद करता येतात. अशा परस्पर निगडित तार्किक विधानांची एक अखंड मालिका अथवा नैगमनिक प्रणाली तयार करता येते हे त्याने सिद्ध करून दाखविले. थोडक्यात म्हणजे तार्किक विधाने व संविधाने यांच्या रचनेसाठी करावे लागणारे बौद्धिक व्यापार आणि गणितशास्त्रीय समीकरणांच्या मांडणीत करावयाच्या कृती या दोहोंमध्ये पुष्कळच साम्य आहे. इतके की, तर्कशास्त्र म्हणजे जणू १ (सत्य) आणि ० (असत्य) या दोन संख्यांपुरते किंवा मूल्यांपुरते मर्यादित असलेले बीजगणितच होय, असापक्ष त्याने परिणामकारक रीतीने प्रतिपादन केला.

बूलने 'वर्गां'चे कलनशास्त्र रचले तसे डीमॉर्गनने 'संबंधां'चे कलनशास्त्र निर्मिले. त्याने तर्कशास्त्र आणि बीजगणित या दोहोंमधले निकटचे नाते बरोबर हेरले. तार्किक संबंधाचा अभ्यास गणितशास्त्रीय पद्धतींशी संलग्न आहे हे ध्यानी आल्याकारणाने त्याने संबंध आणि संबंधदर्शक संज्ञा यांचे विशेष लक्षपूर्वक परिशीलन केले. त्यातूनच त्याचे संबंध–विषयक बीजगणित अस्तित्वात आले. याखेरीज त्याने प्रतीकात्मक तर्कशास्त्राच्या प्रादुर्भावास आणि अभ्युदयास प्रेरक ठरतील अशा अनेक गोष्टी केल्या. पारंपरिक तर्कशास्त्राच्या वैगुण्यांवर आणि मर्यादांवर त्याने विदारक प्रकाश पाडला. त्याच्या मते तर्कशास्त्राने परंपरेला नाहक शरण जाऊन स्वत:वर नसती बंधने लादून घेतलेली आहेत. ही बंधने जर दूर सारली तर या शास्त्राची कल्पनातीत प्रगती होण्यासारखी आहे. उदाहरणार्थ, तार्किक विधाने रचण्याची एकच एक रीत पारंपरिक तर्कशास्त्रात प्रमाण मानली जाते; आणि ती म्हणजे "आहे" व "नाही" या संयोजकांच्या मदतीने विधानाचे उद्देश्य आणि विधेय हे दोन घटक एकत्र जोडावयाचे. परंतु डी मॉर्गनच्या मते, ही रीत नैसर्गिक, स्वभावसिद्ध अथवा अपरिहार्य आहे असे म्हणावयास कसलाच आधार नाही. तार्किक विधानांची रचना केवळ याच रीतीने करता येते असे नाही; ती इतरही प्रकारांनी करता येण्यासारखी आहे. इतर प्रकारांनी तार्किक विधाने रचली काय किंवा पारंपरिक रीतीनुसार रचली काय एकच ! त्यामुळे विधानांचे तार्किक परीक्षण करण्याच्या कार्यात फारसा फरक पडत नाही. त्याचप्रमाणे ही मॉर्गनने असे प्रतिपादन केले की, जुन्या तर्कशास्त्रात अनुमानांच्या फारच थोड्या प्रकारांची दखल घेतलेली आहे. त्या तर्कशास्त्रात नमूद केलेल्या प्रकारांहून आणखी कितीतरी प्रकारची अनुमाने आपण प्रत्यक्षात उपयोजीत असतो. या अन्य अनुमान प्रकारांकडे दुर्लक्ष करण्याचे काहीच कारण नाही. आपण केवळ परंपरेला शरण जाऊन तर्कशास्त्राचे क्षेत्र मर्यादित करून ठेविलेले आहे. ते क्षेत्र विस्तृत करणे, नाहक दुर्लक्षिलेल्या गोष्टींकडे लक्ष पुरविणे, तर्कशास्त्रीय चिकित्सेची व्याप्ती वाढविणे अत्यावश्यक आहे. अशाप्रकारे डीमॉर्गनने पारंपरिक तर्कशास्त्राच्या अप्रागतिकतेचे अचूक निदान करून तर्कशास्त्राच्या विकासाची सुयोग्य दिशा दाखविली. त्याचप्रमाणे तर्कशास्त्र आणि गणितशास्त्र यांचे नाते विशद करून, संविधानांचा प्रगत अभ्यास हा बीजगणिताच्या अभ्यासास जाऊन भिडतो; म्हणजेच तर्कशास्त्राच्या डोहात सखोल अवगाहन करणाऱ्या अभ्यासकास आपण गणितशास्त्राच्याच पाण्यात पोहत आहोत असा प्रत्ययकारी अनुभव येतो, असे आपले निरीक्षण डीमॉर्गनने स्पष्ट शब्दात व्यक्त केले.

अनेकांगी संशोधन

बूल आणि डीमॉर्गन यांनी जे नव्या तर्कशास्त्राचे रोप लाविले त्याचे श्रोडर, पियर्स, फ्रेग, पियॅनो, व्हेन आदी प्रतिभाशाली विद्वद्वर्यांनी परिश्रमपूर्वक संगोपन, संवर्धन केले. श्रोडरने बूल आणि डीमॉर्गन यांच्या तर्कशास्त्रीय बीजगणिताची वाढ करून या विषयावर एक त्रिखंडात्मक ग्रंथ तयार केला तो एक प्रमाणभूत ग्रंथ म्हणून मान्यता पावला. पियर्सने या नवोदित तर्कशास्त्रास पुष्कळ अभिनव ज्ञानसामुग्री प्रदान

केली. विशेषतः तार्किक विधानांचा अस्तित्वविषयक आशय या संबंधींच्या समस्येचे त्याने इतके अपूर्व विवेचन केले की त्यायोगे विधान-फलितांचा अभ्यास अगदी नव्या स्तरावरून करता येऊ लागला. फ्रेगने अत्यंत चोखंदळ पद्धतींचा अंगीकार करून, अंकगणिताच्या आद्य तत्त्वांचा मागोवा घेण्याचा महान प्रयत्न केला; आणि विधान–फलिते, परिमाण–वाचके इत्यादी गोष्टींबाबत कितीतरी नवनवीन मौलिक कल्पना प्रस्थापित केल्या. पियॅनोने या शास्त्राच्या अभ्यासात अत्यंत सोईची ठरतील अशी सुबक प्रतीके व चिन्हे शोधून काढली ती पुष्कळच लोकप्रिय झाली. व्हेनने तार्किक विधानांचा अर्थ विशद करणारी भूमितीवजा वर्तुळे रचली. इतरही संशोधकांनी आपापल्या परीने या नव्या तर्कशास्त्राची ज्ञानसंपदा वृद्धिंगत केली.

लक्षात घेण्यासारखी गोष्ट अशी की तर्कशास्त्र आणि गणितविज्ञान या दोन्ही क्षेत्रात एकाच वेळी मूलगामी संशोधन झाले आणि या संशोधनाच्या वाटा काहीशा स्वतंत्रपणे धावत धावत अखेर एकाच उत्कर्षबिन्दूप्रत पोहोचून एकमेकीस मिळाल्या. पियर्स आणि श्रोडर यांनी तार्किक विधानांवर लक्ष केंद्रित केले; व तार्किक विधानांचे आणि संबंधांचे कलनशास्त्र त्यांनी इतक्या प्रगत अवस्थेस आणून पोहोचविले की त्यामुळे त्यांना गणितातल्या निगमनात्मक कार्यपद्धतींचे स्वरूप विशद करून सांगता येणे सहज शक्य झाले. उलट, पियॅनोदिकांनी दुसऱ्या टोकापासून प्रारंभ केला. त्यांनी गणितविज्ञानामधल्या बौद्धिक व्यापारांचे सूक्ष्म अवलोकन केले; इतके की त्यायोगे त्यांना त्या बौद्धिक व्यापारांमध्ये दडलेली तर्कशास्त्रीय तत्त्वे विशद करून सांगणे सुलभ झाले. अशाप्रकारे, एकीकडे काही संशोधकांनी तर्कशास्त्रावर गणितविज्ञानाचा साज चढविला, तर दुसरीकडे इतर संशोधकांनी गणितविज्ञानाच्या आधारस्तंभांस तर्कशास्त्रीय मजबुती मिळवून दिली. पियर्स आणि श्रोडर यांना तार्किक कलनशास्त्रात आढळलेली आद्य तत्त्वे, आणि पियॅनोला गणितविज्ञानाच्या पायाल्गत प्राप्त झालेली तार्किक तत्त्वे या दोहोमधले साम्य दृष्टोत्पत्तीस येऊन, प्रतीकात्मक तर्कशास्त्राच्या उभारणीचे कार्य तत्त्वतः पूर्ण झाले.

गणितविज्ञान–संकलनात्मक की विश्लेषणात्मक ?

या नव्या तर्कशास्त्रीय आणि गणितशास्त्रीय संशोधनाने काही अध्यात्मशास्त्रीय अथवा ज्ञानशास्त्रीय समस्यांवर बोधप्रद प्रकाश पडतो असे पियॅनोसारख्या अभ्यासकांस आढळून आले. उदाहरणार्थ, गणितशास्त्राची विधाने "अनुभवपूर्व आणि संकलनात्मक" असतात, असे मत इमॅन्युएल कँट (१७२४–१८०४) या विश्वविख्यात जर्मन तत्त्ववेत्त्याने मांडले होते. ते एकोणिसाव्या शतकात पुष्कळच प्रभावी होते. परंतु पियॅनोदिकांना त्यांच्या गणितशास्त्रीय चिकित्सेत असे दिसून आले की कँटचे मत ग्राह्य मानता येत नाही. कारण असे की, शुद्ध गणितविज्ञान हे एक अमूर्त आणि आकारिक शास्त्र आहे. त्याच्या प्रत्येक पावलागणिक अनुभवाचा आधार घेण्याची मुळीच अट नसते. त्यात फक्त प्रारंभी स्वीकारलेल्या काही गृहीतकृत्यांपासून, शिस्तबद्ध निगमनपद्धतीने, अनेक प्रमेये आणि निष्कर्ष सिद्ध करून दाखविलेले असतात. गृहीतकृत्यांपासून प्रमेये यथास्थित सिद्ध होतात की नाही एवढेच गणितविज्ञानात पाहावयाचे असते. प्रत्यक्षानुभवात ती प्रमेये सत्य आहेत की नाहीत हा प्रश्न येथे अप्रस्तुतच होय. गृहीतकृत्येही प्रत्यक्षानुभवाच्या कसोटीस उतरली पाहिजेत असेही येथे बंधन नाही. ज्या संकल्पना प्रत्यक्षानुभवात कधीच उतरत नाहीत, ज्या निव्वळ शक्य कोटीतल्या आहेत, अशा संकल्पनांवरही गृहीतकृत्ये रचून त्यांजवरून संख्या–परिणामात्मक निष्कर्ष काढण्याची पूर्ण मुभा आहे.

विशुद्ध गणितशास्त्रीय प्रमेयांची अथवा निष्कर्षांची उचितता मूर्त अनुभवदत्त गोष्टींवर मुळीच अवलंबून नसते. युक्लिडची भूमिती आणि रीमनची भूमिती या उघडच परस्परांस विरोधी आहेत. त्यातली पहिली प्रत्यक्षानुभवातल्या अवकाशाला लागू पडणारी आहे तशी दुसरी नाही. म्हणून पहिली भूमिती खरी आणि दुसरी खोटी असे जर आपण अनुभवाच्या कसोटीवरून म्हटले तर ते रास्त होणार नाही. या दोन भूमितींचे मूल्यांकन अशाप्रकारे अनुभवाच्या निकषावर करणे हेच मुळी गैर आहे. वास्तविक या दोन्ही भूमितींची रचना अनुभवनिरपेक्ष आहे. आणि हे विधान सर्व विशुद्ध गणिताच्या बाबतीत करावे लागते.

सारांश पियॅनोच्या मते, आधारविधानांपासून प्रमेयादी निष्कर्षविधानांची प्राप्ती यथोचित पद्धतीने करणे एवढेच गणितविज्ञानाचे कार्य आहे. निष्कर्षविधानांचा आधारविधानांशी सुयोग्य तार्किक संबंध आहे की नाही एवढेच गणितशास्त्रात पाहावयाचे असते; त्या विधानांचा प्रत्यक्षानुभवात पडताळा येतो की नाही हे पाहाण्याची जरूरीच नसते. एकूण, गणितविज्ञानाची मदार तर्कावर असते, अनुभवावर नसते. या शास्त्राच्या विधानांत अनुभवांचा नवनवा आशय भरण्याचा काही आपण प्रयत्न करीत नाही. गणितशास्त्रीय विधाने संकलनात्मक नसतात; विश्लेषणात्मकच असतात. ज्या अर्थी या शास्त्राची विधाने सिद्ध करावयास अनुभवाचा आधार घ्यावयाची आवश्यकता नसते त्याअर्थी ती विधाने अनुभवपूर्व असतात हे तर उघडच आहे; परंतु त्याच सोबत ती विश्लेषणात्मक असतात असे देखील म्हणणे भाग पडते; आणि गणिताची विधाने अनुभवपूर्व व संकलनात्मक असतात हे कँटचे सुप्रसिद्ध मत लंगडे ठरवून झिडकारावे लागते.

" प्रिन्सिपिया मॅथेमॅटिका "

पियर्स, श्रोडर, फ्रेग, पियॅनो आदि विचारवंतांनी केलेल्या संशोधनकार्यावर ए. एन्. व्हाइट्हेड (१८६१ –१९४७) आणि बर्ट्रंड रसेल (जन्म १८७२) यांच्या " प्रिन्सिपिया मॅथेमॅटिका " नामक ग्रंथराजाने कळस चढविला. या ग्रंथाची आणि त्याने बजाविलेल्या कामगिरीची थोरवी वर्णावी तेवढी थोडीच होईल. तर्कशास्त्राच्या आणि गणितविज्ञानाच्या इतिहासात या ग्रंथाने एक नवा कालखंड निर्माण केला. गणितशास्त्र हे मुळात तर्कशास्त्रावर कसे आधारलेले आहे ते या ग्रंथात अप्रतिम रीतीने विशद करून सांगितलेले आहे. ज्या गणितशास्त्रीय मूलगामी कल्पना आणि प्रक्रिया आजवर अव्याख्येय आणि विश्लेषणातीत म्हणून गणल्या जात होत्या त्यांची या ग्रंथात तर्कशास्त्रीय संकल्पनांच्या मदतीने व्याख्या केलेली आहे; आणि गणितशास्त्राची एकूण एक गृहीतकृत्ये तर्कशास्त्राच्या आद्य तत्त्वांपासून निष्पन्न करून दाखविलेली आहेत. फक्त दोन आद्य संकल्पना आणि पाच गृहीतकृत्ये यांच्या आधारावर सारे तर्कशास्त्र आणि तार्किक कलनशास्त्र तर उभारता येतेच; परंतु त्याच पायावर संपूर्ण गणितविज्ञानाचाही प्रासाद बांधता येतो, या सत्याचे या ग्रंथात जे अपूर्व दर्शन होते त्यामुळे मन साहजिकच आश्चर्यथक्क होऊन जाते. तर्कशास्त्राची व्याप्ती इतकी विशाल आहे की तिच्यात गणितविज्ञानासारख्या मौलिक शास्त्राची मूलतत्त्वे सहज सामावली जातात हा साक्षात्कार केवळ अनन्यसाधारणच होय. " प्रिन्सिपिया मॅथेमॅटिका"च्या अजोड कामगिरीपायी प्रतीकात्मक तर्कशास्त्र हे शास्त्र–पदवीस पात्र ठरले. अध्ययनाचे एक स्वतंत्र क्षेत्र म्हणून त्यास निर्विवाद प्रतिष्ठा प्राप्त झाली. विविध शास्त्रांच्या पंक्तीमधले त्याचे स्थान सुनिश्चित झाले.

" प्रिन्सिपिया मॅथेमॅटिका"च्या अलौकिक यशानंतर प्रतीकात्मक तर्कशास्त्राची अधिकच झपाट्याने वाढ झाली. आणखी अनपेक्षित तार्किक तत्त्वे दृष्टिपथात आली. तार्किक विचारसरणीचे स्वरूप अधिकतर सुस्पष्ट झाले. नव्या पद्धती आणि नव्या प्रणाली जन्मास आल्या. प्रतीकात्मक तर्कशास्त्रात घडलेल्या या खळबळजनक घडामोडींचे एकंदर पाश्चात्य तत्वज्ञानावर दूरगामी परिणाम झाले. अध्यात्मशास्त्रीय चिंतन अनेकदा तर्कशास्त्रीय तत्त्वांवर विसंबून राहते. साहजिकच त्या चिंतनावर प्रतीकात्मक तर्कशास्त्राच्या क्रांतिकारक शोधांचा प्रभाव पडला.

फक्त एक गृहीतकृत्य

आपले शास्त्र अगदी मोजक्या, कमीतकमी आद्य तत्त्वांवर उभारलेले असावे अशी मूलगामी तत्त्वांचे चिंतन करणाऱ्या विचारवंतांची सर्वसाधारणपणे आकांक्षा असते. शक्य तेथे तात्त्विक काटकसर करण्याकडेच शास्त्रज्ञांची प्रवृत्ती असते. याचे प्रत्यंतर प्रतीकात्मक तर्कशास्त्रात आले. प्रिन्सिपिया मॅथेमॅटिकामध्ये तार्किक तत्त्वप्रणालीची आद्य तत्त्वे म्हणून दोन अव्याख्येय संकल्पना आणि पाच गृहीतकृत्ये यांचा अंगीकार केलेला आहे. या आद्य तत्त्वांची संख्या कमी करण्याचे मार्ग एच्. एम्. शेफर आणि जे. जी. पी. निकोड यांनी शोधून काढले.

पियर्सने सुचविलेल्या एका कल्पनेचा विस्तार करून, शेफरने असे दाखवून दिले की " उभ्या रेषे"ची एकच एक तार्किक कृती, खूण अथवा संकल्पना प्रारंभी स्वीकारली की पुरे. तिच्या मदतीने प्रतीकात्मक तर्कशास्त्रातल्या अन्य कृतींची व्याख्या करता येते; आणि

त्यांतून सर्व तार्किक विधाने व प्रमेये निष्पन्न करता येतात.

त्याचप्रमाणे निकोड याने असे सिद्ध केले की तर्कशास्त्रीय तत्त्वप्रणालींची उभारणी केवळ एका (काहीश्या जटिल) गृहीतकृत्याच्या पायावर करता येते. त्या एका गृहीकृत्यापासून (उभ्या रेषेच्या तार्किक कृतीची मदत घेऊन) तर्कशास्त्राची एकूण एक प्रमेये प्रस्थापित करता येतात.

तर्कशास्त्राच्या नियमांचे त्रिकालाबाधितत्व

तर्कशास्त्राच्या नियमात प्रकट होणारे सत्य कोणत्या प्रकारचे असते? एकंदर तर्कनिष्ठ विचारसरणीचे मूळ स्वरूप कसे काय आहे? या समस्येचे लुड्विग् विट्गेन्स्टाइन् (१८८९-१९५१) याने अप्रतिम विवरण केले. त्याच्या मते, तार्किक नियमात व्यक्त होणारे सत्य हे पुनरुक्तिपर असते. म्हणजे असे की, तर्कशास्त्राच्या नियमात जे काही सत्य प्रतिपादिलेले असते त्याला अन्य पर्यायच नसतो. अभिव्यक्त केलेल्या सत्याचे सारे पर्याय जणू त्या त्या तार्किक विधानात अनुस्यूत असतात. ते स्वीकारल्यावाचून गत्यंतर नसते. तर्कशास्त्राचे नियम सदासर्वकाळ सत्य असतात. भौतिक शास्त्रांचे नियम एखादेवेळ चुकीचे ठरण्याची शक्यता असते. परंतु तर्कशास्त्राचे नियम कधीच चुकीचे ठरत नाहीत. कालच्या अनुभवापेक्षा आजचा अनुभव काहीसा वेगळा आला की निसर्गशास्त्रांच्या नियमात दुरुस्ती करणे भाग पडते. परंतु तर्कशास्त्राचे नियम असे काही बिनचूक असतात की त्यांच्यात कधी बदल करण्याची जरूर पडत नाही. ते नियम म्हणजे जणू त्रिकालाबाधित सत्येच होत. त्यांच्या या त्रिकालाबाधितत्वाचे गुपित कोणते?

तर्कशास्त्राच्या नियमांत मुख्यतः काय सांगितलेले असते ते जर आपण नीट जाणून घेतले तर त्यांच्या चिरंतनत्वाचा उलगडा होतो. खरे म्हणजे, आधारविधानांपासून सुसंगत निष्कर्ष कसे मिळवावयाचे एवढेच या नियमात विशद केलेले असते. निष्कर्ष हे सर्वतोपरी आधारविधानांवर अवलंबून असतात. प्रमेये ही पूर्णांशाने गृहीतकृत्यांपासून निष्पन्न केलेली असतात. गृहीतकृत्ये आणि आधारविधाने ही आपण विशिष्ट शब्दांच्या, पदांच्या अथवा प्रतीकांच्या मदतीने बनवितो. या शब्दादिकांना अर्थातच आपण काही एक विशिष्ट अर्थ जोडलेला असतो. आधारविधानांमधल्या पदांची आपण मनोमन काहीना काही व्याख्या रचलेली असते. त्या व्याख्यांच्याच वर्तुळात आपले निष्कर्षणाचे आणि प्रमेयसिद्धीचे व्यापार घडून येतात. आरंभास स्वीकारलेल्या मूळ पदांच्या व्याख्येशी सुसंगत असणारे निष्कर्ष आविष्कृत करणे हेच तर्कशास्त्रीय पद्धतीचे वैशिष्ट्य आहे. मूळ पदांच्या अर्थाशी सुसंगत असणारे तऱ्हेतऱ्हेचे निष्कर्ष कसे काढावयाचे ते तर्कशास्त्राच्या नियमात सांगितलेले असते. गृहीतपदांचे अर्थ नानाप्रकारांनी कसे सांगावेत हे सांगणारे तर्कशास्त्राचे नियम कधी काळी खोटेच ठरत नाहीत यात आश्चर्य नाही.

एकंदरीत, विट्गेन्स्टाइनच्या मते, तर्कशास्त्रीय विधाने ही गणिताच्या विधानांप्रमाणे विश्लेषणात्मक असतात, संकलनात्मक नसतात. पदार्थविज्ञानादि भौतिक शास्त्रे निसर्गसृष्टीमधल्या मूर्त घटनांविषयीचे नियम सांगतात, तसे तर्कशास्त्र सांगत नाही. केवळ तर्कशास्त्राच्या अभ्यासाने प्रत्यक्ष सृष्टीविषयी नवी नवी माहिती मिळविता येत नाही. अगोदरच प्राप्त झालेल्या किंवा गृहीत मानलेल्या विधानांचा अभिप्रेत आशय विश्लेषणाच्या विविध मार्गांनी प्रकट करण्याचे प्रशिक्षण आपणास तर्कशास्त्रात मिळते. जे सत्य अथवा अनुभवात्मक आशय एका तार्किक विधानात व्यक्त केलेला असतो तोच दुसऱ्या तार्किक विधानात निराळ्या रीतीने व्यक्त केलेला असतो. तार्किक तत्त्वप्रणालीच्या भिन्नभिन्न सूत्रात एकाच आशयाचा प्रवाह धावत असतो. संपूर्ण तार्किक प्रणालीमधले कोणतेही एक विधान त्यातल्या दुसऱ्या विधानास समरूप असते. त्या प्रणालींतली सर्व तार्किक विधाने म्हणजेच तर्कशास्त्राचे नियम हे पुनरुक्तिमय असतात. प्रारंभीच्या गृहीतकृत्यात स्वीकारलेल्या आशयाचीच प्रतिबिम्बे विविध प्रमेयांच्या विविध प्रतीक–चिन्हांत उमटलेली असतात. आधारविधानात अभिप्रेत असलेल्या सत्याचेच प्रतिध्वनी निष्कर्षविधानात निनादत असतात.

तर्कशास्त्र– " आकारिक " शास्त्र

मूर्त अनुभवांचा आशय आपण वाक्यात अथवा विधानात व्यक्त करतो. विधाने ही सत्य अथवा असत्य असू शकतात. शास्त्रज्ञ, लेखक, कवी, सामान्य माणसे इत्यादी विविध व्यक्ती आपापल्या अनुभवाच्या आणि

निरीक्षणाच्या आधारावर विविध प्रकारची विधाने करीत असतात. त्यानी केलेली विधाने खरी आहेत की खोटी आहेत ते ठरविणे हे काही तर्कशास्त्राचे कार्य नव्हे. विधानांच्या खरेखोटेपणाविषयीं तर्कशास्त्र कोणतेच मतप्रदर्शन करीत नाही. परंतु सत्य (किंवा असत्य) म्हणून जर आपण एखादे विधान स्वीकारले तर त्यामध्ये अनुस्यूत असणारी अन्य सत्य (किंवा असत्य) विधाने कोणती, एवढेच प्रतीकांच्या मदतीने तर्कशास्त्र दर्शवीत असते. आधारविधानांपासून निष्पन्न केलेल्या निष्कर्षविधानांचा त्या प्रारंभीच्या आधारविधानांशी उचित प्रकारचासंबंध आहे की नाही, तेवढेच तर्कशास्त्राच्या साहाय्याने ठरविता येते. थोडक्यात म्हणजे तर्कशास्त्रीय सत्य हे "आकारिक" असते तर्कशास्त्र हे गणिताप्रमाणे एक आकारिक शास्त्र. आहे.

अर्थात् तार्किक विधाने आकारिक अथवा विश्लेषणात्मक असतात, याचा अर्थ ती पूर्णपणे अर्थशून्य असतात असा करणे अगदीच उथळपणाचे ठरेल. तार्किक विधानात, तर्कशास्त्राच्या नियमात अनुभवदत्त सृष्टीतल्या गोष्टींविषयींचे मूर्त ज्ञान नसते. या अर्थाने ती विधाने " पोकळ " असतात, असे म्हणावयास हरकत नाही. परंतु ती " निरर्थक " असतात, असे म्हणणे योग्य नव्हे. वस्तुतः, सुसंगतीशी इमान राखून मानवी बुद्धी जे अर्थविश्लेषणाचे विविध व्यापार करते त्यांचे मनोहर दर्शन या तार्किक नियमात होते. ज्ञानग्रहणाप्रीत्यर्थ मानवी प्रज्ञा कोणकोणत्या कसरती करते ? प्राप्त झालेला सत्याचा आविष्कार ती नाना प्रकारांनी कशी करते ? मानवी विचारांची अभिव्यक्ती भाषेच्या व प्रतीकांच्या माध्यमातून कशा तऱ्हेने होते ? या विषयींची बोधप्रद माहिती आपणास तर्कशास्त्रात हस्तगत होते. तर्कशास्त्राचे नियम निश्चितच ज्ञानप्रकाशदायी आहेत. त्यांना निरर्थक अथवा वायफळ मानणे गैर होय. परंतु त्याचसोबत, दुसऱ्या टोकास जाऊन तर्कशास्त्राचे नियम ज्याअर्थी त्रिकालाबाधित असतात त्याअर्थी त्यात सृष्टीविषयक, वस्तुनिष्ठ सत्याचा आपणास साक्षात्कार होतो असे मानणेही समुचित नव्हे. वस्तुस्थितीचे अथवा विश्वाचे स्वरूप विशद करणे हे काही तर्कशास्त्राचे उद्दिष्ट नाही. फक्त मानवी विचारसरणीचे स्वरूप स्पष्ट करणे एवढेच त्याचे कार्य आहे.

विचारसरणी तर्कशुद्ध असली की तिच्यामध्ये वापरलेली सर्व विधाने निर्विवाद सत्यच असली पाहिजेत, असे आपण सर्वसाधारणपणे मानतो. तेही फारसे सयुक्तिक नाही. एखाद्या विधानाच्या अभिप्रेत अर्थाची तर्कशुद्ध फोड करणे आणि वस्तुस्थितीविषयी नवी नवी माहिती उजेडात आणणे या दोन प्रक्रिया उघडच भिन्न आहेत. विवक्षित विचारसरणी जर तर्कदृष्ट्या निर्दोष असेल तर तिच्यातल्या आधारविधानांचा आणि निष्कर्षविधानांचा परस्परसंबंध उचित आहे एवढेच म्हणता येईल. परंतु याच्याही पुढे जाऊन त्या आधारविधानांच्या आणि निष्कर्षविधानांच्या सत्यतेविषयी अथवा वस्तुनिष्ठतेविषयी हमी देणे हे मात्र युक्त ठरणार नाही. तर्कशुद्ध अनुमानांचे निष्कर्ष जरी प्रत्यक्षानुभवात सत्यच असल्याचे आढळून आले तरी त्यावरून त्यांच्या आरंभस्थानींची आधारविधाने सत्यच असली पाहिजेत असे हमखास म्हणता येणार नाही; कारण, चुकीच्या अभ्युपगमांनीही प्रत्यक्षानुभवातल्या घटनांचे स्पष्टीकरण होऊ शकते ही गोष्ट विज्ञानाच्या इतिहासाला चांगलीच परिचयाची आहे.

तत्त्वप्रणालींची अनेकविधता

प्रतीकात्मक तर्कशास्त्रात अभिप्रायात्मक तार्किक विधानांची सुसूत्र मालिका अथवा प्रणाली रचता येते, तिला नैगमनिक प्रणाली म्हणतात. या नैगमनिक प्रणालीसंबंधाने एक महत्त्वपूर्ण सत्य विचारात घेण्यासारखे आहे. सामान्यतः आपण असे समजून असतो की तर्कशास्त्र हे एकच एक शास्त्र असून, तार्किक तत्त्वप्रणाली ही एकच एक असली पाहिजे. या शास्त्राची काही ठराविक गृहीतकृत्ये असली पाहिजेत; आणि त्यांपासून ठराविक निष्कर्ष निष्पन्न होत असले पाहिजेत; आणि अशा सुनिश्चित गृहीतकृत्य–प्रमेयांची एकच एक अपरिवर्तनीय व्यवस्था या शास्त्रात प्रस्थापित झालेली असली पाहिजे. परंतु आपल्या या सामान्य समजुतीला प्रतीकात्मक तर्कशास्त्राच्या अभ्यासात आश्चर्यजनक पण सुखद धक्का बसतो. ल्यूकाझीविच्, टार्स्की, हिल्बर्ट, रॉसर आदि संशोधकांनी असे दाखवून दिले आहे की तर्कशास्त्राच्या प्रांतात एकच एक सार्वभौम नैगमनिक प्रणाली प्रस्थापित होण्यासारखी नसून, आपणास अशा अनेक पर्यायी प्रणाली रचता येतात. निरनिराळी गृहीत-

कृत्ये आधारास घेऊन, तर्कशास्त्रीय नियमांचे अथवा अभिप्रायात्मक तार्किक विधानांचे आपणास अनेक आकृति-बंध तयार करता येतात. विविध तत्त्वप्रणाली सारख्याच सुसूत्र आणि शिस्तबद्ध असतात. त्यांच्यात डावे-उजवे ठरविण्याजोगे काहीच नसते. त्यांच्यात फरक इतकाच असतो की एकीची आधारविधाने ही दुसरीची प्रमेये म्हणून सिद्ध केली जातात; आणि एकीची प्रमेये ही दुसरीची आधारविधाने म्हणून गृहीत मानलेली असतात. अशाप्रकारे, अनेक तत्त्वप्रणालींचे मनोरम दर्शन घडविणारे आधुनिक तर्कशास्त्र म्हणजे जणू रंगीत मण्यांच्या चित्रविचित्र आकृत्या दर्शविणारे एकप्रकारचे "चारुदर्शक" नळकांडेच होय, असे म्हणावयास हरकत नाही. पूर्वीच्या काळी, भूमिती म्हटली म्हणजे ती एकच एक युक्लिडची भूमिती होय असे मानले जाई. परंतु रीमन, लोबॅचेव्हस्की आदी गणितशास्त्रज्ञांनी पर्यायी भूमितींची रचना करून तो जुना समज नाहीसा केला. त्याचप्रमाणे, तर्कशास्त्रात देखील पर्यायी तार्किक प्रणालींची रचना करून, आधुनिक तर्कशास्त्रज्ञांनी, तर्कशास्त्र म्हटले की ते एकच एक ॲरिस्टॉटलपासून चालत आलेले तर्कशास्त्र होय, हा जुना ग्रह नष्ट केलेला आहे. निरनिराळ्या रागांवर स्वरविलासांची निरनिराळी दुनिया उभारता येते; त्याचप्रमाणे तर्कशास्त्रात निरनिराळ्या गृहीतकृत्यांवर निरनिराळ्या निगमनात्मक तत्त्वप्रणाली रचता येतात.

तार्किक तत्त्वप्रणाली अनेकविध असू शकतात या शोधापासून आपणांस एक महत्त्वाचा बोध घेता येण्यासारखा आहे. विश्वात एकच एक सुव्यवस्था असली पाहिजे, आणि ती विश्वव्यापी सुव्यवस्था तर्कशास्त्राच्या कसोटीस उतरणाऱ्या एखाद्या तत्त्वप्रणालीत अभिव्यक्त झालेली असलीच पाहिजे; किंवा तर्कशुद्ध विचारसरणी ही वस्तुनिष्ठ परिस्थितीची एकमेव सर्वंकष व सचोटीची प्रतिकृती असलीच पाहिजे, अशी सामान्यतः आपली भावना असते. परंतु असल्या भावनेला शरण जाण्याची आवश्यकता नाही. प्रत्यक्षातल्या विश्वात शक्यतेच्या नाना कोटि असतात. वस्तुस्थिती ही नानापरींची असू शकते. अनुभवातल्या वस्तूंचे आणि त्यांच्या गुणधर्मांचे परस्परसंबंध अनंत प्रकारचे असू शकतात. त्यातले काही प्रकारचे संबंध आणि काही विशिष्ट नामरूपे आपल्या अनुभवाच्या आवाक्यात येतात. अनेकदा तर आपणच आपल्या प्रच्छन्न वा ज्ञात हेतूनुसार या वस्तूंच्या नामरूपांची, गुणधर्मांची, संबंधांची निवड करतो. आणि अशा निवडून घेतलेल्या अनुभवाच्या आशयावरच सहसा आपण आपल्या तत्त्वप्रणाली रचतो अशाप्रकारे, प्रत्येक तत्त्वप्रणाली ही मानव–निर्मित असते. साहजिकच, आपणास प्रतीत अथवा ज्ञात झालेली तत्त्वप्रणाली ही विश्वामधली एकमेव सर्वंकष सार्वभौम सुव्यवस्था दर्शविणारी प्रणाली आहे; आणि ती निरपवाद, निर्णायक, अंतिम स्वरूपाची आहे असे मानण्याची घाई तर्कशास्त्राच्या आणि तत्त्वज्ञानाच्या जिज्ञासू साधकाने तरी करू नये. तत्त्वप्रणालींचे बाबतीत सदैव व्यापक दृष्टिकोन ठेवावा. तत्त्वांचे बाबतीत संकुचित, आग्रही वृत्ती बाळगणे सत्याच्या साधकास मुळीच शोभत नाही ही तत्त्वज्ञानाची थोर शिकवण काही आधुनिक विचारवंतांस प्रतीकात्मक तर्कशास्त्राच्या अभ्यासातून मिळविता आली.

भाषिक विश्लेषणाची आवश्यकता

प्रतीकात्मक तर्कशास्त्राने ज्याप्रमाणे नैगमनिक प्रणालीसंबंधाने काही उद्बोधक गोष्टी उजेडात आणल्या, त्याचप्रमाणे विचाराभिव्यक्तीसाठी आपण जी भाषा वापरतो त्या भाषेसंबंधानेही काही मूलगामी प्रश्न उपस्थित केले. त्या प्रश्नांकडे आधुनिक पाश्चात्त्य तत्त्ववेत्त्यांचे लक्ष प्रकर्षाने वेधले.

काही ना काही कारणापायी प्रतीकात्मक तर्कशास्त्रज्ञांना विवक्षित प्रकारच्या विरोधाभासात्मक वाक्यांचे तार्किक परीक्षण करणे भाग पडले. पुढे दिलेली विधाने अशा प्रकारच्या विरोधाभासात्मक वाक्यांची उदाहरणे होत :

(१) "पुढचे वाक्य खरे आहे. अगोदरचे वाक्य खोटे आहे."

(२) "अनृतभाषी नावाचा असुरीपुरीतला राक्षस म्हणतो की असुरपुरीतले सगळेच राक्षस खोटे बोलतात."

(३) "येथल्या तीन वाक्यांपैकी तिसऱ्या क्रमांकाचे वाक्य सत्य नाही."

अनुक्रमणिका

– यातल्या प्रत्येक वाक्यात परस्परसंलग्न अशी दोन घटक–विधाने आहेत, ही घटक– विधाने एकमेकांना क्रमशः खो देतात, मग शह देतात, पुन्हा खो देतात. त्यांच्यातले पहिले घटकविधान जर स्वीकारले तर मग दुसरेही स्वीकारावे लागते; आणि दुसरे घटक–विधान जर सत्य म्हणून स्वीकारले तर पहिले असत्य मानून टाळावे लागते. परंतु पहिले जर टाळले तर पर्यायाने दुसऱ्या विधानाचा आशय खरा ठरून त्यायोगे पहिले विधान ग्राह्य मानावे लागते. अशाप्रकारची या वाक्यांमधल्या घटकविधानांची आपणांस क्रमशः धर-सोड करावी लागते; आणि ही वाक्ये खरी मानावीत की खोटी, या संभ्रमाच्या भोवऱ्यात सापडून आपली मोठी विचित्र स्थिती होते.

हे विरोधाभास म्हणजे निव्वळ गंमतीचे प्रकार आहेत असे समजून आपण सहसा ते सोडून देतो. परंतु बारकाईने पाहिल्यास त्यांत एक मोठी गंभीर समस्या दडलेली आहे असे आपल्या नजरेस येते. टार्स्कीसारख्या प्रतीकात्मक तर्कशास्त्रज्ञांनी सुचविल्याप्रमाणे, हे विरोधाभास ज्या भाषेत व्यक्त केलेले आहेत त्या भाषेविषयी अधिक चिंतन करणे जरूरीचे आहे. वरील विरोधाभासात्मक वाक्यात जी दोन घटक–विधाने आहेत ती एकाच पातळीवरची असून, ती एकमेकांच्या सत्यासत्यतेची शहानिशा करीत असलेली दिसतात. अशा परिस्थितीत त्यांच्या परस्पर–परीक्षणाचे चक्र अखंड फिरत रहाते; आणि एकप्रकारच्या विचित्र आत्मविसंगतीच्या जाळ्यात आपण अडकून पडतो. यावरून असे निष्पन्न होते की कोणत्याही विधानाच्या सत्यासत्यतेची शहानिशा त्याच विधानाच्या पातळीवरल्या भाषेत केली तर आपली फसगतच होते. ज्या भाषेत आपण एकादे विधान व्यक्त करतो त्याच भाषेत जर आपण त्या विधानाची सत्यासत्यता जोखून पाहू लागलो तर बहुशः आपली एखाद्या घातक चक्रव्यूहात सापडलेल्या माणसारखी अवस्था होते. आत्मविसंगतीच्या दोषातून सुटण्याचा मग मार्गच सापडत नाही. अनुभवांचा आशय व्यक्त करण्यासाठी आपण जे प्रचलित भाषेतले शब्द योजितो त्याच शब्दात जर आपल्या उक्तींचे तार्किक मूल्यमापन केले तर परस्परविरोधी निष्कर्षांप्रत आपण येऊन पोहोचतो. आत्मविसंगतीला थारा देणाऱ्या भाषेत अथवा शब्द–प्रणालीत मन मानेल ते सिद्ध करून दाखविता येते. एकापरीने खऱ्याचे खोटे आणि खोट्याचे खरे देखील करून दाखविता येते.

वास्तव, आपण वापरतो ती भाषा इष्ट त्या तात्त्विक विवेचनास उपयुक्त आहे की नाही ते पाहाणे अत्यंत श्रेयस्कर असते. सत्याचा शोध करणाऱ्या साधकाने आपल्या भाषेकडे सूक्ष्म नजरेने पाहिले पाहिजे. शब्दांचा अर्थ नीट जोखला पाहिजे. विवेचनात वापरावयाची पदे मोजून–मापून घेतली पाहिजेत. अन्यथा गोंधळास अंत नाही.

अशाप्रकारे प्रतीकात्मक तर्कशास्त्राने भाषेच्या तात्त्विक उपयुक्ततेचा यक्षप्रश्न उपस्थित केला; आणि बहुतेक साऱ्या पाश्चात्त्य तत्त्ववेत्त्यांचे लक्ष भाषिक विश्लेषणाच्या मौलिक प्रश्नाकडे वळविले.

अनुक्रमणिका

प्रा. चंद्रकांत बांदिवडेकर

मानसशास्त्र, साहित्य आणि मराठी कादंबरी

विसाव्या शतकातील सर्व जागतिक साहित्य मानसशास्त्रातील नानाविध सिद्धांतांनी प्रभावित झालेले दिसते. न्यूटन आणि कोपर्निकस यांच्या सिद्धांतांचा जसा प्रभाव भौतिक शात्रांवर पडला तशाच स्वरूपाचा मूलगामी प्रभाव फ्राइड, एडलर, व युंग या मनोविज्ञानवेत्त्यांच्या सिद्धांतांचा साहित्यावर पडलेला दिसून येतो. कलावंत हा एक अस्वस्थचित्त किंवा असाधारण मनोरचनेचा प्राणी असतो. असा सिद्धांतच फ्राइडने मांडला. आपल्या निष्फळ आशाआकांक्षाच कलावंत आपल्या कलेतून प्रकट करतो आणि आपल्या मनाचे ताण हलके करतो किंवा एक प्रकारचा तोल सावरण्याचा प्रयत्न करतो असे त्याने म्हटले आहे. म्हणजे साहित्य किंवा कला यांच्या सामाजिक प्रयोजनाची कल्पना हास्यास्पद ठरवून वैयक्तिक मानसिक स्वास्थ्य उपलब्ध करण्याचे ते एक साधन त्याने ठरवलेले दिसते.[१] याचा परिणाम लेखकांवर आणि टीकाकारांवर झाला. लेखकाच्या दवलेल्या किंवा अवदयित आणि निष्फळ अशा आकांक्षा आणि आंतरिक ताण त्याच्या कृतींतून शोधण्याचा प्रयत्न टीकाकार करू लागले. ही प्रवृत्ती इतकी वाढीस लागली की एडमण्ड विल्सनने अशी सूचना दिली की हे मनोविश्लेषणवादी टीकाकार अतिरेक करीत आहेत. अत्यंत क्षीण आधारावर फ्राइडियन आराखडा उभा करून कलावंताच्या कृतीचे मौलिक विश्लेषण करण्यापेक्षा या आराखड्याबरहुकूम काल्पनिक आणि कपोलकल्पित गोष्टी टीकेच्या नावाखाली घुसू लागल्या.

मानसशास्त्रातील मनोविश्लेषण पद्धतीचा प्रभाव कादंबरी वाङ्मयावर सर्वात अधिक पडला कारण मनुष्याच्या वर्तनासंबंधी नवे आणि निर्भीड असे स्पष्टीकरण त्यात सापडते. वर्तनाच्या गूढ आणि महत्त्वपूर्ण प्रेरणांकडे संकेत करून कलाकाराच्या आत्मपरतेचा बडिवार या मनोविश्लेषण पद्धतीने माजविला. शिवाय कलावंताला आपल्या आणि विश्वाच्या अभ्यासाची नवी दिशा उपलब्ध झाली. रूढ आचरणाचे प्रस्थापित मानदंड उखडून टाकणारा विद्रोहीपणा यातला आकर्षक भाग आहे.[२]

मानसशास्त्र आणि साहित्य

फ्राइड व अन्य मानसशास्त्रांच्या संशोधनाचा कादंबरीवाङ्मयावर आशय आणि अभिव्यक्ती दोन्ही दृष्टींनी प्रभाव पडलेला दिसतो.

० फ्राइडच्या मानसशास्त्रातील विचारांमुळे नीतिविषयक मते बदलू लागली. भ्रष्ट समाजव्यवस्थेत नैतिक दृष्टीने अव्यवस्थित आणि स्खलनशील व्यक्तींबद्दल सहानुभूतीची भावना वाढली. दुर्बळ, अस्वस्थचित्त आणि सुमार व्यक्तींना नायक करून त्यांच्या माध्यमातून अन्तर्मनाची गहनगूढ धडपड दाखविण्याचा प्रयत्न लेखक करू लागले. फ्रान्झ अलेक्झांडर यासंबंधी तक्रारीच्या रूपात म्हणतो की फ्राइडचा मूळ उद्देश्यच विसरला गेला.[३] फ्राइडची परिभाषा वापरून असे म्हणता येईल 'इड' चे यथार्थ रूप दाखवण्यात लेखकांनी जितका रस घेतला तितका 'इड' ला 'ईगो' च्या पातळीवर आणून व्यक्तित्व सुस्थिर करण्याच्या पद्धतीकडे लक्ष दिले गेले नाही.

१. Freudianism and Literary mind.

– by Fredrick J. Hoffman pagy 96.

२. Ibid page 93.

३. Freud was not only the discoverer of unconscious but also the inventor of a technique by which the unconscious forces, after being mobilized, can be brought under the control of the rational mind.

– The western mind in transition – by Franz Alexander.

अनुक्रमणिका

परिणामतः साहित्यात मानसशास्त्रीय सिद्धांतांच्या आधाराने अतिव्यक्तिवादी प्रवृत्ती वाढल्या.

० लैंगिक संबंधांकडे पाहाण्याचा दृष्टिकोण अधिक उदार झाला. क्वचित लैंगिक विकृतींचे समर्थनही करण्यात आले. 'इडिपस' 'इलेक्ट्रा' ग्रंथींच्या सिद्धांतांच्या आधारे माता-पुत्र, पिता-कन्या, भाऊ-बहीण, किशोर वयातील दोन समलिंगी मित्र किंवा मैत्रिणींचे आत्यंतिक आत्मीयतेचे संबंध इत्यादी गोष्टींचे स्पष्टीकरण करण्याची प्रवृत्ती वाढीस लागली. समलिंगी आकर्षणाचे चित्रण वास्तवतेच्या नावावर केले जाऊ लागले. कौटुंबिक जीवनातल्या विशुद्ध प्रेमसंबंधांची चित्रे विरळ होऊ लागली. परपीडा, आत्मपीडा इत्यादींची विविध रूपे येऊ लागली.

० मनुष्याचे मूळ रूप शोधण्याच्या प्रयत्नात चरित्रचित्रण करण्याची जुनी पद्धत बदलून गेली. व्यक्ती चांगली किंवा वाईट अशी नसते. चांगल्या वाईट प्रवृत्तींची भेसळ तिच्यामध्ये असते असे मान्य झाल्यावर सुष्ट किंवा दुष्ट अशा प्रकारची एकेरी रूपे नीरस वाटू लागली आणि माणसाचे संमिश्र रूप व्यक्त करण्याकडे प्रवृत्ती वाढली. कधी व्यक्ती विकृत व गूढ दाखवण्याकडे व त्यालाच खरे रूप समजण्याकडे कल झुकू लागला.[१]

० प्रेम, घृणा, मत्सर, आकर्षण, इत्यादी भावांचे मूळ रूप हुडकून काढण्याच्या प्रयत्नात भावनांचे प्रस्थापित वर्गीकरण अपुरे वाटू लागले. साहित्यातील रसव्यवस्था अपुरी व अडगळीसारखी भासू लागली.

० बाह्य वास्तवतेबद्दल उदासीनपणा वाढीस लागला आणि अंतर्मनाच्या वास्तवतेचे किंवा मनाच्या अनेक पातळ्यांच्या वास्तवाचे उद्घाटन करण्यात अधिक उत्साह, लेखक दाखवू लागले. मनुष्याचे विचार, विकार, भावनात्मक संघर्षाचा अविरत प्रवाह (flux) जशाच्या तसा चित्रित करण्याच्या प्रयत्नात लेखकांना विशिष्ट कालक्रमानुसारी व तर्काश्रयी असणारी भाषा अपुरी वाटू लागली. भाषेचा प्रयोग वैयक्तिक दृष्टीतून केला जाऊ लागला. प्रतीके आणि प्रतिमा यांचा वापर अगदी वैयक्तिक झाला.

० कथा आणि चरित्रचित्रणासंबंधी कल्पना पार बदलल्या. लेखक आपल्या कथांपासून व पात्रांपासून इतका दूर राहण्याचा प्रयत्न करू लागला जसा ईश्वर आपण रचलेल्या सृष्टीपासून दूर असतो.[२] आपल्या पात्रांच्या मनोवेदना आणि संवेदना वाचकांनी सरळ अनुभवाव्यात अशा तऱ्हेचा प्रयत्न केला जाऊ लागला.

० आन्तरिक संवेदनांच्या प्रकटीकरणासाठी भाषेचे परंपरागत, नियमबद्ध रूप अपुरे पडू लागल्यामुळे लेखक व्याकरणाच्या नियमांनी मुक्त अशी भाषा वापरू लागले. भाषासौंदर्य किंवा शैलीसौंदर्य या

१ Twenteeth– century writer, instead of assuming that the normal and abnormal were not isolated types–as Freud had suggested– often took the abnormal for normal.

Freudianism and Literary mind. page 113. Hoffman.

२. The psychological novelist attempts to arrest a moment of time at every step even as it flees before him. He may contemplate a statue, a picture, a landscape, a city for hours; always the form of what is being viewed remains reasonably fixed and recognizable. But the instant of emotion, the moment of perception, the shout or the street the epiphany-these an heard and are gone, the moment flames brightly and becomes a fading coal. How arrest this kinetic moment of the mind ? How give it the static quality possessed by a statue ? ''

The psychological novel page 147

by Licon Edel.

बद्दलचे परंपरागत मानदंड नवीन भाषेचे स्वरूप ठरविण्यास असमर्थ होऊ लागले.

० कादंबऱ्यांतून घडणाऱ्या घटनांच्या व प्रसंगांच्या कालविषयक कल्पना बदलल्या. धावत्या, निसटत्या तरल क्षणांची चित्रे काढण्याच्या प्रयत्नात लेखक शक्ती खर्च करू लागले.[१] एकोणिसाव्या शतकात बाल्झाकसारखे लेखक बाह्य वास्तवाचे यथातथ्य रूप चित्रित करीत होते. तर विसाव्या शतकातले मानसशास्त्रज्ञ कादंबरीकार अनुभवाच्या क्षणांना त्यांच्या गतिमान रूपात अभिव्यक्त करण्याचा प्रयत्न करू लागले.[२]

० कादंबरीच्या तंत्रावर किंवा अभिव्यक्ति-प्रणालींवर याचा खूप परिणाम झाला. अनुभवांच्या तीव्रतेमुळे स्मृतींची बंद कवाडे उघडून बाहेर पडणाऱ्या अतीतकालीन जीवनातल्या घटनांचा किंवा प्रसंगांचा पट उलगडून दाखवण्याच्या पूर्वदीप्ति (Flash back) पद्धतीचा प्रयोग लेखक करू लागले.

० मनुष्याच्या प्रकट व अप्रकट मनात विविध पातळ्यांवर प्रवाहित असलेल्या संज्ञा-प्रवाहाचे चित्रण करण्याकडे प्रवृत्ती होऊ लागली.

० कादंबरीतील घटना व पात्रे यांच्या क्रिया-प्रतिक्रियांतील स्थूल तार्किक कार्य-कारण भावाचे महत्त्व कमी झाले. जीवन पुष्कळसे अतार्किक असल्याचे प्रत्ययास आल्यामुळे कार्यकारण भावाचा आग्रह कमी झाला.

० कादंबरीचा विकास क्रमबद्ध, कालक्रमानुसारी न राहता अव्यवस्थित (असंबद्धही) दिसू लागला परंतु या अव्यवस्थित स्वरूपामागे लेखकाची सौंदर्य-चेतना सजग राहिली.

० स्वगत शैलीमध्ये कादंबऱ्या लिहिल्या जाऊ लागल्या. पात्राच्या अन्तर्मनाच्या संवेदना वाचकासमोर प्रत्यक्षपणे ठेवण्याच्या दृष्टीने ही शैली सोईची वाटू लागली.[१] स्वगतांमध्ये तार्किकता किंवा विवेक-पूर्ण योजनेचा आभास कमी असेल अशी दक्षता घेतली जाऊ लागली.

मराठी कादंबरी आणि मानसशास्त्र

कोणताही कलाकार कलाकृतीची निर्मिती करताना मानसशास्त्रीय ग्रंथांची मदत घेऊनच त्यांना वाट पुसत जात असतो हे म्हणणे चुकीचे असले तरी आधुनिक कलाकृतींवर पडलेला मानसशास्त्राचा प्रत्यक्ष प्रभाव नाकारता येणार नाही. माणसाच्या अप्रकट मनाची शक्ती, प्रकट मनाला दिशा देण्याची त्याची ताकद, स्वप्ने, दिवास्वप्ने, प्रतीके, पूर्वग्रह निर्माण करण्याची त्याची क्षमता यांची जाण मानसशास्त्राच्या अध्ययनानेच आली आणि पुढे जाणीवपूर्वक या मसाल्याचा उपयोग होऊ लागला. परंतु त्या आधीही आपल्या अंतर्भेदी तीव्र प्रतिभेच्या बळावर व निरीक्षण शक्तीच्या योगाने प्रतिभाशाली लेखकांनी माणसाच्या मनाच्या खोल गुहांचा पत्ता लावला नव्हता असे नाही. हॅम्लेट, मॅकबेथ, किंग-लियर यांची स्वगते, डोस्टोव्हएस्की व टॉलस्टॉय यांची पात्रे मनोविज्ञानाची पुस्तके समोर ठेवून लिहिली गेली नव्हती. खरे म्हणजे अशा प्रतिभेतून निर्माण झालेल्या चमत्कारावरच युंगसारख्या मनोविज्ञानवेत्त्यांचा अधिक भर असे. अशा प्रतिभेचे गूढ नेहमीच अनाकलनीय राहील असे त्याला वाटे.[३]

१. 'The slice of life' of the nineteenth century realists here becomes the 'Slice of time'. From trying to capture the moment say the full of a flower– the artist begins to question whether the moment ever enisted. Only he knows that it does enist as a kind of eternal present.

– Ilid 147.

२. See– The psychological Novel page 81. – Leon Edel

३. See. Hodern man in search of a soul – C. G. Sung.

मराठी लेखकांमध्ये अशा प्रकारची प्रतिभा जरी फारशी दिसत नसली तरी काही कादंबरीकारांच्या कादंबऱ्यांचा अभ्यास करताना त्यांना मानसशास्त्राची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष जाण होती असे वाटते.

फडके मानसशास्त्राचे अध्यापक होते हे प्रसिद्धच आहे. मानसशास्त्रावर त्यांची पुष्कळ पुस्तकेही प्रकाशित झालेली आहेत. पण जुन्या कथाकारांची कैफियत मांडताना त्यांनी प्रस्तुत केलेले विचार मात्र बुचकळ्यात टाकतात. फडके म्हणतात–स्वभावरेखाटनाच्या दोन भिन्न भिन्न तऱ्हा आहेत. त्यांपैकी जुन्या पिढीतल्या लेखकांनी एक वापरली, आजचे लेखक दुसरी वापरू पहात आहेत. पहिली तऱ्हा अशी की, दुष्ट पात्र हे सर्वस्वी दुष्टच असलेले दाखवायचे, आणि सुष्ट पात्राचा स्वभावही निर्भेळ सुष्ट असलेला दाखवायचा. अमुक पात्र चांगले की वाईट रंगवायचे ही गोष्ट मनाशी पक्की ठरवायची आणि मग त्या पात्राचा तो तो स्वभाव रंगविताना त्यात विसंवादी स्वभावछटांची भेसळ अगदी होऊ द्यायची नाही. दुष्ट पात्राच्या हातून एकदेखील सत्कृत्य घडू द्यायचे नाही आणि सुष्ट पात्राच्या हातून एकदेखील अपकृत्य घडू द्यायचे नाही. इतकेच नव्हे तर अशा विसंगत कृत्याचा तरळतादेखील विचार त्यांच्या मनात कधी उद्‌भवलेला दाखवायचा नाही. अशा प्रकारे कादंबरीतली अगर नाटकांतली पात्रे रंगवून वाचकांपुढे अगर श्रोत्यांपुढे उभी केली की त्यांना (म्हणजे त्या त्या पात्रांना) बिलक्षण बंदिस्त आणि रेखीव स्वरूप आलेले असते, आणि ही सुष्ट दुष्ट पात्रे संस्मरणीय ठरतात. . . "[१] नवीन कलाकारांच्या स्वभावरेखनाबद्दल फडके म्हणतात : " नव्या लेखकांच्या पात्रात अनेक परस्परविरोधी प्रवृत्ती असल्यामुळे त्यांच्या चित्रात रेषांची व रंगांची गर्दी झाली आणि त्यांना ठसठशीतपणा येण्याऐवजी अस्पष्टपणा आला, आणि परिणामकारकतेच्या दृष्टीने ती दुबळी ठरली. स्वभावरेखाटनात आपण वास्तवता आणली या पराक्रमाचे समाधान त्यांना मिळाले, पण कलावस्तूतली चित्तवेधकता ते गमावून बसले. वास्तवतेच्या छंदाने नव्या लेखकांच्या कलेचा केलेला तो एक पराभव होता "[२]

या अवतरणाकडे लक्ष दिल्यावर स्पष्टपणे एक गोष्ट नजरेत भरते– फडके मानसशास्त्राचे प्राध्यापक असून सुद्धा जितके अंतर ते जीवन आणि कला यात ठेवू इच्छितात तितकेच मानसशास्त्र आणि कला यातही ठेऊ इच्छितात. दोन्ही गोष्टी वस्तुतः एकच. फडक्यांनी स्मृतिप्रवाह, अपघातात विस्मरण व पुनःस्मरण, स्वप्न, रोगांचे मानसशास्त्रीय विश्लेषण आणि त्याप्रमाणे उपाययोजना इत्यादी मानसशास्त्रीय मसाल्याचा आपल्या कादंबऱ्यातून खूप उपयोग करून घेतला परंतु त्याचा खोल असा प्रभाव त्यांनी आपल्या साहित्यावर होऊ दिला नाही: 'उद्धार' पासून 'हाक', 'कुहू ! कुहू !' 'ऋतुसंहार' पर्यंत हा उपयोग केला गेला आहे. पण हा सर्व प्रयोग कादंबऱ्या अधिक मनोरंजक बनविण्यासाठी, त्यात अधिक नावीन्य (?) आणण्यासाठी केलेला आढळतो. मानसशास्त्राच्या प्रकाशात माणसाचे बदललेले मनोविश्व, त्याच्या व्यक्तित्वात असलेला संमिश्रपणा, स्वभावाच्या वेगळ्या पातळ्या इत्यादींचा विचार त्यांनी कधीच केला नाही. त्यामुळे फडक्यांच्या सर्व विशाल वाङ्मयात माणसाचे खरे स्वरूप, कुठेच दिसत नाही. त्यांची पात्रे विलक्षण एकेरी आणि सरळ सपाट वाटतात. मात्र आश्चर्याची गोष्ट अशी की आपल्या 'स्वभावरेखन' प्रबंधात पु. ग. सहस्रबुद्धे यांनी त्यांना आपट्यांच्या नंतर चरित्रचित्रणविषयक कलेत निपुण म्हणून गौरवलेले आहे !

खांडेकरांनी फ्राइड वाचण्याचा प्रयत्न केला पण त्यांना तो फारसा कळला नाही असा नम्रतापूर्वक कबूलीजबाब त्यांनी दिला आहे. मात्र 'जळलेला मोहर" या कादंबरीत त्यांनी कामवासनेचे जीवनात असलेले महत्त्व आवर्जून वर्णन केले आहे. र. धों. कर्वे यांच्याखेरीज या विषयाकडे कुणी लक्ष दिले नाही अशी तक्रारही त्यांनी केली आहे. खांडेकरांनी चरित्रचित्रणाची अवलंबिलेली दिशा पाहिली की त्यांचा

१. २. } नव्या–जुन्या कथाकारांचे वाग्युद्ध !

कबुलीजबाब प्रांजळ आहे असे वाटते. 'जळलेला मोहर' मध्ये कामवासनेच्या अतृप्तीच्या परिणामांच्या वेगवेगळ्या कथातून त्यांनी 'जळलेला मोहर' ही कादंबरी सजवली असली तरी या कादंबरीच्या नव्या तंत्रामागची प्रेरणा अपरिहार्यतेची नसून प्रयोगाकरिता प्रयोग करण्याचीच होती. (फडके अधिक प्रभावी होते याचा हा पुरावा). वा. म. जोशी, साने गुरुजींसारखे सात्विक स्वभावाचे लेखक समकालीन विचारांशी पूर्ण परिचय असला तरी कादंबरीलेखन करताना त्यांनी फ्राइड वगैरे मनोविज्ञानवेत्त्यांना आपल्या जवळपास फिरकू दिलेले दिसत नाही. वरेरकरांचा व्यावहारिक आदर्शवाद त्यांना या बारकाव्यात शिरूच देत नव्हता. त्यांच्या सर्व नायिका विचारांच्या दृष्टीने कितीही बंडखोर असल्या तरी एकसूरीच वाटतात. एकंदरीत फडक्यांचा कलावाद, खांडेकर–जोशांचा आदर्शवाद आणि वरेरकरांचा ध्येयवाद यात सापडलेली मराठी कादंबरी जीवनाच्या अंतःस्वरूपाकडे जायला खूपच बिचकत होती यात शंका नाही. यात केतकरांचा नैतिक वर्जनांची (Taboos) पर्वा न करणाऱ्या लेखकाचा वेगळेपणा उठून दिसला तरी त्यांना कादंबरी या कलाप्रकाराकडे लक्ष पुरवायला सवडच झाली नाही.

माडखोलकरांच्या कादंबऱ्या

या पार्श्वभूमीवर दोन वैदर्भी कादंबरीकारांनी मात्र कळत न कळत खूपच मजल मारलेली दिसते. त्यापैकी एक माडखोलकर व दुसरे पु. य. देशपांडे. या कादंबरीकारांच्या कृतित्वाचा या दृष्टीने विचार मराठीत झालेला आढळत नाही.

'मुक्तात्मा' कादंबरी राजकीय म्हणून जितकी गाजली तितका मानसशास्त्रीय दृष्टीने तिचा विचार झालेला दिसत नाही. वस्तुतः 'मुक्तात्मा' कादंबरीचा बराच मोठा भाग केशव आणि ललिता यांच्या परस्पर सूक्ष्म प्रेमसंबंधाच्या धाग्यांनी विणलेला आहे. केशवच्या आईला ललितेच्या वडिलांनी पाहिले तेव्हापासूनच त्यांच्या मनात तिच्याबद्दल एक आगळे आकर्षण उत्पन्न झाले. परंतु आपल्या वहिनीबद्दलच्या ह्या प्रच्छन्न प्रणयाची त्या वेळच्या समाजात जी परिणती होणे शक्य होते तीच झाली –भावनेचे कठोर दमन आणि उदात्तीकरण ही परंपरा पुढच्या पिढीत संक्रांत झाली. ललिता आणि किशोर चुलत भाऊबहीण. पण ललितेचे केशववरचे प्रेम अगदी अद्भुत आहे. ललिता आपल्या मैत्रिणीजवळ म्हणते "....सुमा तुला कल्पना नाही ग माझं त्याच्यावर किती प्रेम आहे ! ते चुलतभावंडांचं एकमेकांवरील प्रेम – हे थोडं उत्कट आहे एवढंच – असं तू समजत असशील. तसं असतं तर खरोखरीच फार बरं झालं असतं. पण तसं नाही ग. शैशवातला सहचर अन् कौमार्यातला खेळगडी – त्याच्या विषयींची आवड कोणत्याही मुलीच्या मनात जन्मभर कायम राहाते. पण नुसत्या एवढ्याच कारणामुळे बापू मला प्रिय नाही. सुमा, माझं त्याच्यावर किती अन् कोणत्या प्रकारचं प्रेम आहे, ते मी तुला कसं सांगू ? – माझी मला सुद्धा त्याची पुरी ओळख पटलेली नाही ! त्याचं रूप, त्याचं भाषण, त्याच्या कविता, त्याची वाद घालण्याची पद्धत त्याची अशी कोणती गोष्ट आहे की जी मला प्रिय नाही ? त्याला पाहिल्याबरोबर, त्याची आठवण होताक्षणीच अन् त्याच्याविषयी विचार मनात येताच इतके कोमल, इतके उन्नत भाव माझ्या अंतःकरणात उचंबळून येतात की, माझं स्वतःचं सारं अस्तित्व त्यात विरून जातं. जगाच्या दृष्टीनं तो माझा भाऊ आहे,– मला सुद्धा एका काळी तसंच वाटत होतं, पण अलीकडे या वर्षा सवा वर्षात मला हे पक्कं कळून चुकलं की, मला तो जो इतका आवडतो, तो काही केवळ भाऊ म्हणून नव्हे किंवा प्रियकर म्हणूनही नव्हे. प्रियकराविषयी ज्या प्रकारच्या भावना मनात उत्पन्न व्हाव्या लागतात, तसल्या भावना त्याच्याविषयी माझ्या मनात कधीही आलेल्या नाहीत. मग मी त्याला प्रियकर तरी कसा म्हणू ? एकाद्या तरुणाला प्रियकर न मानताही त्याच्यावर अगदी निराळ्या प्रकारचे उत्कट प्रेम करणं स्त्रीला अशक्य आहे का ? कधी कधी मला असं वाटतं की द्रौपदीचं श्रीकृष्णावर जसं प्रेम होतं– काकी नेहमी सांगत असे की, पिता, पती आणि पुत्र यांच्यापेक्षा द्रौपदीला श्रीकृष्ण जास्त प्रिय होता – तसं माझं त्याच्यावरले प्रेम आहे. त्या प्रेमाला नाव नाही, रूप नाही, अन सीमा नाही ! माझी मीच त्याच्याविषयी विचार करू लागले म्हणजे गोंधळून

जाते. पण एवढं मात्र खरं की त्या प्रेमाशिवाय मला जगणं अशक्य आहे. ललिता यौवनात प्रवेश करू लागली आहे. या अवस्थेत वैषयिक भावना चेतावल्या तरी उदात्ततेचे वेडही जबरदस्त असते. तसेच सामाजिक, कौटुंबिक आणि नैतिक संस्कारांचे नियंत्रण तिच्यावर आहे. याचाच परिणाम त्यांच्या संबंधात एक सूक्ष्मता आणि जटिलपणा आलेला आहे. हे आकर्षण कुठेही शारीरपातळीवर प्रकट होत नाही.

केशव चंद्रशेखरकडे ओढला जातो. यामुळे ललिता चंद्रशेखरबद्दल तिरस्कार आणि संताप व्यक्त करते. चंद्रशेखरचे व केशवचे वाढते संघटन व चंद्रशेखरपासून केशवला बाजूला करणे अशक्य आहे असे पाहिल्यावर ललिता आजारी पडते. केशव आपली पूर्ण उपेक्षा करीत चालला आहे हे पाहिल्यावर आजारी झालेली ललिता मरणापूर्वी म्हणतेच, " मला तर केव्हा केव्हा असं वाटतं की, बाबूवरचं माझं वेडं प्रेम अखेर एक दिवस माझा बळी घेणार.... " आणि शेवटी ललिता मानसिक आणि तज्जन्य शारीरिक अस्वास्थ्यामुळे प्राणोत्क्रमण करते. भाऊ बहीण यांच्यामधल्या विचित्र गूढ अशा प्रेमाची परिणती ललितेच्या मृत्यूमध्ये होणेच स्वाभाविक होते. तिच्या अनेक स्वगतांतून व संवादातून तिच्या मानसिक ताणांची चांगलीच कल्पना येते.

याच कादंबरीत केशव -चंद्रशेखर यांचे मित्रप्रेमही तपासण्यासारखे आहे. लेखक स्वतःच वर्णन करतो–, " आणि खरोखरच त्या दोघांचे प्रेम शब्दातीत होते. प्रेमाच्या भावना जितक्या सूक्ष्म आणि सांद्र तितके त्याचे स्वरूप उत्कट आणि अगम्य. चंद्रशेखरच्या सन्निध असताना आणि नंतरही त्याच्या मनात इतक्या अननुभूत भावनांचे कल्लोळ उठत की, मानवी संबंधांचे धागेदोरे उकलावयाला अद्याप समर्थ न झालेली त्याची बुद्धी त्याविषयी विचार करताना अगदी गोंधळून जात असे. – चंद्रशेखराने काहीही न बोलता त्याचा नुसता हात जरी प्रेमाने दाबला, तरी त्याच्या मनाचा तो क्षोभ आणि ती व्यथा नाहीशी होत असे. "

एके ठिकाणी चंद्रशेखरही म्हणतो, " मला जर आज कुणाचा आधार वाटत असेल, तर तो तुझ्या सहानुभावाचा. दोन व्यक्तींचं एकमेकांवरचं असीम प्रेम ही दुनियेतली एक और चीज आहे.– स्फूर्ती देण्याचं जे सामर्थ्य त्या प्रेमात असतं, ते जगातल्या दुसऱ्या कोणत्याही वस्तूत नसतं. कदाचित तत्कालीन सामाजिक परिस्थितीत स्त्रीपुरुषांना एकत्र येऊन प्रेमाची देवाण घेवाण करण्याच्या बाबतीत असलेल्या अनेक प्रकारच्या निर्बंधातूनही दोन युवकांच्या या प्रेमाला विचित्र उत्कटपणा आला असावा.

– याच कादंबरीत माडखोलकर असामान्य व्यक्तित्वाबद्दल एका पात्राच्या तोंडून म्हणवितात– " आपले सारे वैदिक ऋषि हे स्वैराचारी– मनःपूत वागणारे होते. द्रष्टा म्हणजे सत्पुरुष नव्हे. किंबहुना तो सत्पुरुष कधीच नसतो आणि त्याच्या वर्तनात सुसंगतीही फारशी नसते. लोक सत्पुरुष कोणाला म्हणतात ? .... तर समाजाची, नीतीची जी अनुशासनं स्वतःच्या बुद्धीला पटणार नाहीत, ती बेलाशक लाथाडून द्रष्टा आपला मार्ग काढतो. त्याचं द्रष्टेपण हे त्याच्या लोकोत्तर अवलोकनावर आणि अनुभवांवरच अवलंबून असतं. जगातील खऱ्या गूढ कल्पनांच्या पलीकडे जाऊन तो पहातो, म्हणूनच तो द्रष्टा. " प्रतिभाशाली व्यक्तीसंबंधी मत पहा– " एका पाश्चात्य तत्त्वज्ञान्यानं असं म्हटलं आहे की, प्रतिभाशाली मनुष्याची बुद्धि विकृत झालेली असते. किंबहुना बुद्धीच्या विकृतीचा अत्युच्च प्रकार म्हणजेच प्रतिभा. आणि प्रतिभावंतांच्या या बौद्धिक विकृतीतूनच नवीन कल्पनांचा– नवीन तत्त्वांचा उदय होत असतो. पण, बौद्धिक विकृती म्हणजे तरी काय ? तर विचारांच्या रुळलेल्या मार्गात रखडण्याचं नाकारून स्वतंत्र स्फूर्तीनं नवा मार्ग– नवा मनू निर्माण करण्याचा उन्मुक्त बुद्धीचा प्रयत्न. . " माडखोलकरांच्या वरील सर्व उद्धरणांवरून फ्राइडच्या त्यांच्या अध्ययनाची कल्पना यावी.

माडखोलकरांच्या पात्रांवर कुंठित व रुग्ण मनोवृत्तीचा आरोप केला गेला परंतु फ्राइडच्या विचारांच्या प्रकाशात माडखोलकरांच्या पात्रांचा विचार केला तर माडखोलकरांना एका गोष्टीचे श्रेय द्यावे लागेल. नायक, नायिका यांच्याबद्दल असलेल्या आदर्शवादी किंवा रोमँटिक कल्पनेवर माडखोलकरांनी प्रथम

आघात केला. अशा जटिल मनोवृत्तींच्या नायिका मराठी कादंबरीत यापूर्वी दिसत नाहीत.

माडखोलकरांची नायिका 'भंगलेले देऊळ' मध्ये म्हणते– "अवघ्रात पुष्पांची अपेक्षा करण्याचे ते युग संपले आता" या वाक्यावर नैतिक दृष्टिकोणातून जितकी प्रखर टीका झाली तितकी मानसशास्त्रीय पार्श्वभूमी दुर्लक्षिली गेली. टीकाकारांची बदलत्या परिस्थितीशी संधान राखण्याची तयारी नव्हती हे स्पष्टच आहे. 'दुहेरी जीवन' मधील नायिकेच्या बद्दल पतीच्या व्यभिचारी जीवनाचे समर्थन करणारी म्हणून टीका करण्यात आली. या कादंबरीतला नायक उच्चपदस्थ, प्रतिष्ठित आणि सामाजिक कार्यकर्ता आहे परंतु त्याचे वैयक्तिक जीवन व्यभिचारांनी कलंकित बरबटलेले आहे. माडखोलकरांनी त्याच्या बालपणाचे वर्णन केले आहे ते असे– अतिशय लाड, तीव्र बुद्धी आणि त्यात पित्याचे व्यभिचारी जीवन यामुळे त्याच्या अंतर्मनावर फार मोठा परिणाम होतो. पित्याचे लौकिक जीवन सन्मान्य होते. परंतु वैयक्तिक जीवन व्यभिचारी होते. कुटुंबात लहान मुलावर जो प्रभाव पडतो तो त्याच्या भावी जीवनावर किती विलक्षण आणि प्रचंड परिणाम करतो याचे फ्राइडने वर्णन केलेले आहे. ते या ठिकाणी लक्षात घ्यायला हवे. याच कादंबरीत नायकाचे आपल्या चुलत बहिणीबद्दलच्या आकर्षणाचा भाग आहे. सुशील नावाच्या मित्राबद्दल गूढ आकर्षणाचाही उल्लेख आहे. त्यात शिरीनबद्दलचे नायकाचे उत्कट प्रेम सफल न होता नायक प्रेमभंगाच्या दुःखामुळे विलक्षण अस्वस्थ झालेला दाखविला आहे. भोगाची संवय तर त्याला तिच्या संगतीत लागलीच होती . हेलनवरचे त्याचे प्रेमही सफळ होत नाही. सुलोचनेचा भाऊ त्याचा अपमान करतो आणि म्हणून तिच्याबरोबर विवाह करण्याचा त्याचा निश्चय अधिक कणखर होतो हेही लक्षात घेण्यासारखे आहे, पत्नीवर त्याचे तसे प्रेम नसते आणि म्हणूनच त्याचा विवाहोत्तर विकास होऊ शकला असेही तो म्हणतो. विवाहोत्तर जीवनात सुंदर वेश्या, ॲगाथा आणि क्षमा देशपांडे त्याच्या जीवनात येतात. तो म्हणतो, " मी जर हिणकस असेन, तर तो माझ्यावर झालेल्या संस्कारांचा आणि मला आलेल्या अनुभवांचा परिणाम आहे, त्याला मी काय करू ? " माणसाच्या अंतर्मनातील प्रवृत्ती याच त्याची नियती असते आणि या प्रवृत्ती बालपणातच खूपशा विशिष्ट आकार घेतात असे फ्राइड म्हणतो.

या कादंबरीतल्या नायकाचा वेगळेपणा तत्कालीन मराठी कादंबरीत लक्षात घेण्यासारखा आहे आणि त्याच्या मुळाशी फ्राइडच्या तत्त्वज्ञानाचा पाया आहे. या नायकामध्ये अजाणता एक आत्मसमर्थनाची वृत्तीही शिरली आहे. तो म्हणतो, " पण क्षमा, मी काही एकटाच हिणकस नाही. या दुनियेत जगाच्या बाजारातील सगळीच चलती नाणी आपआपल्या परीने हिणकस आहेत. " कादंबरी डायरी पद्धतीने लिहिलेली असल्यामुळे ही स्वसमर्थनाची प्रवृत्ती एकंदर आशयावर खूपच परिणाम करते. त्याचमुळे हा नायक आपल्या आत्मान्वेषणाची सुरवात जितक्या निराशेत , आत्मग्लानीत करतो तो सूर शेवटपर्यंत रहात नाही. आत्मसमर्थनाचा सूर प्रबळ होतो त्यामुळे प्रसंगांच्या व घटनांच्या वर्णनात आत्मग्लानीची आग नसून उपभोगाच्या विकृत आनंदाचा स्पर्श अधिक आहे.

माडखोलकरांची 'शाप' कादंबरी प्रसिद्ध झाल्यास्वर उपयोगितावादी आणि नीतिवादी दृष्टीतून कटु टीका झाली. मानसशास्त्रीय दृष्टिकोणातून या कादंबरीचे परीक्षण झालेले दिसले नाही. लैंगिक वासनांच्या दमनातून उद्भवणाऱ्या दुष्परिणामांचे चित्रण या कादंबरीत केलेले आढळते. ध्येयवादी निशिकांत जेलमधून आला आहे आणि ध्येयवादाच्या ऊर्मीत सुहासबरोबर विवाह करण्याचे तो नाकारतो. मनुष्याच्या स्वभावात मूलभूत असा फरक कधीच पडत नाही. 'केवळ मध्ये मध्ये त्याचे बहिरंग बदलत असते' असे त्याचे मत असते. एका बाजूला ध्येयवादामुळे मनाचा कठोर निग्रह आणि दुसऱ्या बाजूला प्रेयसी सुहासच्या सान्निध्यात तीव्रतर होत जाणारी वासना यांच्यातला संघर्ष त्याच्या अंतर्मनात चाललेला असतो. याचा परिणाम निद्रावस्थेत तो सुहासच्या खोलीत जातो. अशा स्थितीत एक क्षण असा येतो की लच्छीच्या मादक शरीराचा मोह त्याला तिचे चुंबन घेण्यास भाग पाडतो. हा आपला अपराध सुहाससमोर स्पष्ट करताना निशिकांत म्हणतो '. . . निराशेचा

केवढाही गहन अंधार भोवती पडलेला असला, तरी प्रेमाच्या प्रकाशात आपण एकमेकांना अहोरात्र पहात असतो, मनाने अहोरात्र एकमेकांच्या सान्निध्यात असतो. त्यामुळे मनावर बेसुमार ताण पडून वासना एखादे वेळी बेफाम होतात. ब्राऊनिंगच्या त्या जोग्याचे उद्‌गार तुला आठवतात ना ? "Flesh and blood. That's all I'm made of ! " आत्मिक सामर्थ्याच्या, मनोनिग्रहाच्या कितीही गप्पा माणसानं मारल्या, तरी अखेर रक्तमांसाचा पुतळा आहे तो न् शरीराची भूक शेवटी मात करते त्याच्या साऱ्या ध्येयवादावर ! ख्रिस्तानं म्हटलं आहे तेच खरं. – ' The sprit indeed is willing but flesh is weak. मनाच्या विकल स्थितीत तिच्या तारुण्यानं मोह घातला मला'. नायिका सुहासही आपल्या भावापाशी निशिकांतचे समर्थन करताना म्हणते, " शरीराच्या स्वाभाविक गरजा मनुष्याने कितीही दाबून टाकण्याचा प्रयत्न केला, तरी त्याच्या आयुष्यात केव्हा ना केव्हा तरी असा एक क्षण येतो की, ज्यावेळी मन नको नको म्हणत असता अतृप्ततेनं तळमळणारं शरीर त्या गरजांच्या हांकेला बेगुमानपणे उत्तर देतं !" स्त्री-पुरुषांच्या स्वभावभिन्नतेचे वर्णन करताना ती म्हणते – स्त्रीचं हे देवतापण म्हणजे तिच्यावर शतकानुशतके घडत आलेल्या संस्कारांचा एक परिणाम आहे केवळ ! युगानुयुगं जी संयमाची, स्वार्थत्यागाची, चारित्र्याच्या शुद्धतेची शिकवण तिला देण्यात आली आहे, तिच्यामुळे हे देवतापण आलं आहे तिला. स्त्री ही पुरुषाप्रमाणं मनुष्यच आहे एक. ज्या वासना न् विकार पुरुषाच्या मनाची तीव्रतेनं गांजणूक करतात त्या स्त्रीला कमी छळतात असं नाही. पण त्यांचा छळ मुकाट्यानं सोसण्याचं जे शिक्षण समाजघटना तिला लहानपणापासून देत असते, त्यामुळे ती पवित्र राहते, मोहाचा संसर्ग तिला होत नाही सहसा– मला मोह पडला नाही आणि निशिकांतांना पडला. हा सारा परिस्थितीचा खेळ आहे. त्यामुळे मी चांगली ठरत नाही किंवा ते वाईट ठरत नाहीत. माझं प्रेम दिव्य ठरत नाही किंवा त्यांचं ठिसूळ ठरत नाही. " माणसाच्या नैतिक दुर्बळपणाबद्दल व स्खलनशीलतेबद्दल सहानुभूती, मनुष्यस्वभाव व त्याच्या आचरणापाठची परिस्थिती किंवा नियती यांचे संकेत, स्त्रीपुरुष प्रेमावरचा झिरझिरीत आध्यात्मिक पडदा टराटर फाडून त्याची भौतिक व्याख्या, वासनेची प्रबळता व तिच्या पूर्तीची आवश्यकता, दमन आणि त्याचा विस्फोट, अनैतिक (Incest) प्रेम किंवा त्याचे उदात्तीकरण, मनुष्यस्वभावाचा अनेकपदरीपणा, समलिंगी आकर्षण, नीती अनीतीचा बदललेल्या संदर्भात नव्या दृष्टीने विचार, व्यक्तिवादी प्रवृत्ती– या सर्वांचा विचार करता माडखोलकरांनी फ्राइडच्या अभ्यासाने मराठीत खूपच कल्पनांना धक्के देण्याचा प्रयत्न केला असे म्हटले पाहिजे.

पु. य. देशपांडे

मराठी कादंबरीत माडखोलकरांच्या कादंबरीमागे एक सलग अशी मानसशास्त्राची प्रेरणा जाणवते तर पु. य. देशपांडे यांच्या कादंबऱ्यांतून ही जाण अंतर्मनात असलेली दिसते. त्यांच्या कादंबऱ्यातील अपरिहार्य प्रतीकांचा विचार करताना असे वाटते की मानसशास्त्राची बैठक ही जाणनबुजून दिलेली नसून अनायासे लाभलेली आहे. ती एक अंतर्मनाची निकड आहे असे जाणवते.

' सुकलेले फूल ' मधली विधवा नायिका आपल्या बालजीवनातला सहचर आणि भावी पती केशव याच्याबरोबर मोठ्या उत्साहाने शिकू लागते. पण आजारी होते. तिचा आजारीपणा मोठा विचित्र आहे. तिला बरेच व्हायचे नसते. विवाहाचा दिवस येत जातो तसा तिचा आजारीपणा वाढत जातो. आणि तीही बेपर्वा होते. " दुर्लक्ष होई ते आपोआपच होई व ते होऊन गेल्यावर माझ्या लक्षात येई. याला माझा नाइलाज होता. माझा आजार पुन्हा बळावल्याबद्दल दैवाला दोष देण्यापेक्षा मी या माझ्या वृत्तीलाच दोष देईन. कित्येकदा मला या वृत्तीचा इतका राग येई ! पण. . पण काय ? " – " एखादवेळी मनात येई की, माझ्या या चमत्कारिक वृत्तीचे काय कारण असेल असे केशवालाच विचारावे. पण का कुणास ठाऊक, केशवाला विचारण्याची कल्पना मनातल्या मनातच विरून जाई. केशवला विचारले तर त्याला कदाचित फार फार वाईट वाटेल अशी भीती वाटे. असे वाटण्याचे कारण जर मला कुणी विचारले असते तर मला मुळीच सांगता आले नसते. माझी वृत्ती केशवच्या प्रीतीशी विसंगत आहे की काय

अशी मला मधून मधून शंका येई. व म्हणूनच मी या बाबतीत केशवला विचारण्यास मुळीच धजले नाही. त्यावेळी मात्र केशवबरोबर विवाह न करण्याचा तिचा निश्चय दृढ होत जातो. या अंतर्मनाच्या बळामुळे तिची प्रकृतीही सुधारते. तिचे आणि दिवाकराचे प्रेम विवाहात परिणत होत नसले तरी सामाजिक बंधनांना झुगारून देण्याची शक्ती तिच्यात येते.

'सदाफुली' ची नायिका मानसशास्त्रीय दृष्टीतून अभ्यासण्यासारखी आहे. तिमाला फुलांचे वेड असते. सुंदर फुले ती तोडते पण तत्काळ त्यांना विसरूनही जाते! रोग्यांची सेवा करण्याची तिला विलक्षण हौस. मात्र यात रोग्याच्या स्वास्थ्याची चिन्ता अधिक की रुग्णसेवा करण्यातले तिचे सुख अधिक हे ठरविणे कठिण. रोग्यांची सेवा करताना ती कलात्मकतेचा परिचय देते. तासन् तास ती सजत बसेल पण कुंकू लावण्याचे मात्र विसरून जाईल. अशोकवर तिचे प्रेम आहे पण या प्रेमात सत्याचा अंश किती आहे हे ठरविणे कठिण. कारण अशोकच्या करुणापूर्ण चेहऱ्याबद्दलचे आकर्षण अधिक वाटते. शंतनू तिचा भाऊ नाही. एक पाळलेला मुलगा. अर्थात तिमाला हे रहस्य अज्ञात. पण या शंतनूबद्दल तिच्या मनात रहस्यमय प्रेम आहे. तिचे वडील शंतनूला घराबाहेर काढताना त्याच्या जन्मरहस्याचे गुपित उघडे करतातच पण विषारी साप म्हणून त्याची संभावना करतात. तिमाला हे खूप उशीरा कळते. ती म्हणते, " मला हे सारं आधी कळलं असतं तर ? " . . . सापाचं विष मी गिळून टाकलं असतं आणि मग बाबांना त्या विषाची मुळीच भीती वाटली नसती. " तिमाला जेव्हा हे सारे कळते त्या आधीच तिने अशोकाला विवाहाचे वचन दिलेले असते. पण अशोकशी विवाह करण्याची तयारी मात्र तिची होत नाही. समाज, आई-वडिलांचा विरोध यांच्या आधारे विवाह टाळण्याचा ती प्रयत्न करते. वस्तुतः हा सर्व तिच्या अंतर्मनाचा युक्तिवाद असतो. पण जेव्हा शंतनूच तिला रागावतो तेव्हा सर्व त्याग करून ती अशोकशी विवाह करते. एकप्रकारे विवाहास तयार होणे हाही तिच्या शंतनूवरच्या प्रेमाचाच एक प्रकार आहे असे म्हणावे लागते. पण या अग्निदिव्यातून ती पोळून बाहेर पडते कारण अशोकबद्दल ती इतकी निर्विकार व थंड असते की नवविवाहित स्त्रीमध्ये स्वाभाविक असलेल्या आनंदाचा अंशही तिच्यामध्ये नसतो. लेखकाने कुठेही मानसशास्त्रीय विवेचन किंवा स्पष्टीकरण केलेले नाही. मानसशास्त्रीय प्रणालींचा जाणून बुजून प्रयोग केलेला नाही. पात्रांच्या क्रिया-प्रतिक्रिया, चिंतन, मनन, विकार सर्व वाचकांपुढे ठेवून मानसशास्त्रीय विश्लेषण किंवा आकलन करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवतो. युंग अशा कादंबऱ्यांचा अभ्यासच मानसशास्त्राच्या दृष्टीने अधिक उपयोगी असतो असे म्हणतो.[१]

'नवे जग' कादंबरीतली तरुलता आणि विना नात्याने दूरची भावंडे आहेत. विना आतेभाऊ आहे. विनावर तरूचे प्रेमही असते. पण विनाच्या अस्तित्वात विलीन व्हायला लावणारे आणि स्वतंत्र आपले अस्तित्व ठेऊ न देणारे हे प्रेम तिच्या व्यक्तित्व-विकासाच्या दृष्टीने बाधक आहे आणि तरुलतेच्या अस्मितेला हे पटत नाही. बंदुकीचा नेम मारायला शिकवताना तरुलता बाहुपाशात अंसतानाही विना अविचलित रहावा-स्थिर रहावा ही गोष्ट तिच्या अहंकारावर जोराचा आघात करते. ती म्हणते,

---

१. The novels which are most fruitful for the psychology are those which the author has not already given a psychological interpretation of his characters and which therefore leave room for analysis and explaination, or even invite it by their mode of presentation....... In psychological novels, on the other level, the author himself attempts to reshape his material so as to raise it from the level of crude contingency to that of psychological exposition and illumiation– a procedure which all too often clouds the psychological significance of the work or hides it from view.

Modern Man in search of a Soul, page 178
– C. G. Jung

' केवळ नेम अचूक साधता येण्याचे एक साधन अशाच दृष्टीने तो माझ्या साऱ्या शरीराकडे पहात होता– निर्जीव बंदुकीप्रमाणेच माझ्या सजीव शरीराची तो तितक्याच निर्विकार वृत्तीने हालचाल करीत होता. ती बंदूक आणि माझे ते त्याच्या शरीराला चिकटून असलेले शरीर यांच्यात त्याच्या दृष्टीने यत्किंचित फरक नव्हता– माझ्या शरीरातील कणाकणांची ती थरथर, अंतर्यामीचे ते अमर्याद आंदोलन – सारे, सारे त्याच्या दृष्टीने अर्थशून्य होते ! अर्थशून्य इथूनच तिच्या मनात विनाविरुद्ध विद्रोह उत्पन्न होतो. विनाशी अखंड विरोध करूनच ती त्याच्याबद्दलचे आपले प्रचंड आकर्षण रोखू शकली असती– आपल्या व्यक्तित्वाचा सन्मान करू शकली असती. विनाने आपल्याकडे लक्ष द्यावे म्हणूनच ती अरविंद बरोबर फिरते, त्याच्या बरोबर विवाह करू इच्छिते. अरविंद युद्धावर जाण्याच्या एक दिवस आधी तिचा अंतर्विरोध अतिशय प्रबळ होतो. तिच्या मनात विचार आणि विकार यांचा कल्लोळ उठतो–– "अरविंदाला जे हवं आहे ते देण्याला तुझं मन का बरं कचरतं ? –– तुला असं वाटतं की, अजूनही विना तुझ्याकडे येईल, तुला जवळ घेईल अन् मग वर्ध्याच्या स्टेशनवरील त्या दिव्य क्षणाच्या उन्मादकारी विश्वात तुझं जीवन कायमचं विलीन होईल ! विनाच्या भूमिकेशी तुझा तो आततायी विरोध, विनाच्या 'नव्या जगाचा' विध्वंस करून आपलं स्वतःचं 'नवं जग' निर्माण करण्याची तुझी ती महत्त्वाकांक्षा – हे सारं सारं सोंग आहे, ते एक अमानुष थोतांड आहे ती राक्षसी आत्मवंचना आहे ! . . .अरविंदाच्याच काय, शेकडो निरपराध तरुणांच्या प्रेतावरून नाचत नाचत तू अखेरीस विनाकडे जाशील ! . . . तेच , तेच तुला हवं आहे, आणि म्हणूनच अरविंदाला जे हवं आहे ते त्याला देण्यासाठी तुझं मन कचरतं आहे ! ' या अंतर्मनातील संघर्षानंतर किंचाळत उठलेली तरुलता त्याचक्षणी अरविंदाशी विवाह करते. अरविंद युद्धावरून विकलांग होऊन येतो–युद्धावरची आस्था संपते. सर्व तऱ्हेने हरलेली तरुलता विनाला मारण्यासाठी हातात पिस्तुल ठेवून फिरत असते. पण संधी मिळाल्यावर हॅम्लेटप्रमाणे तीही निष्क्रियच राहाते. शेवटी हे अंतर्द्वंद्व विचित्र तऱ्हेने संपते– " पिस्तुल गळून खाली पडले – विनाच्या गळ्याला मिठी मारून त्याच्या हृदयावर मी मान टाकली ! अंतर्मनातील अमर्याद आंदोलन अश्रूंचे पूर डोळ्यावाटे बाहेर लोटू लागले ". विना आणि तरू यांच्यातील प्रेमाचे हे संबंध अत्यंत तरल पातळीवर ठेवण्यात लेखक यशस्वी झाला आहे. प्रेम, अहं, द्वेष, आत्मीयता, वासना, पवित्रता इत्यादी भावांचे स्वरूप एकेरी न ठेवता त्यांचे जटिल व संमिश्र रूप व्यक्त केले आहे. प्रेम आणि घृणा एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

पुढे पु. य. देशपांडे सामाजिक जीवनाकडे आकर्षित झाले. परंतु मानसशास्त्राची डूब 'विशाल जीवन' व 'काळी राणी' कादंबऱ्यांतूनही दिसते. मानसशास्त्राच्या सिद्धान्ताबरहुकूम कादंबऱ्या लिहिण्याचा हव्यास पु. य. देशपांडे यांनी बाळगला नाही. त्यांच्या कादंबऱ्यात आलेले मनोविज्ञान कादंबऱ्यांचे सौंदर्य अधिक वाढवणारे आहे. त्यांच्या कादंबऱ्या मनोविज्ञानाचा वस्तुपाठ न बनता सुंदर कलाकृती म्हणून आधी वाचनीय झाल्या आहेत.

मर्ढेकर आणि त्यानंतर

मराठीत आशयाच्या दृष्टीने मानसशास्त्राचा प्रभाव माडखोलकर व पु. य. देशपांडे यांच्या कादंबऱ्यातून दिसतो. पुढे मर्ढेकरांच्या कादंबरीत (रात्रीचा दिवस) संज्ञा प्रवाहाचे चित्रण केले गेले आहे. एक फसलेला प्रयोग म्हणूनच तिकडे पाहिले पाहिजे. कानेटकर, व गंगाधर गाडगीळ यांनीही कादंबऱ्यांना मानसशास्त्राची बैठक दिली पण यावेळपावेतो मराठी कादंबरी काहीशी सलगपणे इतर ज्ञानशाखांजवळ बसू लागली आहे.

मराठी कादंबरीतील मानसशास्त्राचा हा प्रभाव विषयवस्तूच्या दृष्टीने जितका पडला तितका अभिव्यक्तीच्या दृष्टीने पडला नाही. याचे प्रमुख कारण असे की आपले सर्व कादंबरीकार मनाने खूपच स्वस्थ आणि नॉर्मल आहेत. (मर्ढेकर सर्वात 'नॉर्मल आणि म्हणूनच त्यांची मानसशास्त्रीय संज्ञाप्रवाहाची खटपट हास्यास्पदपणे फसली.) विषयवस्तू लेखकाचे मानसिक ताण अथवा त्याची ॲब्नॉर्मल वृत्ती आणि त्याचे शिल्प यांचा संबंध अत्यंत निकटचा असतो. या संबंधांचे फ्रेडरिक हाफमनने Freudianism and Literary Mind मध्ये केलेले विवेचन ध्यानात घेण्यासारखे आहे.

सारांश

कलेकरिता कला आणि मनोरंजन या ध्येयामुळे फडके मानसशास्त्रीय सत्यांचा पाठपुरावा करू शकले नाहीत, उद्बोधनाच्या घोषवाक्यामुळे खांडेकर, वरेरकर त्या वाटेस गेले नाहीत, सात्विकता जोशांच्या आड आली तर राजकारण किंवा तत्त्वज्ञानाची सांगड अनुक्रमे माडखोलकर व पु. य. देशपांडे यांनी मानसशास्त्राशी घालण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे निर्भेळ मानसशास्त्राचा प्रभाव असलेली मराठी कृती लिहिली गेली नाही. अलीकडच्या लेखकांत आरतीप्रभु यांच्या कादंबऱ्यांचा त्या दृष्टीने अभ्यास करण्यासारखा आहे. मोठी आवश्यकता आहे ती मराठी मनाच्या वर्जनांचा परिहार करण्याची. जयवंत दळवी, भाऊ पाध्ये आणि उद्धव शेळके यांनी हे रस्ता स्वच्छ करण्याचे काम केले आहे असे म्हणता येईल.

श्री. वा. वि. मिराशी

उत्तररामचरित आणि कुन्दमाला (उत्तरार्ध)

नाटकांचे पौर्वापर्य

' उत्तररामचरित ' आणि ' कुन्दमाला ' या दोन्ही नाटकांचा विषय राज्याभिषेकानंतरचे रामचरित हाच असल्यामुळे त्यात काही घटना समान आहेत. एवढेच नाही तर त्यांच्या वर्णनातील शब्दयोजनाही सारखी आहे. अशी अनेक स्थळे त्या नाटकाचे संपादक डॉ. कालीकुमार दत्त यांनी पूर्वी आणि डॉ. ह. द. सांकलिया यांनी अलीकडे दाखविली आहेत. या दोघांच्याही मते भवभूतीने ' कुन्दमाले ' च्या कर्त्याचे अनुकरण केले आहे. याच्या उलट प्रो. सुब्रह्मण्यम् ऐयर, डॉ. वूलनर, डॉ. सुशीलकुमार दे आणि जागीरदार यांच्या मते ' कुन्दमाले 'वरच ' उत्तर रामचरिता ' चा प्रभाव पडला आहे. पण त्यांनी या प्रश्नाचा सविस्तर विचार केला नाही. ' भिन्नरुचिर्हि लोकः ' या न्यायाने याबाबतीत सर्वसंमत निर्णय देणे कठीण आहे. तथापि पूर्वग्रह बाजूस सारून चिकित्सक दृष्टीने या प्रश्नाची समीक्षा केल्यास विचारी वाचकांचे ऐकमत्य होण्यास प्रत्यवाय नसावा. साम्याची काही स्थळे खाली चर्चिली आहेत :

हे साम्य दोन प्रकारचे आहे. (१) घटनासाम्य आणि (२) शब्दसाम्य. त्यांचा यथाक्रम विचार करू.

(१) **घटनासाम्य.** दोन्ही नाटके ' रामायणा'-तील कथानकावरच आधारित असल्यामुळे त्यात काही घटना समान आहेत. त्यांचा विचार येथे करावयाचा नाही. तर ज्या घटना रामायणात नसून नाटककाराने स्वतः कल्पिल्या आहेत त्यांची समीक्षा केली पाहिजे. अशा घटना ' उत्तररामचरिता ' त अनेक आहेत हे मागे दाखविले आहे. ' कुन्दमाले 'चे कथानक बहुतांशी रामायणानुसारी असल्याने त्यात कविकल्पित घटना त्या मानाने थोड्या आहेत. पण या दोन नाटकात समान असलेली मुख्य घटना म्हणजे सीतेने अदृश्य रूपाने रामाजवळ असणे आणि शोकावेगाने तो मूर्च्छित झाला असता त्याला शुद्धीवर आणणे ही होय. भवभूतीने रामाचा पंचवटी-परिसरातील प्रवेश विशिष्ट हेतूने योजिला आहे. पतीने विनाकारण आपला परित्याग केल्याचे शल्य सीतेच्या मनात सलत होते. तिला रामाच्या हृदयातील तिजविषयीचे दृढ प्रेम आणि तिच्या वियोगामुळे त्याला झालेला दुःसह शोक दाखवून तिची चित्तवृत्ती औदासीन्यातून कारुण्ययुक्त प्रेमात परिवर्तित करावयाची होती. ' उत्तररामचरिता ' च्या तिसऱ्या अंकाचा मुख्य उद्देश हा आहे. पंचवटीच्या परिसरातील पूर्वपरिचित स्थळे व पशुपक्षी पाहिल्यावर रामाचे दुःख अनावर होऊन त्याला मूर्च्छा येईल अशी भीती साहजिकच वाटून गंगेने तमसेबरोबर सीतेला आपल्या बरोबर पंचवटीस आणले होते. तेव्हा ' उत्तररामचरिता 'तील हा प्रवेश सहेतुक असून तो उत्तम साधला आहे. याच्या उलट ' कुन्दमाले 'च्या चौथ्या अंकातील तसलाच सीतारामांचा प्रवेश यदृच्छेने घडून आलेला आहे. आश्रमातील यज्ञधूमाने त्रस्त झालेले डोळे पाण्याने थंड करावे म्हणून राम दीर्घिकेत उतरतो, तेथे अदृश्य रूपाने असलेल्या सीतेचे प्रतिबिंब पाहतो; तिचे विसकटलेले केस व निस्तेज मुख यांवरून तिच्या दीर्घ वियोगदुःखाची त्याला जाणीव होते आणि तो मूर्च्छित होतो. सीता त्याला आलिंगन देऊन शुद्धीवर आणते. ' कुन्दमाले '-तील या प्रवेशात विशिष्ट हेतू नसल्याने तो कृत्रिम भासतो. त्यात उत्तरीयाची अदलाबदल आहे खरी, पण नाटकाच्या प्रगतीच्या दृष्टीने त्याला महत्त्व नाही.

' कुन्दमाले 'तील हा प्रवेश पाहून भवभूतीला 'उत्तररामचरिता 'च्या तिसऱ्या अंकातील प्रवेश सुचला असणे असंभवनीय आहे. भवभूतीची कल्पनाशक्ती दांडगी होती, हे उत्तररामचरितातील त्याने कल्पिलेल्या विविध प्रसंगांवरून स्पष्ट आहे. त्याला प्रस्तुत प्रसंगाकरिता दुसऱ्याची उसनवारी करण्याची जरूरी भासली असणे असंभवनीय आहे. याच्या उलट धीरनागाचे कल्पनादारिद्र्य लक्षात घेता त्यानेच भवभूतीची उसनवारी केली असणे जास्त शक्य आहे.

'छाया अंक' वरून अनुमान व त्याचे परीक्षण

' उत्तररामचरिता ' च्या तिसऱ्या अंकास ' छाया अंक ' असे नाव आहे. पण त्या अंकात रामाला सीतेची छाया किंवा प्रतिबिंब दिसत नसून सीता आपल्याजवळ असल्याचा भास होत आहे. याच्या

उलट 'कुन्दमाले'च्या चौथ्या अंकात राम सीतेची छाया (प्रतिबिंब) दीर्घिकेत पाहतो असा प्रसंग आला आहे. तेव्हा भवभूतीने तो अंक पाहिल्यावर आपल्या नाटकातील तत्सदृश अंकास 'छाया अंक' असे नाव दिलेले दिसते. अर्थात भवभूतीने कुन्दमालेचे अनुकरण केले असा निर्णय डॉ. कालीकुमार दत्त यांनी काढला आहे. हे प्रमाण त्यांना अगदी रामबाण वाटते. पण ते तसे नाही. 'छाया' शब्दाचे अनेक अर्थ होतात (१) सावली, (२) प्रतिबिंब (३) प्रतिमा, (४) कांती, (५) सौंदर्य, (६) सादृश्य, यांच्या बरोबर (७) भास, भ्रम, हा अर्थही कोशकारांनी दिला आहे.[१] 'उत्तररामचरिता'च्या तिसऱ्या अंकात रामाला पंचवटीच्या परिसरात सीतेचा भास होतो असा प्रसंग घातला आहे. म्हणून त्या अंकाला 'छाया अंक' असे नाव दिले असले तर ते योग्य आहे.

आता आपण दुसरा एक प्रसंग घेऊ. तो वरच्या इतका महत्त्वाचा नसला तरी प्रस्तुत चर्चेला उपयुक्त आहे.

'उत्तररामचरिता'च्या पहिल्या अंकातील चित्रदर्शनप्रसंग घ्याः ताटकावधानंतर विश्वामित्राने रामास दिलेल्या जृंभकास्त्रांचे चित्र सीतेला दाखविल्यानंतर राम म्हणतो, 'ही अस्त्रे तुझ्या अपत्यांना प्राप्त होतील.' पुढे वनवासाला जाताना वाटेत लागलेल्या भागीरथीचे चित्र पाहून राम तिला नमस्कार करतो, आणि 'अरुन्धतीप्रमाणे तू सीतेच्या कल्याणाची चिंता वहा' अशी तिला प्रार्थना करतो. शेवटी लक्ष्मणाला सीतेच्या त्यागाची आज्ञा करून निघून जाताना तो पृथ्वीला उद्देशून म्हणतो, 'भगवती वसुन्धरे, आपल्या सुशील कन्येचे रक्षण कर.' भवभूतीने या तिन्ही आवाहनांचे साभिप्रायत्व पुढील घटनात दाखविले आहे. कुश व लव यांना जन्मतःच जृंभकास्त्रांचे ज्ञान होते व त्यावरून पुढे रामाला हे सीतेचे पुत्र असावेत असे वाटते. 'रामायणा'त सीता वाल्मीकीच्या आश्रमात प्रसूत होऊन तेथेच बारा वर्षे राहिली होती असे वर्णिले आहे. पण अशा परिस्थितीत तिच्या मुलांना आपल्या मातापित्यांचे ज्ञान नसणे, तसेच रामाला एवढ्या दीर्घकालात सीतेची माहिती न समजणे असंभवनीय आहे. म्हणून सीतेने प्रसूतीचे क्लेश असह्य झाल्याने गंगेत उडी घेतली. गंगेने तिला पातालात नेऊन पृथ्वीदेवीच्या साहाय्याने तिचे व तिच्या मुलांचे संगोपन केले. असे भवभूतीने कल्पिले आहे. शेवटच्या अंकात उदकातून भागीरथी व पृथ्वी देवता वर येतात आणि सीतेला अरुंधतीच्या स्वाधीन करून रामाला म्हणतात, 'तू आम्हाला सीतेच्या कल्याणाची काळजी वाहण्यासाठी प्रार्थना केली होतीस. आम्ही तुझ्या प्रार्थनेप्रमाणे केले आहे.' याप्रमाणे भवभूतीने चित्रदर्शनप्रसंगीचे आवाहन साभिप्राय दाखविले आहे.

याच्या उलट 'कुन्दमाले'त सीतेला भागीरथीच्या तीरी सोडून जाताना लक्ष्मण लोकपाल, भागीरथी, तपोवनातील ऋषी, वनदेवता, अरण्यातील हिंस्र व इतर पशु आणि नद्या या सर्वांना सीतेच्या रक्षणाविषयी प्रार्थना करतो, पण त्या प्रार्थनेच्या पुढे नाट्यवस्तूकरिता उपयोग झालेला दिसत नाही. 'कुन्दमाले'तील लक्ष्मणाच्या प्रार्थनेवरून चित्रदर्शन प्रसंगातील जृंभकास्त्रांचा प्राप्तिविषयक उल्लेख आणि भागीरथी-पृथ्वीचे आवाहन भवभतीस सुचले असे कदापि म्हणता यावयाचे नाही. कारण मागे

१. मॉनियर विल्यम्स्, आपटे आणि वैद्य यांचे संस्कृत कोश पाहा. ज. वि ओक यांनी गीर्वाणलघुकोशात छाया शब्दाचा 'भ्रम', "भास" असा अर्थ दिला असून भागवतांतील पुढील श्लोकाचा (स्कंध ८, अ. ३ श्लो. १४) संदर्भ दिला आहे—

सर्वेन्द्रियगुणद्रष्ट्रे सर्वप्रत्ययहेतवे ।
असताच्छाययोक्ताय सदाभासाय ते नमः ।।

यावरील श्रीधरी टीका– असता अंहकारादिप्रपंचेन छायया असद्रुपया उक्ताय प्रतिबिम्बेन बिम्बमिव सूचिताय ।

भवभूतीच्या 'छाया अंक' या संज्ञेवरून 'कुन्दमाले'तील सीतेच्या छायेचा (सावलीचा) प्रसंग सुचला असावा असेही उलट पक्षीं म्हणता येईल.

अनुक्रमणिका

दाखविल्याप्रमाणे त्याचा नाटयवस्तूशी घनिष्ठ संबंध आहे.

(२) **शब्दसाम्य.** आता आपण शब्दसाम्याचा विचार करू. याची अनेक उदाहरणे पूर्वीच संशोधकांनी दाखविली आहेत. त्यांपैकी काही चर्चेकरिता घेऊ.

१. (अ) 'उत्तररामचरित' (अंक १)– पंचवटीच्या परिसरात जेव्हा राम वासंतीला सांगतो की 'परत गेल्यावर सीतेची प्रतिमा पाहून मी आपले मनोनिवेदन करीन', तेव्हा सीता उद्गारते–

'अम्मदे, उत्खातं मे इदानीं परित्यागशल्यमार्यपुत्रेण'

(ब) '**कुन्दमाला**' (अंक १) –लक्ष्मण रामाचा निरोप सीतेला सांगतो की, 'पुन्हा लग्न न करण्याचा माझा निश्चय असल्यामुळे भावी यज्ञात तुझी प्रतिमाच माझी धर्मपत्नी असेल,' तेव्हा सीता उत्तरते –

'एवं सन्दिशता आर्यपुत्रेण परित्यागदु:खं मे निरवशेषमपनीतम्।'

दोन्हीत तीच कल्पना जवळजवळ त्याच शब्दात आली आहे.

२. (अ) उ. च. (अं. ३)– पंचवटीत विमान उतरवताना 'अयि विमानराज, अत्रैव स्थीयताम्।' हे रामाचे शब्द ऐकल्यावर रोमांचित होऊन सीता उद्गारते– 'अम्महे, मेघमन्थरस्तनितगम्भीरमांसल: कुतोन्वेष भारतीनिर्घोषो भरन् कर्णविवरं मामपि मन्दभागिनीं इटित्युत्सुकापयति।

(ब) कु. मा. (अं. ३)– नैमिषारण्यात रामाचे लक्ष्मणास उद्देशून उच्चारलेले 'वत्स, वत्स' असे शब्द ऐकून जवळच दीर्घिकेच्या तीरी असलेली सीता म्हणते, " कोन्वेष: सजलजलदस्तनितगम्भीरेण स्वरविशेषेणात्यन्तदु:खभाजनमपि मे शरीरं रोमाञ्चयति।

दोन्ही उताऱ्यात रामाचा आवाज जलयुक्त मेघाच्या गर्जनेसारखा आहे हीच कल्पना जवळजवळ याच शब्दात आली आहे.

३. (अ) उ. च. (अं. ३, श्लोक १३) वियोगदु:खित रामाला पाहिल्यावर झालेली सीतेच्या हृदयाची अवस्था तमसा वर्णन करते –

तटस्थं नैराश्यादपि च कलुषं विप्रियवशा-
द्वियोगे दीर्घेऽस्मिञ्झटिति घटनोत्तम्भितमिव।
प्रसन्नं सौजन्याद्दयितकरुणैर्गाढकरुणं
द्रवीभूतं प्रेम्णा तव हृदयमस्मिन् क्षण इव॥

(ब) कु. मा. (अं.३) नैमिषारण्यात रामाला पाहिल्यावर सीता स्वत:च्या अवस्थेचे वर्णन करते–

'अहो दृष्ट इति परितोष:, चिरप्रवास इति मन्यु:, परिक्षाम इत्युद्वेग:, निरनुक्रोश इत्यभिमान:, दर्शनीय इत्युत्कण्ठा, स्वामीति बहुमान:, कुशलवयोस्तात इति कुटुम्बिनीसद्भाव:, अपराधं प्रवेशितास्मीति लज्जा। न जानामि आर्यपुत्रदर्शनेन कीदृशीमवस्थामनुभवामीति। – दोन्ही उताऱ्यात सीतेच्या मनातील विविध भावनांचा कल्लोळ तसाच वर्णिला आहे.

(४) (अ) उ. च. (अं. १, श्लो. ४५)- सीतेचा परित्याग करताना राम म्हणतो –

शैशवात्प्रभृति पोषितां प्रियै:
सौहृदादपृथगाशयां प्रियाम्।
छद्मना परिददामि मृत्यवे
सौनिको गृहशकुन्तिकामिव॥

(ब) कु. मा. (अं. १) – रामाज्ञेप्रमाणे सीतेला वनात सोडण्यास निघालेला लक्ष्मण म्हणतो –

'तदहमपि स्वजनविस्रम्भनिर्विशङ्कां देवीमादाय गृहहरिणीमिव वध्यभूमिं नयामि।

पहिल्या उताऱ्यात परित्यक्त सीतेची, ठार मारण्यास नेलेल्या घरच्या पक्षिणीशी आणि दुसऱ्यात घरच्या हरिणीशी तुलना केली आहे. दोन्हींतील कल्पना एकच आहे.

(५) (अ) उ. च. (अं. ६, श्लो. १२)–लवाला पाहताच आपले दु:ख नाहीसे झाले आणि त्याच्या विषयी प्रेम उत्पन्न झाले ह्याची मीमांसा करताना राम म्हणतो –

व्यतिषजति पदार्थानान्तर: कोऽपि हेतु-
र्न खलु बहिरुपाधीन् प्रीतय: संश्रयन्ते।
विकसति हि पतङ्गस्योदये पुण्डरीकं
द्रवति च हिमरश्मावुद्गते चन्द्रकान्त:॥

(ब) कु. मा. (अं. ५, श्लो. १०) कुशलवांना पाहताच रामाचे डोळे अश्रूंनी भरून येतात तेव्हा तो म्हणतो –

आपातमात्रेण कयापि युक्त्या
सम्बन्धिन: सन्नमयन्तिचेत:।
विमृश्य किं दोषगुणानभिज्ञ-
श्चंद्रोदये श्चोतति चन्द्रकान्त:॥

दोन्ही श्लोकात काही अज्ञात कारणांवरून हृदये आकृष्ट होतात ही कल्पना आहे. दोन्हीत चंद्र व चंद्रकांत मणी यांचाच दृष्टांत दिला आहे.

६. (अ) उ. च. (अं. ३, श्लो. २७)–पंचवटीच्या परिसरात रामाशी संभाषण करताना तो सीतेला पूर्वी कसा मानीत असे ते वासंती वर्णन करते –

त्वं जीवितं त्वमसि मे हृदयं द्वितीयं
त्वं कौमुदीनयनयोरमृतं त्वमङ्गे ।
इत्यादिभिः प्रियशतैरनुरुध्य मुग्धां
तामेव शान्तमथवा किमिहोत्तरेण ॥

(ब) कु. मा. (अं. १, श्लोक. १४) लक्ष्मण सीतेस रामाचा संदेश सांगतो –

त्वं देवि चित्तनिहिता गृहदेवता मे
स्वप्नागता शयनमध्यगता त्वमेव ।

–दोन्हीत कल्पना एकच. फक्त शब्द भिन्न.

७. (अ) उ. च. (अं. १, श्लोक १२) चित्र-दर्शनप्रसंगी लक्ष्मण रामाचे बालपणी जटाधारण वर्णन करतो –

पुत्रसंक्रान्तलक्ष्मीकैर्यद्‌वृद्धेक्ष्वाकुभिर्धृतम् ।
धृतं बाल्ये तदार्येण पुण्यमारण्यकं व्रतम् ॥

(ब) कु. मा. (अं. ४, श्लो. ५) –कण्व रामाच्या नैमिषारण्याविषयी आदराची प्रशंसा करताना म्हणतो,

आनाकमेकधनुषा भुवनं विजित्य
पुण्यैर्दिवः क्रतुशतैर्विरचय्य मार्गम् ।
इक्ष्वाकवः सुतनिवेशितराज्यभारा
निःश्रेयसाय वनमेतदुपाश्रयन्ते ॥

दोन्हीत इक्ष्वाकुवंशी राजांचा आयुष्याच्या अखेरचा जीवनक्रम तसाच वर्णिला आहे.

याशिवाय ‘ मालतीमाधव ’ व ‘ कुन्दमाला ’ यातील खालील उतारे पहा–

८. (अ) मा. मा. (अ.५) स्मशानात बळी देण्यास नेलेली मालती माधवास उद्देशून म्हणते– हा देव माधव, परलोकगतोऽपि युष्माभिः स्मर्तव्योऽयं जनः । न खलु स उपरतो यस्य वल्लभो जनः स्मरति ।

(ब) कु. मा. (अं. ३, श्लोक १३) – ‘ मी शोचनीय अशा सीतेबद्दल का बरे शोक करू नये ’ असे रामाने विचारताच, अदृश्य असलेली सीता म्हणते– ‘ न खलु स जनः शोचनीयः य एवं वल्लभेन शोच्यते । ’

दोन्ही उताऱ्यातील कल्पना एकाच प्रकारची आहे.

नाटककारांच्या शैलीवरून अनुमान

अशी शब्दसाम्याची इतरही अनेक उदाहरणे दाखविता येतील. वरील उताऱ्यातील कल्पनासाम्य आणि काहीतील शब्दसाम्यही पाहता भवभूती व धीरनाग यांपैकी एकाने दुसऱ्याचे अनुकरण केले असावे असे स्पष्ट दिसते. पण ते कोणी कोणाचे केले हा प्रश्न वादग्रस्त झाला आहे. सर्वांना भवभूतीच्या वर्णनातील अधिक काव्यात्मता आणि सरसता मान्य आहे, पण काहींचे म्हणणे असे की ‘ कुन्दमाले’-तील शैली साधी, अकृत्रिम आणि समासरहित असल्याने तिचा कर्ता कल्पनारम्य, अलंकारप्रचुर आणि दीर्घसमासयुक्त अशा ‘ उत्तररामचरिता ’च्या कर्त्याहून प्राचीन असावा. संस्कृत वाङ्मयेतिहासात कवि जितका नंतरचा तितकी त्याची शैली अधिक कृत्रिम व समासप्रचुर दिसते. तेव्हा भवभूतीनेच धीरनागाचे अनुकरण केले असावे. या बाबतीत लक्षात घेण्यासारखी गोष्ट ही की शैली ही व्यक्ति-निष्ठ असते. हर्ष व बाण हे समकालीन. पण हर्षाच्या सर्व नाटकात सामान्यतः समासरहित वैदर्भी रीतीचा उपयोग केला आहे. याच्या उलट बाणाच्या ग्रंथात श्लेष व समास यांचा अतिरेक झालेला आढळतो. शिवाय ‘ कुन्दमाले ’त दीर्घसमास आढळतच नाहीत असे नाही. उदाहरणार्थ, त्या नाटकाच्या पाचव्या अंकातील विदूषकाच्या प्राकृत भाषणातील समास-प्रचुर वाक्ये पाहा. रामाच्या संस्कृत भाषणातही मूलस्वयोगसकलपुरुषार्थसंवेदिनी ज्ञाननिष्पत्तिः ’ (अं. ५) यासारखी समासप्रचुर व क्लिष्ट वाक्ये आढळतात. तेव्हा शैलीतील समासयोजनेवरून या दोन नाटककारांचे पौर्वापर्य आणि तन्मूलक अनु-कारित्व ठरविणे योग्य नाही.

पौर्वापर्य ठरविण्याचे एक साधन – कुन्दमालेत कालिदास व शूद्रक यांचे अनुकरण

तर मग हा प्रश्न सोडवावयाचा कसा ? आम्हास वाटते की या दोन ग्रंथकारांच्या एकंदर प्रवृत्तीवरून त्यांच्या पौर्वापर्याविषयी अनुमान केले पाहिजे. आम्ही मागे दाखविले आहे की नाट्यवस्तूच्या किंवा संविधानकरचनेच्या बाबतीत भवभूती अधिक स्वतंत्र-प्रज्ञ आहे. याच्या उलट धीरनागाने संविधानक-रचनेत वाल्मीकीचेच अनुकरण केले आहे असे

नसून आपल्या पूर्वीच्या कालिदास व शूद्रक यांच्या नाटकातून काही घटना व कल्पना घेतल्या आहेत आणि शब्दयोजनेचेही अनुकरण केले आहे. याची काही उदाहरणे मागे कुन्दमालेचे संविधानक संक्षेपाने देताना दिली आहेत. उदाहरणार्थ, 'कुन्दमाले' च्या तिसऱ्या अंकातील प्रवासी तापसाची ग्रीष्म ऋतूतील उन्हाविषयी आणि दीर्घप्रवासामुळे थकलेल्या आपल्या पायांविषयी कुरकुर 'शाकुन्तला'च्या दुसऱ्या अंकातील विदूषकाच्या भाषणावरून , पाचव्या अंकातील रामाने विदूषकाला केलेला 'सीता-परित्यागाच्या वेळी तू माझा प्रतिषेध का केला नाहीस ?

हा प्रश्न 'शाकुन्तला' च्या सहाव्या अंकातील दुष्यन्ताने विदूषकाला केलेल्या यासारख्याच प्रश्ना-वरून आणि 'कुन्दमालेच्या' त्याच अंकातील विदूषकाने रामाच्या सिंसासनासंबंधी साकेतनिवासी लोकांकडून ऐकलेली परंपरागत कथा 'शाकुन्तला'च्या सातव्या अंकातील सर्वदमनाच्या अपराजित-औषधीच्या ताइतावरून सुचलेली दिसते. 'कुन्दमाले-'त सीतेच्या व रामाच्या उत्तरीयांची अदलाबदल झालेली दाखविली आहे. रामाच्या सुगंधरहित उत्तरीयावरून त्याच्या उदासीन जीविताविषयी सीतेने केलेले अनुमान 'मृच्छकटिकां' च्या दुसऱ्या अंकातील मत्त हत्तीला काबूत आणणाऱ्या कर्णपूरकाकडे चारुदत्ताने फेकलेल्या जाईच्या अत्तराने सुगंधित शेल्यावरून वसंतसेनेने चारुदत्ताच्या 'अनुदासीन यौवना' विषयी केलेल्या अनुमानावरून सुचलेले दिसते. ही झाली प्रसंगानुकरणाची उदाहरणे.कल्पना-साम्याची व शब्दसाम्याची उदाहरणे तर अनेक आहेत. त्यांतील काही घेऊ :

शब्दसाम्य

(१) कु. मा. (अं. ४, श्लो. ७३)–

एतस्मिन्वितताध्वरे प्रतिदिनं सांनिध्ययोगाद्धरे-स्त्यक्त्वा नन्दनचन्दनावनिरुहानालानतां प्रापिताः।
विभ्रत्युच्चनिवेशितेन नयनेनालोकनीया अमी
मत्तैरावणकण्डरज्जुवलयन्यासक्षतिं पादपाः ॥

– यातील ऐरावताच्या गळ्यातील दोरखंडाने नैमिषारण्यातील वृक्षांना उंचावर करकोचे पडले ही कल्पना कालिदासाच्या 'रघुवंशा'तील (सर्ग ४, श्लोक ४८) खालील श्लोकावरून सुचलेली दिसते –

भोगिवेष्टनमार्गेषु चन्दनानां समर्पितम् ।
नास्त्रसत्करिणां ग्रैवं त्रिपदीछेदिनामपि ॥

रघुवंश (४-७६) मध्ये अशा करकोचावरून हत्तीची उंची मोजली जाण्याची कल्पना आहे.

'कुन्दमाले' तील वरील श्लोकात नंदनवनातील चंदनवृक्षांचा उल्लेख धीरनागाचे अनुकारित्व सिद्ध करण्यास पुरेसा आहे. नंदनवनातील हे चंदनवृक्षांचे अस्तित्व धीरनागाला कालिदासाच्या वरील श्लोका-वरून सुचलेले दिसते. इतरत्र ते प्रसिद्ध नाही.

(२) वरील संदर्भातच आलेला आणखी एक श्लोक पहा.

कु. मा. (अ. ४, श्लोक ८) –

सचकितमवधाय कर्णमस्मिन्
सुरपतिकर्षणमन्त्रनिस्वनेषु ।
विरचयति शची सदैव नूनं
स्रजमवधूयवियोगवेणिबन्धम् ॥

–यातील कल्पना 'रघुवंशा' तील पुढील श्लोका-वरून सुचली असली पाहिजे –

क्रियाप्रबन्धादयमध्वराणामजस्रमाहूतसहस्रनेत्रः ।
शच्याश्चिरं पाण्डुकपोललम्बान्मन्दारशून्यानलकांश्चकार ॥

(३) कु. मा. (अं. १, श्लो. १८) मध्ये रोदन करणाऱ्या परित्यक्त सीतेला पाहून वनातील पशु-पक्षीही शोकाकुल झाल्याचे लक्ष्मण सांगतो –

एते रुदन्ति हरिणा हरितं विमुच्य
हंसाश्च शोकविधुराः करुणं रुदन्ति ।
नृत्तं त्यजन्ति शिखिनोऽपि विलोक्य देवीं
तिर्यग्गता वरममी न परं मनुष्याः ॥

–यासारखेच 'शाकुन्तलां' तील (अं. ४, श्लो. १२) शकुन्तलागमनाच्या वेळचे वर्णन पाहा–

उद्गलितदर्भकवला मृगाः परित्यक्तनर्तना मयूराः ।
अपसृतपाण्डुपत्रा मुञ्चन्त्य श्रूणीवलताः ॥

– दोन्हीतील वर्णन सारखेच आहे.

(४) कु. मा. (अं. ३, श्लो. १५) मधील रामाचे वर्णन पाहा –

व्यायामकठिनः प्रांशुः कर्णान्तायतलोचनः ।
व्यूढोरस्को महाबाहुर्व्यक्तं दशरथात्मजः ।

हे वर्णन रघुवंशातील (सर्ग १, श्लोक १३) दिलीपाच्या वर्णनासारखे आहे –

व्यूढोरस्को वृषस्कन्धः शालप्रांशुर्महाभुजः ।
आत्मकर्मक्षमं देहं क्षात्रोधर्म इवापरः ।।

(५) कु. मा. (अ. ६, श्लोक. १५) मध्ये कुशलवांसहित रामाला तिष्यपुनर्वसूंसहित चंद्रमाची उपमा दिली आहे –

स एष रामो नयनाभिरामः
सीतासुताभ्यां समुपास्यमानः ।
यदृच्छया तिष्यपुनर्वसुभ्यां
पार्श्वस्थिताभ्यामिव शीतरश्मिः ।।

– तसलीच रघुवंशातील (स. ११, श्लोक. ३६) रामलक्ष्मणांना दिलेली पुनर्वसूच्या दोन ताऱ्यांची उपमा पहा –

तौ विदेहनगरीनिवासिनां
गां गताविव दिवः पुनर्वसू ।
मन्यते स्म पिवतां विलोचनैः
पक्ष्मपातमपि वञ्चना मनः ।।

(६) कु. मा. (अं. ५) मध्ये रामाला नमस्कार करण्यासंबंधी सीतेची आज्ञा सांगताना लव म्हणतो–

'प्रणाममपि सैवोपदिष्टवती । न च गुरुनियोगा विचारमर्हन्ति । "

रघु. (स. १४, श्लो. ४६) मध्ये सीतापरित्यागासंबंधी रामाची आज्ञा लक्ष्मणाने का पाळली हे सांगताना कालिदास म्हणतो –

स शुश्रुवान्मातरि भार्गवेण
पितुर्नियोगात्प्रहृतं द्विषद्वत् ।
प्रत्यग्रहीदग्रजशासनं तदाज्ञा
गुरूणां ह्यविचारणीया।

वरील उताऱ्यातील साम्य स्पष्ट आहे. त्यावरून धीरनागाने आपल्या नाटकात पूर्वगामी कालिदास व शूद्रक यांचे किती अनुकरण केले आहे हे दिसून येईल.

दोन्ही ग्रंथकारांच्या अनुकरणातील तारतम्य

भवभूतीनेही आपल्या नाटकात क्वचित्स्थली कालिदासाच्या नाटकातील प्रसंगांचे व शब्दयोजनेचे अनुकरण केले आहे खरे. उदाहरणार्थ, 'विक्रमोर्वशीयातील ' उर्वशी अदृश्य झाल्यामुळे वेडा झालेल्या पुरूरव्याचे भाषण व ' मालतीमाधवा'तील मालती नाहीशी झाल्यावर माधवाचे भाषण यात साम्य आहे. 'शाकुन्तलां'तील व ' उत्तररामचरिता-' तील लहान मुलाच्या अव्याजमनोहर रूपाचे वर्णन एकाच प्रकारचे आहे. ' शाकुन्तला ' च्या सातव्या अंकात विविध प्रमाणांवरून सर्वदमन आपलाच पुत्र आहे अशी दुष्यन्ताची खात्री पटते त्या प्रसंगावरून ' उत्तररामचरिता ' च्या सहाव्या अंकातील कुशलवांच्या प्रत्यभिज्ञानाचा प्रसंग सुचलेला दिसतो. पूर्वगामी ग्रंथकारांच्या अनुकरणाचे काही प्रसंग प्रत्येक नाटककाराच्या कृतीत दाखवता येतील. किंबहुना राजशेखराने म्हटल्याप्रमाणे ' सर्वोऽपि परेभ्य एव व्युत्पद्यते । ' प्रत्येक ग्रंथकार पूर्वजांचे भांडवल घेऊनच व्यापार करतो. कालिदासाने अश्वघोषाचे व भासाचे काही बाबतीत अनुकरण केल्याचे आम्ही आपल्या ' कालिदास ' ग्रंथात दाखविले आहे. तथापि अनुकरणाच्या पुराव्यावरून ग्रंथकाराचे पौर्वापर्य ठरवताना त्याचे तारतम्य लक्षात घेतले पाहिजे. त्या दृष्टीने विचार केल्यास पूर्वकालीन नाटककारांच्या ग्रंथांतील प्रसंगांचे व शब्दयोजनेचे अनुकरण करण्याची प्रवृत्ती भवभूतीपेक्षा धीरनागात अधिक प्रमाणात आढळून येते. भवभूती स्वतंत्रप्रज्ञ व शब्दब्रह्मवेत्ता होता. त्याच्या ग्रंथात शेकडो मौलिक प्रसंग व सुंदर कल्पना दृष्टीस पडतात. त्याच्या तुलनेने धीरनागाचे परावलंबित्व व कल्पनादारिद्र्य उठून दिसते. तेव्हा त्यानेच भवभूतीचे अनुकरण केले असावे असा निर्णय काढल्याशिवाय गत्यन्तर नाही.

वरील सविस्तर विवेचनावरून खालील निर्णय वाचकांस पटतील अशी आशा आहे.

(१) ' कुन्दमाले ' चा कर्ता दिङ्नाग नसून धीरनाग होता,

(२) धीरनागाने 'कुन्दमाले 'त भवभूतीच्या ' उत्तररामचरिता 'चे अनुकरण केले आहे.

आणि (३) ' कुन्दमाले'चा काल ख्रिस्तोत्तर आठवे आणि अकरावे शतक यांमधील आहे.

प्रा. वळसणकर

राष्ट्रपती – घटनेच्या आरशातून

नुकत्याच पार पडलेल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर राज्यविधानसभांतील व लोकसभेतील निरनिराळ्या पक्षांचे स्थान पाहता एक अनामिक भीती मनाला स्पर्शून जाते. आणि भारतातील संसदीय लोकशाहीच्या भवितव्याबद्दल चिंता वाटायला लागते. काँग्रेस पक्षाची उतरंडीला लागलेली लोकप्रियता, परस्परविरोधी राजकीय मतप्रणालीच्या पक्षांना निरनिराळ्या राज्यात प्राप्त झालेली सत्ता यामुळे भारतात स्थिर राज्ययंत्रणा स्थापता येईल का? वा अस्थिरतेमुळे अराजक माजेल की काय? अशा प्रकारचे प्रश्न डोकावू लागतात. वर वर पाहता असे वाटेल की केरळात डाव्या कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखाली इतर काही पक्ष सरकार स्थापन करण्यास तयार असल्याने व त्यांना बहुमताचा पाठिंबा असल्याने हे संयुक्त सरकार स्थिर होऊ शकेल. मद्रास राज्यात द्राविड मुन्नेत्र कळहम् पक्षाला निर्णायक बहुमत असल्याने त्यांचे सरकारही स्थिर होऊ शकेल. पण मग हे ध्यानात येते की पूर्वी एकदा कम्युनिस्ट पक्षाने केरळात सरकार स्थापले असताना व विधानसभेत त्यांच्या बाजूने निर्णायक बहुमत असूनही त्यांचे सरकार बरखास्त करण्यात आले होते. म्हणजे मग केवळ विधानसभेतील निर्णायक बहुमताच्या आधारावर एखाद्या पक्षाचे राज्यातील सरकार पाच वर्षे चालू शकेलच असे निर्धाराने सांगता येत नाही. याचे कारण भारताच्या घटनेने राष्ट्रपतीला दिलेले अधिकार. राज्यातील घटनात्मक यंत्रणा कोसळली आहे अशी राष्ट्रपतीची समजूत झाल्यास राज्यात राष्ट्रपतीची राजवट सुरू करण्याचा राष्ट्रपतीस अधिकार आहे. या अधिकाराच्या संदर्भात राज्यसरकारे फारच जुजबी भासतात. किंबहुना घटनेने राष्ट्रपतींना कायदा, अम्मलबजावणी आणि अर्थविषयक बाबीत इतके अधिकार दिले आहेत की राष्ट्रपतीचे घटनेच्या आरशात दिसणारे प्रतिबिंब प्रत्यक्षात दिसणाऱ्या त्याच्या स्वरूपापेक्षा अतिशय वेगळे आहे. राष्ट्रपती म्हणजे केवळ राष्ट्रपती-भवनात राहणारा– निरनिराळ्या सभा वा परिषदांचा उद्घाटक अथवा मोठमोठ्या परदेशी पाहुण्यांचे स्वागत करून त्यांना मेजवान्या देणारा एक नाममात्र प्रमुख अधिकारी असे जे राष्ट्रपतीचे प्रत्यक्ष स्वरूप दिसते ते त्याच्या घटनात्मक प्रतिरूपाहून सर्वस्वी वेगळे आहे. घटनेच्या तरतुदी पाहता राष्ट्रपती आपणास प्रत्यक्षात दिसतो त्याप्रमाणे थकलेला भागलेला आणि भक्तिमार्गाला लागलेला निरुपद्रवी नसून चांगला दणकट आणि सामर्थ्यशाली वाटतो.

चौथ्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर एक गोष्ट स्पष्ट झाली आहे की महाराष्ट्र आणि म्हैसूर ही राज्ये वगळल्यास इतर राज्यात काँग्रेस पक्षाचे स्थान तितकेसे पक्के राहिलेले नाहीं. किंबहुना बऱ्याच राज्यांतून काँग्रेसपक्षाची सत्तापदावरून उचलबांगडी झाली आहे. आणि ज्या राज्यात काँग्रेस पक्षास पुन्हा सरकार प्रस्थापित करणे शक्य झाले आहे तेथे त्यांच्या बहुमतामध्ये खूपच घट झाली आहे. आणि बऱ्याचशा राज्यात कुठल्याच पक्षाला बहुमत मिळाले नाही. मात्र केन्द्र सरकार अद्यापही काँग्रेस पक्षाचे आहे. या निवडणूक निकालाद्वारे भारतीय मतदारांची गोंधळलेली मनःस्थिती दिसून येते. सर्वसाधारणपणे मतदार काँग्रेससरकारला कंटाळल्यासारखे दिसताहेत; पण दुसऱ्या कुठल्या पक्षाला सत्ता बहाल करावी का नाही याबाबत त्यांच्या मनात गोंधळ पडलेला दिसतो आहे. परिणामी परस्परविरोधी मतप्रणालीच्या राजकीय पक्षांना निरनिराळ्या राज्यात मतदारांचा पाठिंबा मिळाला आहे. स्वातंत्र्यानंतर प्रथमच काँग्रेसला एवढा जबरदस्त तडाखा बसलेला आहे. आणि अनेक राज्यातून काँग्रेसेतर पक्षांचे सरकार स्थापन झाले आहे. तेव्हा सध्या केन्द्र सरकार काँग्रेस पक्षाचे व अनेक राज्य-

सरकारे काँग्रेसविरोधी पक्षाची, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. केन्द्रस्थानी काँग्रेस पक्ष अधिकारावर असताना काँग्रेसविरोधी पक्षांना राज्यसरकारे सुरळीतपणे चालविता येतील काय ? भारतीय घटनेतील तरतुदीनुसार राज्यसरकारे केन्द्रसरकारच्या अधिकारकक्षेपासून कितपत स्वतंत्र आहेत ? आणि राज्यसरकारांवर केन्द्रसरकारचे प्रमुख कार्यपाल राष्ट्रपती यांचा कितपत अधिकार आहे ? राष्ट्रपतींची अधिकारकक्षा राज्यसरकारांना सामावून घेण्याइतपत व्यापक आहे किंवा कसे ? या व अशा प्रश्नांची उत्तरे घटनेतूनच शोधावयास हवीत. या व्यापक प्रश्नांचा एक भाग म्हणून राष्ट्रपतींच्या घटनात्मक स्वरूपाचा विचार करणे एवढाच या लेखाचा उद्देश आहे.

घटनेनुसार राष्ट्रपतीचे अधिकारक्षेत्र किती व्यापक आहे, त्याचेकडून घटनेने कोणकोणत्या कार्याची अपेक्षा केली आहे यासंबंधी यापूर्वी अनेक वेळा रंगतदार चर्चा झालेली आहे. विशेषतः आपले पहिले राष्ट्रपती डॉ. राजेन्द्रप्रसाद यांनी नोव्हेंबर १९६० साली इंडियन लॉ इन्स्टिटयूटमध्ये आपल्या भाषणात या प्रश्नाला तोंड फोडले तेव्हापासून तर हा प्रश्न वरचेवर चर्चिला गेला आहे. राष्ट्रपतीने सदासर्वकाळ मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसारच वागावयास हवे अशा अर्थाची स्पष्ट तरतूद घटनेत कोठेच आढळत नाही. या गोष्टीकडे त्यांनी लोकांचे लक्ष वेधले. भारताचा राष्ट्रपती आणि इंग्लंडची राणी या दोहोंच्या अधिकारकक्षेत काही फरक आहे वा नाही ? का संसदीय लोकशाहीत राष्ट्रपतीचे स्थान इंग्लंडच्या राणीसारखेच आहे असे अनुमान काढणे बरोबर ठरेल. पण आपली घटना इंग्लिश घटनेसारखी अलिखित नसून लिखित आहे. म्हणूनच आपल्या प्रश्नाचे उत्तर आपल्याला घटनेतच शोधावयास हवे.

असे असूनही या प्रश्नाला घटनेच्या अभ्यासकांकडून उलटी सुलटी उत्तरे दिली गेली आहेत. आणि यामुळे समजुतीपेक्षा गोंधळच जास्त वाढला आहे. तरी घटनासमितीमध्ये या विषयावर जी चर्चा झाली त्यांच्या आधाराने व घटनेतील प्रत्यक्ष तद्विषयक तरतुदींच्या आधाराने या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणे शक्य आहे.

वास्तविक आपल्या देशात स्वातंत्र्योत्तर कालात संसदीय लोकशाही प्रस्थापित करावी वा अध्यक्षीय लोकशाही असावी यावर चर्चा झाली होती. व घटना समितीने संसदीय लोकशाहीच्या बाजूने मत दिले होते. याचा अर्थ असा होतो की आपला राष्ट्रपती हा इंग्लंडच्या राणीसारखाच केवळ नाममात्र अधिकारी आहे. किंबहुना घटनासमितीच्या सदस्यांबरोबर डॉ. आंबेडकर यांनी खुलासा केला होता की, "ब्रिटिश घटनेनुसार राजाचे जे स्थान आहे तसेच भारतीय घटनेच्या संदर्भात राष्ट्रपतीचे स्थान आहे. . . मंत्रिमंडळाच्या सल्ल्याविरुद्ध त्याला काहीही करता येणार नाही." घटनेतील कलम ५४ नुसार "राष्ट्रपती-

(क) संसदेच्या दोन्ही सदनांचे निवडून आलेले सदस्य आणि (ख) राज्यांच्या विधानसभांचे निवडून आलेले सदस्य; यांनी बनलेल्या मतदार गणाच्या सदस्यांकडून निवडला जाईल".

म्हणजे राष्ट्रपतीची निवड अप्रत्यक्षरीत्या होते. जनतेने प्रत्यक्षरीत्या निवडून दिलेला राष्ट्रपती अधिक धीट व सामर्थ्यशाली होईल आणि परिणामी राष्ट्रपती व पंतप्रधान यांच्यात सत्तास्पर्धा सुरू होईल या भीतीमुळे राष्ट्रपतीची निवड अप्रत्यक्षरीत्या करण्याचे घटना समितीने ठरविले असेही म्हटले जाते. विशेषतः आपण स्वीकारलेल्या संसदीय लोकशाही पद्धतीच्या संदर्भात सामर्थ्यशाली राष्ट्रपती ही विसंगती आहे. केवळ या एका भूमिकेतूनच राष्ट्रपती पदाकडे सर्वांनी पाहिले असल्यामुळे तो एक नाममात्र अधिकारी आहे असे नेहमी म्हटले जाते. व राष्ट्रपतीची तुलना इंग्लंडच्या राणीबरोबर केली जाते. पण या संबंधात आपले पहिले राष्ट्रपती स्व. डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी केलेली सूचना लक्षात घेणे आवश्यक आहे. त्यांचे सांगणे असे होते की भारतीय व ब्रिटिश घटनांमधील फरक लक्षात घेता अशी तुलना करणे योग्य नव्हे. आपली घटना ही लिखित असल्याकारणाने या पदाबाबत केवळ अंदाजाने न बोलता, घटनेच्या विशिष्ट तरतुदींच्या संदर्भातच या प्रश्नाचा विचार व्हावयास हवा. तरीसुद्धा पंडित नेहरूंनी हा वाद न वाढविण्याच्या हेतूने असे म्हटले होते की राजकीय व घटनात्मकदृष्टचा राष्ट्रपती व इंग्लंडचा राजा ही दोन्ही पदे जवळ जवळ सारखीच आहेत. यापूर्वी घटनासमितीमध्ये जेव्हा जेव्हा हा

अनुक्रमणिका

प्रश्न उपस्थित झाला होता तेव्हा तेव्हा राष्ट्रपतीचे पद हे नामधारी आहे या स्वरूपाचे स्पष्टीकरण केले गेले होते. तरीसुद्धा घटनासमितीचे अध्यक्ष या नात्याने त्यावेळी डॉ. राजेन्द्रप्रसाद यांनी शंका प्रकट केली होती की घटनेत तशी खास तरतूद केली नसताना आपण मंत्रिमंडळाच्या यंत्रणेस सदाचेच बांधून घ्यावे का असा विचार राष्ट्रपतीच्या मनात येण्याची शक्यता टाळता येईल का ? ' एवढे झाल्या-नंतरही घटनेत तशा प्रकारची तरतूद करण्यात आली नाही. उलट घटनेत म्हटले आहे ते स्पष्ट आहे व या उपरही जर राष्ट्रपतींनी मंत्रिमंडळाच्या सल्ल्याविरुद्ध जाण्याचा पराक्रम केला तर राष्ट्रपती-वर महाभियोग (Impeachment) करता येईल. असाही इशारा डॉ. आंबेडकरांनी दिला होता.

घटनासमितीमध्ये झालेल्या चर्चांमधून राष्ट्र-पतीस इंग्लंडच्या राजाहून निराळे असे खास अधि-कारांचे स्थान देण्याचे घटनासमितीच्या मनात नव्हते असे दिसून येते. पण आपली घटना लिखित असल्यामळे घटनेतील प्रत्यक्ष तरतुदी या पदांबद्दल काय म्हणतात हे तपासून पाहणे जरूरीचे आहे. तसे पाहिल्यास राष्ट्रपतीचे निराळेच रूप दृष्टीसमोर येते.

राष्ट्रपतीची निवडणूक

राष्ट्रपतीची निवडणूक अप्रत्यक्ष असली तरी ही निवड केवळ संसदेच्या निवडून आलेल्या सदस्यांचीच असते असे नव्हे तर राज्यांच्या विधानसभांचे निवडून आलेले सदस्यही या निवडणुकीत मतदार असतात ही गोष्ट महत्त्वाची आहे. कारण यामुळे राष्ट्रपतीचा मतदार संघ व्यापक होतो व केवळ संसदेत बहुमत पाठीशी असलेल्या पंतप्रधानाच्या हातातील बाहुलेही तो बनत नाही. किंबहुना राष्ट्रपतीच्या घटनेत नमूद केलेल्या व्यापक अधिकारांशी सुसंगत असाच व्यापक त्याचा मतदारसंघ बनविलेला आहे. म्हणजे या पद्धतीमधून दोन गोष्टी सूचित होतात.

(१) राष्ट्रपती हा केवळ नामधारी अधिकारी नव्हे. व (२) राष्ट्रपती हा पर्यायाने अखिल भारताचा प्रतिनिधी आहे, केवळ केन्द्र सरकारचाच नव्हे तर भारताचा प्रमुख. राष्ट्राच्या एकजुटीचे हे एक द्योतक होय.

राष्ट्रपतिपदाची मुदत पदग्रहणाच्या तारखेपासून पाच वर्षे असेल. (कलम ५६). महाभियोग करून राष्ट्रपतीस मुदत संपण्यापूर्वीच पदभ्रष्ट करता येणे शक्य असले तरी महाभियोग करण्याची प्रक्रिया अनुसरणे इतके कठीण आहे की सामान्यत: या पद्धतीने राष्ट्रपतीस त्याच्या पदावरून दूर करणे सहजासहजी जमण्यासारखे नाही.

शिवाय घटनेच्या अतिक्रमणाकरिताच राष्ट्रपतीवर महाभियोग करता येतो. पण हे न करताच राष्ट्रपतीस घटनेने दिलेले अधिकारच इतके विपुल आहेत की एकाद्या राष्ट्रपतीने आपले सर्व घटनात्मक अधिकार वापरण्याचा चंग बांधला तर त्यास हुकूमशहा बनणे शक्य आहे. आणि वास्तविक राष्ट्रपतीस जी शपथ वा प्रतिज्ञा करावी लागते (कलम ६०) तीनुसार घटनेच्या संरक्षणार्थ त्याने आपल्या घटना-त्मक अधिकारांचा वापर करणेच योग्य ठरेल. कारण पद-ग्रहण करण्यापूर्वी त्याने पुढीलप्रमाणे शपथ वा प्रतिज्ञा करावी लागते.

ईश्वरास स्मरून शपथ घेतो
" मी, अमुक ——————— की मी
गांभीर्यपूर्वक प्रतिज्ञा करितो

श्रद्धापूर्वक भारताच्या राष्ट्रपतीच्या पदाचे कार्य-पालन (अथवा राष्ट्रपतीच्या कृत्यांचे निर्वहण) करीन आणि आपल्या योग्यतेची पराकाष्ठा करून संविधान आणि विधी यांचे परीक्षण, संरक्षण आणि प्रतिरक्षण करीन आणि मी भारताच्या लोकांची सेवा व सुस्थिती यांस स्वत:ला वाहून घेईन. "

राष्ट्रपतीच्या या वैशिष्टयपूर्ण प्रतिज्ञेवरून असेच स्पष्ट होते की राष्ट्रपती म्हणजे साऱ्या राष्ट्राचा भरवसा. राष्ट्रपतीकडून राष्ट्राच्या काय अपेक्षा आहेत हे त्याला घ्याव्या लागणाऱ्या शपथेवरून व प्रतिज्ञेवरून स्पष्ट होते. त्याच्याकडून इतक्या अपेक्षा असता त्यास केवळ नामधारी पदाधिकारी म्हणणे कितपत उचित ठरेल ? किंबहुना घटनेनुसार अशी शपथ राज्यपालाखेरीज पंतप्रधानास वा अन्य कुठल्याही अधिकाऱ्यास घ्यावी लागत नाही. याचाच

पर्यायाने असा अर्थ होतो की घटनेने राष्ट्रपतीच्या शिरावर अधिक जबाबदाऱ्या टाकल्या आहेत. जबाबदारीस जागण्यासाठी अधिकार आवश्यक आहेत आणि घटनेने तसे अधिकार राष्ट्रपतीस दिलेले आहेत.

मंत्रीपरिषद आणि राष्ट्रपती

(१) " राष्ट्रपतीस आपल्या कृत्यांचा वापर करण्यात साहाय्य व यंत्रणा देण्याकरिता शिरोभागी प्रधान मंत्री असलेली एक मंत्रीपरिषद असेल.

(२) मंत्र्यांनी राष्ट्रपतीस काही यंत्रणा दिली किंवा काय, आणि दिली असल्यास ती कोणती, या प्रश्नाची कोणत्याही न्यायालयात चौकशी केली जाणार नाही." (कलम – ७४)

(१) "प्रधानमंत्री राष्ट्रपतीकडून नियुक्त केला जाईल आणि मंत्री प्रधानमंत्र्याची मंत्रणा घेऊन राष्ट्रपतीकडून नियुक्त केले जातील.

(२) मंत्री आपली पदे राष्ट्रपतिप्रसादपर्यंत धारण करतील.

(३) मंत्रीपरिषद सामूहिक रीतीने लोकसभेस जबाबदार असेल." (कलम–७५)

घटनेतील वरील तरतुदीनुसार राष्ट्रपतीस त्याच्या घटनेने नेमून दिलेल्या कार्यात साहाय्य व सल्ला देण्यासाठी मंत्रीपरिषद असणे आवश्यक आहे. पण त्याने या मंत्रिपरिषदेच्या सल्ल्यानुसारच कार्यपालन करावयास हवे असे घटनेच्या कुठल्याच कलमानुसार स्पष्टपणे म्हटलेले नाही. म्हणजे घटनेनुसार राष्ट्रपतीस साहाय्य करणे व सल्ला देणे हे मंत्रिपरिषदेचे कार्य आहे एवढाच या कलमाचा अर्थ. शिवाय कलम ७४(२) नुसार मंत्रिपरिषदेने राष्ट्रपतीस दिलेला सल्ला गोपनीय स्वरूपाचा असल्यामुळे व याबाबत कोणत्याही न्यायालयास चौकशी करता येणे शक्य नसल्यामुळे राष्ट्रपती मंत्रीमंडळाच्या सल्ल्यानुसार कार्यपालन करतो आहे वा नाही याचा शोध घेणेसुद्धा शक्य नाही. परिणामी असेच म्हणावे लागेल की घटनेनुसार राष्ट्रपती मंत्रिपरिषदेच्या सल्ल्यास बांधलेला नाही. कारण त्याने मंत्रिपरिषदेचा सल्ला घेतलाच पाहिजे हे खरे असले तरी त्या सल्ल्यानुसारच त्याने वागले पाहिजे हे बंधन त्याच्यावर खरोखरीच आहे का ? तसेच कलम ७५ (१) नुसार प्रधानमंत्र्याची नियुक्ती राष्ट्रपती करतो व कलम ७५(२) नुसार मंत्री आपली पदे राष्ट्रपतिप्रसादपर्यंत धारण करतील. आजपर्यंत राष्ट्रपतीचे वरील अधिकार आपणास विशेष महत्त्वाचे वाटले नाहीत याचे कारण पंडित नेहरूंच्या नेतृत्वाखालील काँग्रेस पक्षास निवडणुकीत पुरेपूर यश मिळत गेले. पण चौथ्या निवडणुकीनंतर परिस्थितीत फरक पडला आहे. इतके दिवस प्रत्यक्षात राष्ट्रपतीचीच निवड पंतप्रधान करू शके. पण आता ते शक्य दिसत नाही. भारतातील निरनिराळ्या राजकीय पक्षांना निवडणुकीत वाढते यश मिळत गेल्यास व बहुमत पाठीशी असलेला पक्ष संसदेत नसल्यास पंतप्रधानांची नियुक्ती करण्याच्या राष्ट्रपतीच्या अधिकारास आगळे महत्त्व येईल. आणि परिस्थिती त्या दिशेने बदलण्याची आज चिन्हे दिसत आहेत. अशा बदललेल्या परिस्थितीत राष्ट्रपतीचे नवे स्वरूप आपल्याला दिसल्याशिवाय राहणार नाही.

कलम ७५ (२) नुसार राष्ट्रपती आपल्या मर्जीनुसार मंत्र्यास त्याच्या पदावरून दूर करू शकतो. प्रत्यक्षात असे करणे कठीण असले तरी राष्ट्रपतीचा हा अधिकार आहे हे विसरता येणार नाही. विशिष्ट परिस्थितीत एकाद्या अकार्यक्षम वा लाचखाऊ मंत्र्यास ,आपल्या अधिकारात राष्ट्रपतीने पदभ्रष्ट केले तर प्रधानमंत्र्यास उघड उघड राष्ट्रपतीच्या निर्णयाबद्दल नाराजी दाखवणेसुद्धा जमणार नाही.

कलम ३६१ (१) खालील तरतुदीप्रमाणे–

राष्ट्रपती आपल्या पदाच्या शक्ती वापरणे आणि कर्तव्ये पार पाडणे याकरिता अथवा त्या शक्ती वापरण्यात आणि कर्तव्ये पार पाडण्यात त्याने केलेल्या अथवा कर्तुमभिप्रेत असलेल्या कोणत्याही कार्याकरिता कोणतेही न्यायालय उत्तरदायी असणार नाही.

याचा अर्थ राष्ट्रपतीच्या कर्तव्यपालनाच्या कार्यात तो स्वतंत्र आहे. किंबहुना आपली घटना

अनुक्रमणिका

लिखित असूनही तीमध्ये त्याने मंत्रीमंडळाच्या सल्यानुसार वागावयास हवे अशा अर्थाची स्पष्ट तरतूद नाही म्हणूनच त्याने मंत्रीमंडळाचा सल्ला झिडकारला तरी त्याने घटनाबाह्य वर्तन केले असे म्हणता येईल असे वाटत नाही.

म्हणजे अशा प्रकारच्या घटनात्मक वा कायदेशीर बंधनाच्या अनुपस्थितीत त्याचेवर सांकेतिक वा राजकीय स्वरूपाचीच बंधने आणणे शक्य आहे. पण ही बंधने काहीअंशी अनिश्चित स्वरूपाची असतात. ब्रिटिश घटनेसारख्या अलिखित घटनेत घटनात्मक संकेताला जे स्थान आहे तसेच स्थान संकेताना लिखित घटनेतहीं असावे असे म्हणणे संपूर्णतया बरोबर नाही. कुठलीही राज्यघटना पूर्णत्वाने लिखित वा अलिखित असत नाही हे खरे असले तरी मंत्री-परिषद व राष्ट्रपती यांच्या संबंधातील महत्त्वाच्या बाबीसाठी भारतासारख्या लिखित घटना असलेल्यांना संकेतावर अवलंबून राहावे लागावे ही गोष्ट तितकीशी ठीक नाहीं. विशेषतः आपण स्वीकारलेल्या संसदीय लोकशाही पद्धतीच्या संदर्भात तर वरील बाबतच्या संदिग्ध तरतुदी फारच अडचणीच्या आहेत.

राष्ट्रपती व मंत्रीपरिषद यांचे संबंध सलोख्याचे नसतील व राष्ट्रपती मंत्रीपरिषदेचा सल्ला धुडकावून स्वमताने राज्यकारभार करण्याचा प्रयत्न करील तर आपल्या संसदीय लोकशाहीस तडा जाण्याची भीती आहे. अशा वेळी मंत्रीपरिषद राजीनामा सादर करील. पण घटनेनुसार मंत्रीपरिषदेच्या अनुपस्थितीत राज्यकारभार चालविणे शक्य नसल्याने राष्ट्रपतीस नवे मंत्रीमंडळ बनविण्यासाठी धडपड करावी लागेल. पण बहुमत पाठीशी असलेल्या पक्षाच्या मंत्रीमंडळाने राजीनामा दिला असल्याने नवे मंत्रीमंडळ बनणे अशक्य होईल. म्हणजे एक घटनात्मक पेचप्रसंग निर्माण होईल. राज्यातील घटनात्मक यंत्रणा कोसळ-ल्यास घटनेच्या कलम ३५६ नुसार राष्ट्रपती तिथे स्वतःची राजवट सुरू करू शकतो. केन्द्रसरकारच्या संदर्भात घटनेने अशी व्यवस्था केलेली आढळत नाही. याचा पर्यायाने असा अर्थ होईल की राजकीय दृष्टचा मंत्रीमंडळाचेबरोबर सलोख्याचे संबंध ठेवूनच राष्ट्रपतीस केन्द्र सरकारचा कारभार करावयास हवा. अन्यथा घटनात्मक पेचप्रसंग निर्माण होईल. इतकेच नव्हे तर तो स्वतःही अडचणीत येण्याचा संभव आहे. कारण राष्ट्रपतीवर महाभियोग करण्याची जी प्रक्रिया घटनेच्या कलम ६१ मध्ये सांगितली आहे ती अंतिम अर्थाने कायदेशीर नसून अधिक राजकीय स्वरूपाची आहे. राष्ट्रपतीची निवड करणे हे जरी सर्वथा संसदेच्या हाती नसले तरी महाभियोग करून त्यास त्याच्या पदावरून दूर करण्याचा अधिकार घटनेने संसदेसच दिला आहे. तेव्हा संसदेत बहुमत पाठीशी असलेल्या पक्षाच्या मंत्रिमंडळाच्या सल्ल्या-विरुद्ध जाणे हे परिणामी राष्ट्रपतीस हितकारक नाही असे दिसते. यास सुसंगत अशी उपाययोजना कलम ७५(३) खाली केली आहे जेणेकरून 'मंत्रि-परिषद सामूहिक रीतीने लोकसभेस जबाबदार असेल' असा खुलासा केला आहे.

सुरुवातीस सांगितल्याप्रमाणे आतापर्यंत भारताच्या राष्ट्रपतीने प्रत्यक्ष कारभारात मंत्रिमंडळाच्या कार्यात ढवळाढवळ न करिता केवळ एक घटनात्मक प्रमुख या नात्याने काम केले. आपल्यास लाभलेल्या पहिल्या राष्ट्रपतीने सुदैवाने सारे काम समजुतीने घेतले व संसदीय लोकशाहीस सुसंगत अशा परंपरेस सुरुवात केली. पण प्रत्यक्षात काय घडले व घटनेनुसार काय आहे व भविष्यात काय घडण्याची शक्यता आहे हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

या साऱ्या चर्चेमधून असे दिसते की जरी घटना-समितीच्या मते आणि प्रत्यक्ष अनुभवाच्या संदर्भात राष्ट्रपती हा घटनात्मक प्रमुख असला तरी तो केवळ नाममात्र प्रमुख आहे असे मात्र म्हणता येणार नाही. राष्ट्रपतीचे पद हे अतिशय महत्त्वाचे, जबाबदारीचे व विपुल अधिकाराचे पद आहे. आणि त्याच्याकडून खूपच महत्त्वाच्या कार्याची अपेक्षा आहे.

राष्ट्रपतीचे अधिकार

आपल्या घटनेतील कलम १६३ (१) मध्ये राज्यपालास काही निर्णय स्वविवेकाने करता येतात हे स्पष्टपणे सूचित केले आहे. या कलमात म्हटले आहे की,

"या संविधानाच्या द्वारा वा अनुसार जेवढया-पुरता आपल्या कृत्यांचा अथवा त्यांपैकी काहींचा

वापर स्वविवेकाने करण्यास राज्यपालास भाग केले असेल तेवढचाशिवाय आपल्या कृत्यांचा वापर करण्यात त्याला साहाय्य व मंत्रणा देण्याकरिता शिरोभागी मुख्यमंत्री असलेली एक मंत्रिपरिषद असेल. "

पण घटनेने या अर्थाची तरतूद राष्ट्रपतीच्या संदर्भात केलेली नाही. याचा अर्थ राष्ट्रपतीस कुठलेही निर्णय स्वविवेकाने घेता येणार नाहीत. मंत्रिपरिषदेचा सल्ला त्याला घ्यावाच लागेल. पण वर सांगितल्याप्रमाणे घटनेनुसार त्या सल्ल्यानुसारच त्याने वागावयास हवे असे स्पष्टपणे घटनेत नमूद केलेले नाही. लोकसभेत कुठल्याच पक्षास बहुमत न मिळाल्यामुळे मंत्रिमंडळ बनविणे अशक्य झाल्यास वा अलीकडे हरियाना व उत्तरप्रदेश या दोन राज्यात बहुमत पाठीशी असलेल्या काँग्रेस पक्षास एकजूट टिकविणे अशक्य झाल्यामुळे जसे त्यांचे सरकार कोसळले तसेच केन्द्र सरकारात झाल्यास घटनात्मक यंत्रणा नाकाम होईल व राष्ट्रपतीस सर्व जबाबदारी स्वतःच्या शिरावर घ्यावी लागेल. अशा वेळी राष्ट्रपतीस स्वमताने राज्यकारभार चालविण्याखेरीज दुसरा मार्गच उरणार नाही. तेव्हा घटनेत राष्ट्रपतीने स्व-विवेकाने वापरायच्या अधिकारांचा स्पष्ट उल्लेख नसला तरी खालील काही विशिष्ट गोष्टीत त्याला स्वविवेकानेच निर्णय घ्यावे लागतात. (Indian Presidency, by Dr. V. N. Shrivastava, The Indian Journal of Political Science, April 8 June 1966).

(१) प्रधानमंत्र्याची नियुक्ती व ज्या प्रधानमंत्र्याने आपल्या पक्षाचा विश्वास गमावला आहे त्याला काढून टाकणे.

(२) ज्या मंत्रिपरिषदेने संसदेचा विश्वास गमावला आहे तीस बरखास्त करणे.

(३) लोकसभेने जनतेचा विश्वास गमावला आहे अशी राष्ट्रपतीची समजूत झाल्यास लोकसभा विसर्जित करणे.

(४) मंत्रिपरिषदेस देशाचे संरक्षण करण्याचे कामात अपयश आल्यास संकटसमयी सर्वोच्च समादेशक या नात्याने आपल्या अधिकाराचा वापर करणे.

(५) कुठलाही विधिविषयक प्रश्न वा अन्य घटनेबद्दल राष्ट्रपती व मंत्रिपरिषद यांच्यात एकमत न झाल्यास अशा बाबतीत सर्वोच्च न्यायालयाचा सल्ला घेणे.

घटनेच्या विविध कलमांचे बारकाईने वाचन केल्यास राष्ट्रपतीच्या विपुल अधिकाराची व त्या पदाच्या महत्त्वाची मनोमन खात्री झाल्याशिवाय राहणार नाही. विशेषतः कलम १११ नुसार "जेव्हा संसदेच्या संसदांकडून एकादे विधेयक पारित झाले असेल, तेव्हा ते राष्ट्रपतीपुढे उपस्थित केले जाईल, आणि त्या विधेयकास आपण अनुमती देत आहो अथवा त्यापासून अनुमती रोखीत आहो यापैकी एक राष्ट्रपती घोषित करील". पण आपली अनुमती रोखण्याचा हा राष्ट्रपतीचा अधिकार धनविधेयकाच्या बाबतीत लागू नाही. पण धनविधेयक सोडून इतर विधेयकाबाबत मात्र त्याला हा अधिकार वापरता येईल. यावरून घटनेनुसार राष्ट्रपतीने हा अधिकार योग्य समयी वापरावा अशीच कल्पना आहे. अन्यथा या तरतुदीची आवश्यकता नाही. घटनेमधे घटना-दुरुस्ती विधेयक व इतर विधेयके यातील फरक स्पष्ट केला नसल्यामुळे घटना-दुरुस्ती विधेयकांसही अनुमती देण्याचे राष्ट्रपती नाकारू शकेल असे वाटते. अमेरिकन राज्यघटनेनुसार घटना-दुरुस्ती विधेयक राष्ट्र- पतीच्या अनुमतीसाठी पाठविली जात नाहीत. यावरून राष्ट्रपतीच्या कायदेविषयक अधिकाराची कल्पना येईल. संसदेचे कार्य राष्ट्रपतीने आव्हान केल्यानंतर सुरू होते. संसदेचे विघटन राष्ट्रपती करू शकतो, संसदेस मान्य असलेल्या विधेयकांस राष्ट्रपतीच्या अनुमतीची आत्यंतिक आवश्यकता आहे, राष्ट्रपतीने धाडलेल्या संदेशाची संसदेने दखल घेणे आवश्यक आहे, मंत्रिपरिषदेने आपल्या कार्याची माहिती राष्ट्रपतीस वरचेवर विचारणा होईल तेव्हा देणे आवश्यक आहे. मोठमोठ्या पदांवर नियुक्ती करण्याचे अधिकार राष्ट्रपतीस आहेत. आणीबाणीच्या परिस्थितीत घटनेने त्यास विशेष अधिकार दिलेले आहेत. वगैरे. वगैरे.

म्हणजे राष्ट्रपती हा घटनेचा केन्द्रबिंदू आहे. त्याने आपल्या अधिकाराचा योग्य वापर करावा अशीच मूळ कल्पना असावी. सर्व व्यवहार सुरळित

चालले असताना कदाचित राष्ट्रपतीस हे अधिकार वापरण्याची आवश्यकता भासणार नाही. पण राजकीय वातावरण तंग झाले असताना, कुठल्याच एका पक्षाकडे निर्णायक सत्ता नसताना घटनेच्या सुरक्षिततेसाठी व कायदा व शिस्त पालनासाठी राष्ट्रपतीस आपल्या अधिकारांचा उपयोग करावा लागेल.

अशा परिस्थितीची स्पष्ट चिन्हे आता दिसायला लागली आहेत. काँग्रेस पक्ष मोडकळीस आला आहे. या पक्षातील निरनिराळ्या गटांच्या मतभेदांनी आता परिसीमा गाठली आहे. बहुमत मिळालेल्या राज्यातूनही त्यांची सरकारे गडगडायला लागली आहेत. उत्तर प्रदेशात त्यानी सत्ता गमावली, पंजाब त्याच वाटेने चाललाय. म्हैसूर , आंध्रप्रदेश व मध्य प्रदेश या राज्यातही काँग्रेस पुढाऱ्यांच्या आपसातील लाथाळ्या चव्हाटयावर यायला लागल्यात. महाराष्ट्रात काँग्रेस स्थिर आहे असे म्हटले तर मुंबई महापालिकेत सत्तापदावर असलेल्या काँग्रेस पक्षांने अलीकडेच आपसातील मतभेद उघडपणे दाखविले. पंतप्रधान आणि काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष यांच्यातील मतभेद दिवसेदिवस वाढत असल्याचे दिसून येते. या साऱ्या राजकीय घडामोडी पुढे येणाऱ्या धोक्याचा लाल दिवा दाखवीत आहेत. याचबरोबर धान्याची टंचाई, वाढता भ्रष्टाचार-लाचलुचपत, वाढत्या किंमती, जिकडे तिकडे दिसणारी असंतुष्ट जनता यामुळे संसदीय लोकशाहीचे भवितव्य धोक्यात आले आहे.

लौकरच होणाऱ्या राष्ट्रपती व उपराष्ट्रपती यांच्या निवडणुकीत प्रथमच विरोधी पक्षांनी आपले उमेदवार उभे केले आहेत. ज्या पद्धतीने कायदेमंडळातील सभासद सध्या मतदान करताना आढळतात त्यामुळे कोणते उमेदवार निवडणुकीत निश्चित यशस्वी होतील असे सांगणे अवघड आहे. विरोधी पक्षाचा राष्ट्रपती आणि काँग्रेस पक्षाचा पंतप्रधान अशी परिस्थिती निर्माण झाल्यास राष्ट्रपतीचे नवे स्वरूप आपल्याला पाहावयास मिळेल हे निश्चित.

चुकीची दुरुस्ती –

नवभारत एप्रिल १९६७ च्या अंकातील मर्ढेकर नवे आकलन (पूर्वार्ध) : या लेखातील पृष्ठक्रमांक १०, स्तंभ दुसरा पहिले वाक्य –

समतोल–संबंध आकडेवारीने म्हणजे गणिती पद्धतीने मोजता येत नाही. परंतु श्रेणी-पद्धतीने मोजता येतो. " – या ऐवजी असे वाचावे :

" समतोल– संबंध आकडेवारीने म्हणजे गणिती पद्धतीने मोजता येतो; परंतु संवाद-विरोध संबंध गणिती पद्धतीने मोजता येत नाही; मात्र श्रेणी-पद्धतीने मोजता येतो. "

– पृष्ठक्रमांक १२, स्तंभ दुसरा, दुसरे वाक्य.

" संगीतातील सौंदर्यप्रत्यय, चित्रकलेतील सौंदर्यप्रत्यय, शिल्पकलेतील सौंदर्यप्रत्यय, निसर्गातील सौंदर्यप्रत्यय यांत प्रकारभिन्नता असते. "

– याऐवजीअसे वाचावे.

"संगीतातील सौंदर्यप्रत्यय, चित्रकलेतील सौंदर्यप्रत्यय, शिल्पकलेतील सौंदर्यप्रत्यय, निसर्गातील सौंदर्यप्रत्यय यात प्रकारभिन्नता नसते.

– प्रा. द. भि. कुलकर्णी

अनुक्रमणिका

प्रा. हिं. ए. चव्हाण.

भारतीय समाजवादी विचारप्रवाहांचे भवितव्य

" But a free society entering into the possession of the common heritage must seek in free association and in the free federation of groups a new organisation appropriate to the new economic phase of history "

– Peter Kropotkin. ("Mutual Aid)"

युरोपात फ्रान्स व इटाली आणि आशियात भारत व जपान या विरोध स्वातंत्र्यावर अधिष्ठित असलेल्या संसदीय लोकशाहीच्या राष्ट्रात समाजवादाच्या प्रयोगाला नव्या दिशा लाभण्याची फार शक्यता आहे.

आपल्या देशात समाजवादाचे भवितव्य काय हे ठरविण्यापूर्वी भारतीय लोकशाही चळवळीच्या इतिहासाची थोडी पार्श्वभूमी लक्षात घेऊन आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतरची समाजवादी विचारांच्या चळवळीची उत्क्रांती नजरेसमोर ठेवून पुढील कालखंडात ही चळवळ कोणत्या दिशेने जाऊ शकते, याची चाहूल घ्यायची आहे.

(१) विचारांची मंद गती

लोकशाही समाजपद्धतीची ज्याला तोंडओळखही नव्हती असा आपला देश ज्या काळात ब्रिटिश साम्राज्यशाहीने अंकित केला त्या काळात पाश्चात्त्य देशात मानवतावादी विचारांनी दोन दिशांनी महत्त्वाची पावले टाकायला सुरुवात केली होती. एक दिशा उदारमतवादी लोकशाहीची होती आणि दुसरी विज्ञाननिष्ठ समाजवादाची. लोकशाही आणि समाजवाद या विचारसरणीतील संघर्ष आणि सलोखा यांचे स्वरूप ठरविण्यात पाश्चिमात्त्य विचारविश्व ज्या काळात गुंतले होते त्या काळात भारतीय मन मध्ययुगीन मूल्यांच्या प्रदीर्घ निद्रेतून बाहेर पडायचेच होते. ब्रिटिश सत्तेच्या आगमनानंतर भारतीय बुद्धीला विज्ञाननिष्ठा, उदारमतवाद, व्यक्तिस्वातंत्र्य व लोकशाही यांचे मंद गतीने दर्शन घडत होते, त्याच शतकात पाश्चात्त्य बुद्धी ही समाजवादी मानवतावादाच्या दिशेने भरधाव व निर्णायक पाऊले टाकीत होती. पाश्चात्त्यांच्या मानाने भारतीयांना या विचारांचे दर्शन जवळजवळ एक शतकाच्या उशीराने घडले. भारतीयांना समाजवादी विचारांची ओळख होण्याचा कालखंड १९२० नंतरचा आहे. १९२० ते १९४७ या कालखंडात आपल्या प्रगत बुद्धिवंतांचे विचार राष्ट्रवाद, राष्ट्रीय मुक्ती, लोकशाही आणि समाजवाद यांची सुसंगती शोधण्याच्या कामात गुंतले होते. या विचारप्रक्रियेच्या अर्धवट विकासावस्थेतच आपल्या राजकीय स्वातंत्र्याचा उदय झाला. स्वातंत्र्याने आपल्याला असावध व अनिर्णित अवस्थेतच गाठले.

(२) परंपरावाद व फॅसिझम.

इ. स. १९२० नंतर ब्रिटिश साम्राज्यशाहीविरोधी राष्ट्रीय चळवळीत गांधीवाद व समाजवाद हे दोन प्रवाह परस्परांशी झुंज घेत तर कधी समन्वय साधीत पुढे सरकू लागलेले दिसतात. इ. स. १९२० पूर्वीच्या राष्ट्रीय आंदोलनाला भारतीय परंपरानिष्ठ पुनरुत्थानवादी विचारमूल्यांची मुख्यतः बैठक लाभलेली होती. त्याचवेळी दुसऱ्या बाजूला उदारमतवादी लोकशाही मूल्यांचा ध्वजही उभारला जात होता. भारतीय पार्श्वभूमीवरील पुनरुज्जीवननिष्ठ सुधारणावाद आणि पाश्चिमात्य आदर्शाचा व्यक्तिस्वातंत्र्यनिष्ठ सुधारणावाद यांची जोड उदारमतवादी लोकशाही विचारमूल्यांना देण्याचे प्रयत्न करणारा विचारवंतांचा प्रवाह त्या काळातील प्रगतिशील प्रवाह असून, भारतीय सरंजामशाहीस पूरक असा परंपरानिष्ठ पुनरुत्थानवादी विचारप्रवाह हा (भारतीय स्वातंत्र्यसंघर्षातील त्याची एक भूमिका वगळल्यास) प्रतिगामी होता. आपल्या राष्ट्रवादाचा विकास प्रारंभापासून असाच विरोधपूर्ण परिसरातून प्रवास करतो आहे.

इ. स. १९२० नंतरच्या राष्ट्रीय चळवळीवर महात्मा गांधी व जवाहरलाल नेहरू यांचे नेतृत्व प्रस्थापित झाल्यानंतर भारतीय परंपरानिष्ठ प्रतिगामी प्रवाह राष्ट्रीय चळवळीपासून दूर फेकला गेला. आणि भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील त्याची काहीशी पुरोगामी असलेली पूर्वीची भूमिकाही संपुष्टात आली. राष्ट्रीय चळवळीत तो अल्पसा उरलेला कुठे कुठे दिसला तरी त्याचे स्वरूप आता बदललेले होते. त्याला नवीन प्रवाहाशी तडजोड साधावी लागत होती. एकंदर राष्ट्रीय चळवळीत त्याला कुठलेही निर्णायक महत्त्व उरलेले नव्हते. टिळकांच्या नेतृत्वांती हा प्रवाह जवळजवळ इतिहासजमा व्हायच्या क्रमास लागला होता. पण तो दुसरीकडे वेगळ्या स्वरूपात प्रकट झाला. सावरकरांचा हिंदुत्वनिष्ठ सुधारकधर्तीचा राष्ट्रवाद आणि डॉ. हेडगेवार प्रणित रा. स्व. संघाचा फॅसिस्ट आदर्शाचा हिंदुराष्ट्रवाद हे धार्मिक अथवा जातीय प्रवृत्तीच्या राष्ट्रवादाचे विचारप्रवाह जुन्या परंपरानिष्ठ पुनरुत्थानवादी विचारप्रवाहांचे नवे वारसदार होते. हे प्रवाह इ. स. १९४७ पर्यंत म्हणजे स्वातंत्र्योदयापर्यंतही राष्ट्रीय चळवळीच्या विरोधातच वाढले. भारतीय मध्ययुगीन घडणीच्या सरंजामी व मध्यम वर्गीय मनावर त्यांचा प्रभाव वाढत गेला. स्वातंत्र्योत्तर काळात ऐहिकतावादी लोकशाही, व्यक्तिस्वातंत्र्य व समाजवाद यांच्या विरोधी विचारांचा प्रवाह मुख्यतः जनसंघाच्या स्वरूपात पुढे आला. मुक्तस्पर्धापूर्ण स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारा ' स्वतंत्र पक्ष ' मात्र राष्ट्रीय चळवळीतून स्वातंत्र्योत्तर काळात वेगळा झालेला प्रवाह असून त्याला ऐहिकतानिष्ठ राष्ट्रवादाचे व उदारमतवादी लोकशाहीचे अधिष्ठान आहे. तरीही या दोन उजव्या प्रवाहात समाजवाद विरोधाचे मोठेच साम्य असल्यामुळे त्यांची पुढील कालक्रमात एकवटण्याची शक्यता आहे.

(३) राष्ट्रवादाचे नवे वळण

इ. स. १९२० ते १९४७ या कालखंडातील राष्ट्रीय चळवळीतील नव्या नेतृत्वाने त्या पूर्वीच्या कालखंडातील (इ. स. १८८५ ते १९२०)– (१) भारतीय पार्श्वभूमीवरील पुनरुज्जीवननिष्ठ सुधारणावाद आणि (२) पाश्चिमात्य आदर्शाचा व्यक्तिस्वातंत्र्यनिष्ठ सुधारणावाद हे दोन्ही प्रगतिशील विचार स्पष्टपणे स्वीकारले आणि संपन्न केले. म. गांधी व नेहरू या दोघांनीही आपल्या राष्ट्रवादाचे हे प्रथम कालखंडातील विचारसूत्र अचूकपणे पकडून ठेवले. त्याशिवाय त्यांनी आपल्या राष्ट्रवादाला आणखी नवा आशय दिला. म. गांधींनी अराजकवादी, विकेंद्रित अर्थव्यवस्थेवर आधारलेला, अपरिग्रहप्रवृत्तीचा, विश्वमानवाची समता अभिप्रेत असणारा, पिळवणूकशून्य समाज आदर्श म्हणून समोर ठेवला. म. गांधींच्या या आदर्श अराजकवादाने आपल्या राष्ट्रवादाला आपल्या परीने संपन्न केले, आणि समाजवादाच्या जवळपास आणून बसविले. पण या विचारसरणीत एक मोठेच वैगुण्य होते. तिला विज्ञाननिष्ठेचे अधिष्ठान नव्हते. आध्यात्मिक वळणाचा मानवतावाद हाच तिचा पाया होता. भारतीय आध्यात्मिक विचारसरणीची अशास्त्रीय व निवृत्तिवादी जीवनदृष्टी म. गांधींच्या श्रमनिष्ठ कर्मवादालाही मुक्त ठेवू शकली नाही. ही उणीव नेहरूंच्या विचारात नव्हती. पाश्चात्यांची विज्ञाननिष्ठा, ऐहिकताप्रीती, लोकशाही, व्यक्तिस्वातंत्र्य आणि समाजवाद ही अत्याधुनिक जीवनमूल्ये नेहरू ज्या विचारप्रवाहाचे नेते होते त्या विचारप्रवाहात प्रतिष्ठा पावली होती. आपल्या राष्ट्रवादाचे शंभर टक्के लोकशाहीकरण नेहरूंनी केले आणि त्याला समाजवादाभिमुख बनविण्याचा प्रयत्नही मुख्यतः त्यांनीच केला. भांडवलदार हे जनतेचे खजिनदार असावेत, ही म० गांधींची कल्पना ज्यावेळी वर्गसंघर्षाची धार बोथट करीत होती, त्याच वेळी राष्ट्रीय चळवळीने या संघर्षात श्रमिकनिष्ठा बाळगावी अशी विचारसरणी नेहरूप्रवाहाकडून प्रतिपादिली जात होती. समाजवादी शक्ती तशाच इतर जहाल राष्ट्रवादी शक्तीही मुख्यतः नेहरूंभोवती गोळा होऊन राष्ट्रीय चळवळीत कार्यप्रवण झालेल्या होत्या.

पण स्वातंत्र्यानंतर नेहरूंनी आपल्या समाजवादाला मुरड घातली व वेगळेच वळण दिले. एकाच वेळीं भांडवलशाही व समाजवादी अर्थरचनेची सांगड घालण्याचा त्यांनी प्रयत्न करून पाहिला. हा प्रयोग कितपत यशस्वी झाला व कितपत अयशस्वी झाला, हे अजून ठरायचे आहे. नेहरूंनी ज्या काळात भारतीय समाजरचनेची घडण करण्याचे कार्य हाती घेतले तो काळ समाजवादी विचारक्षेत्रात जागतिक पातळीवर वृद्धीचा पण अरिष्टाचा काळ होता कम्युनिस्टप्रणीत समाजवादा-

तील पक्षस्वातंत्र्याधिष्ठित संसदीय लोकशाहीचा अभाव आणि पक्षीय हुकुमशाहीची विकृती टाळून समाजवाद प्रस्थापित करू पाहणारी वेगळी समाजवादी शक्ती जगभर वाढलेली होती पण प्रत्यक्षात तिला कुठेही सत्ता हस्तगत करून प्रयोग करण्याचे सामर्थ्य प्राप्त होऊ शकले नाही. उलट समाजवादासाठी राष्ट्रीयकरणाची अथवा सामाजिकीकरणाची आवश्यकता उरली नाही, असा ब्रिटनचा समाजवादी विचारांचा मजूरपक्ष सांगू लागला होता. मागासलेल्या अर्थव्यवस्थेच्या देशात समाजवाद आणता येत नाही, औद्योगिक सुसंपन्नता ही समाजवादासाठी पूर्वअट आहे, हा पाश्चात्त्य समाजवादी तत्त्वज्ञांचा इशारा नेहरू मुळीच विसरू शकले नाहीत. समाजवादी विचारांचे बलवान प्रवाह– काँग्रेस समाजवादी व साम्यवादी पक्ष– राष्ट्रीय पक्षातून केव्हाच बाहेर पडून आपले बळ स्वतंत्रपणे वाढवू लागले होते. अशावेळी नेहरूंनी भारताच्या आर्थिक विकासासाठी एक संमिश्र अर्थ-व्यवस्थेचा प्रयोग करून पाहिला. या प्रयोगात 'गरीब अधिक गरीब आणि श्रीमंत अधिक श्रीमंत' झाल्याचे अनपेक्षित चित्र शेवटी शेवटी नेहरूंना दिसू लागले आणि एका बेचैन वैफल्यातच नेहरूंनी आपल्या आयुष्याचा प्रवास समाप्त केला. समाजवादी विचारांचा व प्रात्यक्षिकाचा एक कालखंड नेहरूंच्या जीवनास्ता-बरोबरच संपुष्टात आला.

(४) गांधीजींचा दूरदर्शीपणा

पं. नेहरूंनी चालविलेल्या आर्थिक धोरणात व कार्यक्रमात लालबहादुर शास्त्री व इंदिरा गांधी यांनी बदल केला नाही. साधारणतः विकासाची तीच दिशा स्वीकारूनही, नियोजनाची तीच चौकट कायम ठेवूनही नेहरूनंतर झालेल्या पहिल्याच सार्वत्रिक निवडणुकीत नेहरूंच्या काँग्रेस पक्षाची अर्धी शक्ती कमी झाली, अर्धी सत्ता ढासळून पडली. नेहरूंनाही कदाचित काँग्रेसचा हा पराभव रोखता आला असता काय, हा प्रश्नच आहे. कारण स्वातंत्र्योत्तर काळात झालेल्या भारताच्या चार सार्वत्रिक निवडणुकीत क्रमशः काँग्रेसची शक्ती ढासळत चालली आहे, असे दिसते. या सार्वत्रिक निवडणुकीत (१९६७) जवळजवळ अर्ध्या राज्यात काँग्रेसच्या हातून सत्ता विरोधकांकडे गेली; आणि मध्यवर्ती सत्ताही हातातून जाताजाताच वाचली. हाच क्रम पुढे थोडा जरी सरकला तरी पुढल्या एकदोन निवडणुकीतच काँग्रेसचे अधिराज्य संपुष्टात येण्याची शक्यता आहे. इ. स. १८८५ मध्ये स्थापन झालेला हा बलशाही काँग्रेस पक्ष इ. स. १९८५ पूर्वीच– म्हणजे शंभरी गाठण्यापूर्वीच अकार्य-क्षम होऊन आपले जीवनकार्य अपयशाचा निश्वास टाकून संपविणार, हा राजकीय पक्षांच्या वाट्यास येणारा दैवदुर्विलासच होय !

काँग्रेस पक्ष आणि राष्ट्रीय चळवळ हे समानार्थी शब्द नसले तरी त्यात फार मोठे साम्य आहे. काँग्रेस म्हणजे राष्ट्रीय चळवळीचे माध्यम. राष्ट्रीय चळवळ ही आपल्या देशातील भिन्न विचारप्रवाहाचे प्रति-निधित्व करणारी एक विशाल शक्ती होती. वैचारिक संघर्षातूनही राष्ट्रैक्य साधून या चळवळीने जगातील सर्वात मोठ्या गुलाम देशाचे सगळयात मोठ्या साम्राज्य-शाहीपासून दास्यविमोचन केले, हे ऐतिहासिक महत्त्वाचे पवित्र कार्य होय. हे कार्य संपताच, म्हणजे इ. स. १९४७ साली काँग्रेस पक्ष विसर्जित करावा, ही म० गांधींची भूमिका फार दूरदर्शीपणाची होती. म० गांधींच्या विचारांना शास्त्रीय विचारपद्धतीची बैठक नसूनही म० गांधी अत्यंत दूरदर्शी नेते होते, द्रष्टेच होते. प्रचंड साम्राज्यशाही सत्तेशी नवीन प्रकारची झुंज देऊन स्वातंत्र्यप्राप्तीचे मंगलकार्य करणारा महान पक्ष म्हणून काँग्रेसला जनतेच्या हृदयसिंहासनावर जे स्थान होते ते पुसले जाऊ नये म्हणून पक्षविसर्जनाशिवाय दुसरा पर्याय म. गांधींना दिसला नाही. विविध प्रवाहांचा, हित-संबंधी व्यक्तींचा आणि गटांचा हा पक्ष सत्तेवर बराच काळ राहिला तर भ्रष्ट होईल आणि कालांतराने तो जनतेच्या मनातून उतरेल, हे गांधींनी हेरले होते. काँग्रेस ही वेगवेगळ्या विचारप्रवाहांची संघटना असून भिन्न विचारप्रवाहांची एकता ही तिची जशी शक्ती तसाच हा तिचा दुबळेपणाही होता. कारण कालक्रमात विचारांचे ध्रुवीकरण होणारच. वेगवेगळे प्रमुख प्रवाह भिन्न झाल्यावर मग काँग्रेस ती काय उरावी ? त्यापेक्षा ज्या कार्यासाठी मुख्यतः काँग्रेसची स्थापना झाली होती ते स्वातंत्र्यप्राप्तीचे कार्य साध्य होताच तिचे विसर्जन होऊन तिच्यातून वेगवेगळे प्रवाह पक्ष म्हणून संघटित होणे इष्ट ठरले असते. काँग्रेसमध्ये स्वातंत्र्य-

प्राप्तीच्या वेळी तीन प्रवाह स्पष्ट होते. (१) समाजवादी विचारांचा डावा प्रवाह. (२) मुक्त भांडवलशाहीचा पुरस्कर्ता उजवा प्रवाह. (३) गांधीवादीपद्धतीने समाजकल्याण अथवा साम्ययोग साधू पाहणारांचा आणि उदारमतवादी लोकशाहीवाद्यांचा मध्यमार्गी प्रवाह. साधारणतः हे तीन राजकीय प्रवाह काँग्रेसच्या उदरातून बाहेर पडले असते व आपल्या देशात शक्तींचे ध्रुवीकरण जलद घडले असते. या तीन राष्ट्रीय प्रवाहाला तत्समान प्रवृत्तीचे झरे येऊन मिळाले असते. संसदीय लोकशाही अधिक प्रभावी, गतिमान, फलदायी आणि आकर्षक झाली असती. गेल्या दोन दशकात राजकीय सत्तेच्या क्षेत्रात आढळणारा एकसुरीपणा तर केव्हाच संपला असता.

(५) पक्षविसर्जनाची अभिनव कल्पना

आणखी एक दुसरी शक्यता होती.

म० गांधी हे आदर्श समाजरचनेसाठी अराजक पद्धतीचा स्वीकार करणारे पौर्वात्य जगातील एकमेव विचारवंत होते. अंतिम समाजनिर्मितीच्या बाबतीत कार्ल मार्क्सही शासनशून्य अराजकाचा पुरस्कर्ता होता. याबाबतीत कदाचित ते दोघेही अव्यवहार्य स्वप्नरंजनवादी असतील. पण त्यांच्या या विचारात काही सत्याचे कणही आढळतात. राज्य, शासन, पक्ष इ० समूहसंघटना शेवटी वर्चस्ववादी होतात व मानवाच्या सर्वांगीण व्यक्तिविकासाला मारक ठरतात, या सत्याची त्यांना दूरदर्शी जाणीव झालेली होती, म्हणूनच अंतिम आदर्शाच्या दृष्टीने ते अराजकवादी विचाराकडे झुकले होते. मार्क्सला हे कार्य श्रमिकांचा मजबूत पक्ष बांधून करायचे होते. गांधींना साध्य व साधन यांची सुसंगती संमत होती. समूहवादी साधनातून विकेंद्रित व व्यक्तिविकासपूरक समाजरचना घडविता येणार नाही, याची त्यांना जाणीव झालेली असावी. याच संदर्भात त्यांनी काँग्रेस पक्षविसर्जनाची कठोर कल्पना व्यक्त केली असावी.

आणखी एक श्रेष्ठ विचारवंत आपल्या देशात अशाच निर्णयापर्यंत याच कालक्रमात येऊन पोचला होता. पक्ष हे हुकुमशाहीचे शेवटी साधन होते, हे साधन व साध्य यात अनिष्ट विसंगती निर्माण होते आणि शेवटी हे साधनच इतके भ्रष्ट होते की त्याचीच एक नवी गुलामगिरी मानवाच्या मानेवर बसते, हे विचार जागतिक प्रमाणावर पक्षपद्धतीच्या अनुभवातून अनेक विचारवंतांच्या विचारकक्षेत येऊ लागले होते. आपल्या देशात या विचारकक्षेपर्यंत सुसंगतपणे प्रथम पोचण्याचा मान एम्. एन्. रॉय यांचा आहे. त्यांनी हा विचार प्रत्यक्षात आणण्यासाठी स्वतःच्या नेतृत्वाचा नवमानवतावादी पक्ष विसर्जितही केला. रॉय यांच्या विचारांची बैठक काटेकोरपणे शास्त्रीय होती. म० गांधींना झालेली पक्षविसर्जनाची जाणीव ही वेगळ्याच सहजप्रवृत्तीतून संभवली. विकेंद्रित अर्थरचनेला व राजकीय प्रयोगाला सर्वंकष पक्ष मारक ठरतात हे विकेंद्रीकरणावर आत्यंतिक भर देणाऱ्या गांधीजींना सहजप्रवृत्तीने कळले असावे, यात अगदी अशक्य असे काही नाही. पण आपला हा निर्णय काँग्रेस पक्षावर लादण्याइतकी अथवा पक्षाकडून हा निर्णय मंजूर करून घेण्याइतकी सुस्पष्टता व सुनिश्चितता त्यांच्या विचाराला येऊ न शकल्यामुळे त्यांचे ते विचार आता केवळ संशोधकाच्या अवधानापुरतेच मर्यादित ठरले आहेत.

म० गांधींच्या म्हणण्याप्रमाणे काँग्रेस पक्षाचे विसर्जन झाले असते तर काँग्रेसमध्ये वर उल्लेखिलेले प्रवाह पक्षरूप धारण करण्यापेक्षा प्रवाहरूप राहून व्यक्तिमाध्यमातून ठिकठिकाणी वर आले असते. आणि कुणी सांगावे कदाचित अपक्षीय लोकशाहीच्या एका आदर्श प्रयोगाला येथे प्रारंभ झाला असता.

पण हे घडले नाही. आणि आता हे घडण्याचा क्रम फार पुढे लोटला गेला आहे. या क्रमाचा विकासही आता वेगळ्या स्वरूपाचा राहणार आहे, आज तो क्रम सुनिश्चितपणे व सुस्पष्टपणे दृष्टिपथात येत नाही. आज जे दृष्टिपथात येऊ शकते ते भारतातील विचारशक्तींचे पक्षमाध्यमातून ध्रुवीकरण. हे ध्रुवीकरण साध्य झाल्यावर पक्षपद्धतीच्या विसर्जनाचा क्रम सुरू होऊ शकेल काय, हे पाहण्यासारखे आहे.

(६) डावे व उजवे यांची सत्तास्पर्धा

इ. स. १९६७च्या सार्वत्रिक निवडणुकीतून सत्तासंक्रमणाचा प्रश्न आज आपल्या विचारवंतांपुढे स्पष्टपणे आलेला असून त्याचे त्वरित उत्तर शोधण्याची गरज निर्माण झाली आहे.

काँग्रेस विलयाच्या क्रमात असताना सत्तास्पर्धेच्या आखाड्यात उजवे आणि डावे विचारप्रवाह समोर येत आहेत. चवथ्या सार्वत्रिक निवडणुकीचे निकाल लक्षात घेता डाव्यांची शक्ती वाढली आहे, यात शंका उरत नाही. मात्र त्याचबरोबर देशाच्या ज्या भागात सरंजामशाहीचे अवशेष शिल्लक आहेत त्या भागात जनसंघासारखा फॅसिस्ट प्रवृत्तीचा प्रतिगामी पक्ष पुढे येत आहे. भांडवलदार व सरंजामदार यांच्या पाठिंब्यावर वाढणारा मुक्तस्पर्धावादी स्वतंत्र पक्ष काही विभागात वाढला आहे. दोघांची मिळून जी शक्ती तयार होते ती आणि काँग्रेसमधील आत्यंतिक उजव्या प्रवृत्तीची एक शक्ती मिळून एक राष्ट्रव्यापी उजवी शक्ती आक्रमकपणे पुढे येऊ पाहत आहे. या शक्तीतून भांडवलशाहीला स्वैर स्वातंत्र्य देणाऱ्या औपचारिक लोकशाहीचा तसाच फॅसिझमचा उदय होऊ शकतो. येथील विभागलेल्या डाव्या शक्तीचा बिमोड करण्यात ही उजवी शक्ती यशस्वी झाल्यास राष्ट्रीय चळवळीतून (आणि मानवतावादी वैचारिक मंथनातून) जी एक समाजवादाभिमुख, जनतानिष्ठ आणि प्रगतिशील विचारसरणी आपल्याला लाभली तिला प्रचंड धक्का बसेल आणि भारताचे भवितव्य अनेक दशकांसाठी काळेकुट्ट होईल.

हा धोका लक्षात घेऊन जागृतपणे पाऊले टाकता आल्यास भारतातील समाजवादी विचारसरणीचे भवितव्य अजूनही उज्ज्वल आहे. तिची शक्ती प्रचंड आहे. भारतीय जनमनाची तिने तत्त्वतः पकड घेतली आहे. तिच्यात काही नवप्रयोगाची क्षमताही आहे.

(७) संयुक्त शक्तींचे केंद्र व पक्षविसर्जन

भारतीय स्वातंत्र्याचा लढा ही मानवाच्या स्वातंत्र्यसंग्रामातील एक प्रचंड घटना होती. जागतिक साम्राज्यशाहीच्या अंताची ती सुरुवात होती. या स्वातंत्र्यलढ्यातून साकार झालेली समाजवादी व लोकशाहीनिष्ठ विचारसरणीची घडण हीसुद्धा अत्यंत सामर्थ्यशाली आहे. ती निरनिराळ्या समाजवादी विचारातील चांगल्या गोष्टींचा समन्वय साधून एक नवा समाजवादी आदर्श प्रस्थापित करू शकते.

आपल्या देशात समाजवादी विचारवंतांचे अनेक विभाग वैचारिक दृष्ट्या थोड्याफार फरकाने कार्यक्षम आहेत. त्यांची संयुक्तपणे जी शक्ती तयार होते ती या देशात डोके वर काढू लागलेल्या उजव्या प्रतिगामी शक्तीला सहज शह देऊ शकते. येथील उजव्या प्रतिगामी शक्तीतील जनसंघासारख्या फॅसिस्ट शक्तीचा धोका टाळण्यासाठी केवळ समाजवादी संयुक्त आघाडीची **विकेंद्रित सत्ता** हाच एकमेव मार्ग आहे.

समाजवादी शक्तींच्या एकजुटीत मुख्यतः आड येणारा मुद्दा म्हणजे साम्यवादी पक्षासंबंधीचा. या देशातील समाजवादी शक्तींपैकी जवळजवळ अर्धी समाजवादी शक्ती साम्यवादी पक्षाभोवती केंद्रित झालेली आहे. अर्धी अथवा त्यापेक्षा थोडी जास्तच शक्ती संयुक्त समाजवादी व इतर लहानमोठे समाजवादी पक्ष यांच्याभोवती गोळा झालेली आहे. लोकशाहीतील समाजवादी व कम्युनिस्ट समाजवादी प्रवाह आणि पक्ष एकवटल्यास, आणि ते आपल्या राष्ट्रीय चळवळीच्या पुरोगामी परंपरेशी सांगड घालू शकल्यास ते एक नवा इतिहास घडवू शकतात आणि भारताच्या भवितव्याचे नवे शिल्प साकार करू शकतात. देशाचे औद्योगीकरण, पिळवणूकशून्य अर्थरचना, विज्ञाननिष्ठ समाज व संस्कृती यांची घडण, व्यक्तिस्वातंत्र्याला व लोकशाही जीवनमूल्यांना पूरक ठरणारी समाज सुव्यवस्था, शुद्धाचारी समाजजीवन, विकेंद्रित समाजरचना इत्यादी निर्मितिक्षम कार्यक्रमावर आधारलेली एक संयुक्त समाजवादी आघाडी आपल्या देशाचे संपूर्ण चित्रच बदलून टाकू शकते. भारतात समाजवादी विचारांचे संश्लेषण घडण्याची सुवर्णसंधी आहे.

पण साम्यवाद्यांशी लोकशाही व समाजवाद यावर एकाच वेळी निष्ठा ठेवणारे यांनी एकता साधावी काय हाच मुख्य प्रश्न आहे, त्याशिवाय या देशात सध्यातरी दुसरा पर्याय नाही, असे प्रस्तुत लेखकाचे मत आहे. त्याची प्रमुख कारणे अशी आहेत --

(१) ही एकता प्रस्थापित न झाल्यास या देशात एकतर केवळ फॅसिझम नाहीतर केवळ साम्यवाद प्रस्थापित होण्याची शक्यता आहे. केवळ फॅसिझम प्रस्थापित होणे ही महाभयंकर गोष्ट आहे, यात शंकाच नाही. पण केवळ साम्यवादाच्या हाती सत्ता जाणे म्हणजेही मोठे नुकसान आहे. साम्यवादाने भांडवलशाहीची चौकट मोडून समाजवाद आणला तरीही केवळ साम्यवादी पक्ष संसदीय लोकशाही व व्यक्ति-

अनुक्रमणिका

स्वातंत्र्य या श्रेष्ठ जीवनमूल्यांना नष्ट करतील अथवा विकृत एकांगी स्वरूप देतील, निदान तसा संभव तरी राहील. कारण जागतिक साम्यवादाने अजून पक्षीय हुकूमशाहीच्या कल्पनेचा त्याग केलेला दिसत नाही. केवळ साम्यवाद्यांच्या हाती संपूर्ण सत्तांतर होणे टाळण्यासाठी तुल्यबल समाजवादी शक्तींच्या संयुक्त आघाडीची गरज आहे.

(२) आज काही वर्षांत जागतिक प्रमाणावर ज्या घटना घडल्या अथवा घडत आहेत त्यांचा परिणाम म्हणून जगात इतरत्र तसाच भारतीय साम्यवाद्यातही आजवरच्या त्यांच्या पक्षीय हुकुमशाहीच्या सिद्धांताला अनुकूल नसलेला उदारमतवादी प्रवाह वाढत आहे. हा प्रवाह समाजवादी एकीकरणात आणखी वाढू शकतो. साम्यवाद्यांची शंभर टक्के विज्ञाननिष्ठा, समाजवादावरील लढाऊ श्रद्धा आणि सुसंघटना या गोष्टी लक्षात घेता या देशात शुद्ध समाजवादाची स्थापना करणे साम्यवादी शक्तीला वगळून जवळ जवळ अशक्य आहे. समाजवादाला साम्यवाद लोकशाहीकडे व उदार-मतवादाकडे वळविता आल्यास तो त्याचा विजय आहे.

(३) साम्यवादी व समाजवादी यांच्या एकतेत समाजवादी शक्ती अर्ध्या प्रमाणात अथवा अर्ध्यापेक्षाही अधिक प्रमाणात सामर्थ्य दाखवू शकल्या तर साम्य-वादाला समाजवादी प्रवाहावर आक्रमण करून गिळंकृत करणे शक्य होणार नाही. उलट अशा सयुक्त समाजवादी आघाडीचे नेतृत्व समाजवाद्यांना आपल्या हातात ठेवता येणे शक्य आहे व अवश्यही आहे. आपल्या शक्तीमुळे ते साम्यवादाला लोकशाही मूल्यांकडे ओढून आणू शकतील. कारण आज लोकशाही समाज-वादाला तत्त्वतः जगभर प्रतिष्ठा प्राप्त झाली असून तो एक आदर्श जीवनमार्ग म्हणून विचारवंतांच्या मनाची पकड फार वेगाने घेत आहे. म्हणून अस्सल समाज-वादाला साम्यवादाची भीती बाळगण्याचे आज कारण उरले नाही.

(४) वेगवेगळया समाजवादी विचारप्रवाहाच्या एकतेतून जे समाजवादी केंद्र निर्माण होईल ते एक-पक्षीय वर्चस्वापासून भिन्न राहील. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे असल्या संयुक्त केंद्रात पक्षवर्चस्व मर्यादित झाल्यामुळे पक्षीय सर्वंकष सत्तेचा धोका टळेल. संयुक्त संघटनेतील पक्षाचे स्वरूप परिणामतः विचारप्रवाह म्हणूनच राहील. व्यवहारात पक्षपणाच नष्ट होईल. पक्षांना केवळ वैचारिक आंदोलनाचे स्वरूप प्राप्त होईल.

(५) याची पुढील अवस्था पक्षविसर्जनाचा क्रम साधण्याची राहील. समाजवादी समाजरचनेच्या प्रस्थापनेनंतर, एक प्रमुख उद्दिष्ट संपल्यावर, या पक्षांना आत्मविसर्जनाचा मार्ग पत्करावा लागेल. विचारवंतांनी जनमनाची त्यादृष्टीने तोवर तयारी केली पाहिजे. अपक्षीय लोकशाहीची स्थापना, अनेक पक्षीय संयुक्त सत्तेतून (जनआंदोलनाला वैज्ञानिक व व्यक्तिस्वातंत्र्य-वादी विचाराची जोड लाभल्यास) पुढील क्रमात होण्याची शक्यता आहे, एवढेच एक विचारसूत्र येथे मांडले जाऊ शकते. यावर आणखी विचार व्हायला पाहिजे. सध्या एवढेच सांगता येईल, की भारतीय समाजवादी विचारप्रवाहांचे भवितव्य आज या विचार-सरणीतील भिन्न प्रवाहांना व त्या प्रवाहातील भिन्न-भिन्न चांगल्या गुणवैशिष्ट्यांना एकत्र आणण्याच्या प्रक्रियेत घडणार आहे. समाजवादाच्या विविध प्रवा-हांनी एकत्र येण्याची ऐतिहासिक गरज भारतीय परि-सरानेच आज निर्माण केली आहे. संसदीय लोक-शाहीच्या माध्यमातून समाजवादी विकेंद्रित लोक-शाहीच्या स्थापनेसाठी काळाचे हे आव्हान आपण स्वीकारले पाहिजे.

अनुक्रमणिका

प्रा. मधुसूदन फडके

अरबी गोष्टींतील भूगोलदर्शन

सुप्रसिद्ध अरबी गोष्टीत (Arabian Nights) कल्पित कथांचा भरणा असला तरी त्यामधून काही प्रत्यक्ष भूप्रदेशांचे व स्थळांचे उल्लेख येतात. त्यांचे सकलन व संपादन करण्याचा प्रस्तुत लेखाचा उद्देश आहे. हे उल्लेख आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्यावरील राज्ये, मध्य पूर्वेतील देश, चीनचा पूर्वभाग आणि हिंदुस्थान व हिंदी महासागरातील बेटे इतक्या विस्तीर्ण प्रदेशावर पसरले आहेत. "मध्य पूर्वेतील आब्बासादी खलीफांच्या राजवटीचा म्हणजेच मुख्यत्वेकरून इसवी सनाच्या आठव्या ते तेराव्या शतकांपर्यंतचा सुमारे पांचशे वर्षांचा काळच" अरबी गोष्टींना मुख्यत्त्वेकरून अभिप्रेत आहे. (पहा : प्रस्तुत लेखकाचा 'अमृत' एप्रिल १९६६ मधील लेख). हा अरबी साम्राज्याच्या ऐन उत्कर्षाचा काळ होता. त्या काळी वरील बहुतेक भूप्रदेशावर अरबांची सत्ता प्रस्थापित झाली होती.

अरबस्तान, हबसाण व ईजिप्त

खुदादादच्या गोष्टीत असे वर्णन येते की, अरबस्तानच्या पश्चिम किनाऱ्यावर एक अरब राजा होता. त्याच्या शिद्दी प्रधानाने राणीला पळवून दर्याबादच्या राज्यात नेले. तेथील राजाने तिला सोडविले. पुढे याही राजाचा वध झाला. तेव्हा इतर राजांची मदत मागण्यासाठी तेथील वजीर राजकन्येला घेऊन समुद्रमार्गे निघाला. वाटेत जहाज फुटून राजकन्या झांजिबारजवळ आफ्रिकेच्या पूर्वकिनाऱ्यास लागली. तेथील राजाने तिच्याशी विवाह केला. परंतु त्याचेही राज्य झांजिबारच्या राजाने बुडविले. म्हणून पतीबरोबर राजकन्या पुन्हा जलमार्गाने परदेशास निघाली. वाटेत एका चांच्याने तिला पकडले व कैरोस नेऊन विकण्याच्या उद्देशाने समुद्रमार्गे चालविले. वाटेत एका किनाऱ्यावरील प्रदेशात उतरला असता पुन्हा एका शिद्याने त्याला ठार करून राजकन्येस हस्तगत केले. शिकारीसाठी फिरत आलेल्या हारनच्या अनेक राजपुत्रासही या शिद्याने कैद केले होते. हारनचा युवराज खुदादाद याने अखेर आपल्या भावास व राजकन्येस सोडवून नेले.

अरबी गोष्टींत अरबस्तानचे उल्लेख एकंदरीने कमीच आहेत. अरबस्तानच्या समोर आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्यावर शिद्दी लोकांचा 'एथियोपिया' हा अर्वाचीन प्रदेश आहे. त्यास पूर्वी 'ॲबिसिनिया' किंवा 'न्यूबिया' असे म्हणत. या हबसाणाचे उल्लेख अरबी गोष्टीत येतात. अरबी कथांच्या काळात अरबस्तानच्या पश्चिम किनाऱ्यावर अरबाप्रमाणेच शिद्यांचीही सत्ता प्रस्थापित झाली होती असे खुदादादच्या गोष्टीवरून दिसून येते. इराणच्या न्यायी खुशरूच्या अमदानीतच शिद्दी किंवा हबशी लोक तांबडा समुद्र ओलांडून अरबस्तानात प्रविष्ट झाले होते असा इतिहासाचाही निर्वाळा आहे. साहजिक खुदादादच्या गोष्टीतील शिद्दी प्रधान असलेल्या अरब सुलतानाचे राज्य अरबस्तानच्या पश्चिम किनाऱ्यावर असावे असा तर्क करिता येतो. त्याच्या नैऋत्येस आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्यावर सोकोत्रा म्हणून जी बेटे आहेत तेथे दर्याबादचे राज्य कल्पिले असावे. पुढे दर्याबादच्या राजकन्येला कैरोला विकण्याच्या उद्देशाने गोष्टीतील चांच्याने तांबडया समुद्रातून प्रवास केल्यावर वाटेत अरबस्तानच्या पश्चिम किनाऱ्यावरील प्रदेशातच मुक्काम केला असे समजले पाहिजे. पूर्वी अरबस्तानातून सुएझमार्गे खुष्कीने इजिप्तमध्ये जाता येत असे. त्यामुळे गुलामांचा चोरटा व्यापार करणाऱ्या चाच्याने कैरोस जाण्यासाठी अशा प्रकारचे आडवळण घेणे स्वाभाविक दिसते. येथेच गोष्टीतील शिद्याचे राज्य असावे.

प्राचीन मिसर म्हणजे ईजिप्त देशाचा निर्देशही अनेक गोष्टींत आढळतो. नाईल नदीच्या काठी असलेल्या या अत्यंत सुपीक प्रदेशाचे, कैरो या राजधानीचे व तेथील पिरॅमीडसारख्या वास्तूंचे

वर्णन 'हात तुटलेल्या गृहस्थाच्या' गोष्टीत येऊन जाते. दमेटा, रोझेटा व अलेक्झांड्रिया या ईजिप्त-मधील शहरांचाही या गोष्टीत उल्लेख आहे. दुसऱ्या एका गोष्टीत मिसर देशचा शमसुद्दीन महंमद म्हणून एक सुलतान व कैरो शहराचा नुरुद्दीन अली म्हणून एक वजीर सांगितला आहे.

मध्य पूर्वेतील देश

हल्लीच्या मध्य पूर्वेतील प्रदेशांपैकी सीरिया, त्याचा सुभेदार कोणी महंमद झेनेबी, त्याची राजधानी दमास्कस व दुसरे एक महत्त्वाचे शहर अलेप्पो यांचे स्पष्ट उल्लेख अरबी गोष्टीत आहेत. सीरियाच्या नैर्ऋत्येस व हल्लींच्या ट्रान्सजॉर्डनमध्ये पूर्वी समेरिया नावाचे राज्य होते. या समेरियाचा व तेथील राजा सामर याचा उल्लेख 'खुदादादच्या गोष्टीत' आहे. खुद्द खुदादादचे 'हारन' चे राज्य हे सीरियाच्या उत्तरेकडील दियरबेकीर सुभ्याचे राज्य होय. इस्रायलमधील प्रसिद्ध जेरूसालेम अरबी गोष्टीत येते. मुसलमान लोक या क्षेत्रास मानीत व तेथील यात्रा करीत अशीही माहिती मिळते.

तैग्रिस व युफ्रेटीस या नद्यांच्या दुआबातील सध्याच्या इराकला पूर्वी मेसापोटेमिया किंवा जझिरा म्हणत. अरबी गोष्टींच्या काळातील इस्लामी साम्राज्याचा हा तर केन्द्रबिंदूच होता. त्याची राजधानी बगदाद. त्याच्या उत्तरेचे मोसल आणि दक्षिणेचे इराणी आखातावरील बसरा बंदर यांचे अरबी गोष्टीत वारंवार उल्लेख येतात. गोष्टींच्या काळात तुर्कस्तानचे स्वतंत्र राज्य बनलेच नव्हते. हल्लींच्या तुर्कस्तानातील आशिया मायनरच्या पश्चिम किनाऱ्यावर त्या काळी मिसिया, लीडिया, केरिया, लीसिया इत्यादी रोमन अमलाखालच्या अनेक वसाहती होत्या. त्याच्या पूर्वेकडील व काळ्या समुद्राच्या दक्षिण किनाऱ्यावरील भागास 'इबेरिया' म्हणत. याच प्रदेशाचा 'एबनी' द्वीप असा उल्लेख अरबी गोष्टीत येतो. त्याच्या पूर्वेस हल्लीप्रमाणेच आर्मेनिया व त्याच्या पूर्वेस हिरकानिया नावाचा प्रांत होता. इबेरिया, आर्मेनिया व हिरकानिया या भागात जुन्या मीडियाचे राज्य होते. या भागातील कॉकेशस पर्वत व त्यावरील रुख पक्षी याचे निर्देश अरबी गोष्टीत अनेकदा येऊन जातात.

पूर्वी इराणच्या नैर्ऋत्येस पार्स म्हणून एक प्रांत होता. त्यावरून सर्व इराणासच पर्शिया हे नाव मिळाले. अल्ली खोजाच्या गोष्टीत इराणातील सुलतानिया, ऱ्ही, कोम, काश्चन, इस्पाहन व शिराझ या प्रसिद्ध शहरांचा नामनिर्देश आहे. इराणच्या ससानी घराण्याची तैसिफॉन ही राजधानी होती. परंतु ससानी पैकी शेवटचा यझ्देदर्द व अरसासिदी घराण्याचे राजे यांची राजधानी तेहरानजवळील ऱ्ही या ठिकाणी होती. नंतरच्या काळात सेफाव्ही घराण्याची राजधानी इस्पाहन येथे आली. राजधानीचे शहर म्हणून शिराझचाही अरबी गोष्टीत उल्लेख आहे. इराणच्या प्राचीन राजांची राजधानी समुद्रातील एका बेटात होती असेही वर्णन एका गोष्टीत येते. हे इराणच्या दक्षिणेचे 'हॉर्मझ' बेट असले पाहिजे.

इराणच्या ईशान्येकडील व कॅस्पिअन समुद्राच्या पूर्वेकडील प्रदेशाचा 'तार्तरी' असा उल्लेख अरबी गोष्टीत येतो. या गोष्टी ज्याला सांगण्यात आल्या त्या शाहरियारचा भाऊ शाहझमान तार्तरीवर राज्य करीत असल्याचा उल्लेख गोष्टीच्या प्रारंभीच आहे. अफगाणिस्तानच्या प्रदेशात पूर्वी बॅक्ट्रिया हे ग्रीक राज्य होते. त्याच्या उत्तरेकडील तार्तरीच्या प्रदेशास सॉग्द नावाच्या नदीवरून सॉग्दियाना असे नाव मिळाले होते अशी माहिती राजपुत्र अहंमदाच्या गोष्टीत आहे. या देशाची राजकन्या गिउहार व राजधानी समरकंद यांचे स्वतंत्र गोष्टीत वर्णन आहे. याच तार्तरी देशाच्या टोकास प्रसिद्ध काशगर शहर असल्याचा निर्देश 'ठेंगण्या कुबड्याच्या' गोष्टीत येतो. समरकंद हल्लीच्या उझबेगिस्तानात व काशगर सिंकियांगमध्ये आहे. तेथून चीनची हद्द सुरू होत असे.

चीन

अल्लाउद्दीन व जादूचा दिवा या गोष्टीत चीनचा सुलतान व त्याची कन्या बद्रुलबदूर हिचा उल्लेख आहे. 'कामर्लझमान' व बदूरा' याही गोष्टीत चीनचा उल्लेख आहे. हा देश दाट लोकवस्तीचा व पराकाष्ठेचा विस्तीर्ण असल्याचे यथायोग्य वर्णन त्या ठिकाणी केले आहे. चीनचा राजा गैऊर, राजकन्या बदूरा व तिचा दूधभाऊ मर्झवान ही नावे इराणी दिसतात. तथापि अरबी गोष्टींच्या काळात इराणी

अनुक्रमणिका

साम्राज्याचा अस्त होऊन गेला होता. त्यामुळे त्या काळात चीनच्या एकाद्या भागावर इराणी क्षत्रपाची सत्ता संभवत नाही. परंतु ती तत्पूर्वी केव्हा तरी असणे शक्य आहे.

चीनपासून खुष्कीच्या एक महिना प्रवासाच्या अंतरावर एक बंदर होते. तेथे मूर्तिपूजकांचे राज्य असून मुसलमानांचा छळ होई. बदूरेशी चुकामूक झाल्यावर कामर्लझमान येथे येऊन पोहोचला असेही वर्णन या गोष्टीत आहे. यावरून त्या काळी चीनच्या जवळपास मुसलमान लोक पसरले होते असे दिसून येते. 'अल्लाउद्दीन व जादूचा दिवा' या गोष्टीतही अल्लाउद्दीन व त्याचा बाप मुस्तफा हे चीनचेच रहिवासी असल्याचा उल्लेख आहे.

हिंदुस्थान व हिंदी महासागरातील बेटे

फकिराच्या गोष्टीत व राजपुत्र अहंमदाच्या गोष्टीत हिंदुस्थानचा व विसनगरच्या राज्याचा उल्लेख आढळतो. त्याचप्रमाणे 'मंतरलेल्या घोड्याच्या गोष्टीत' बंगाल व काश्मीर येथील राज्यांचा उल्लेख आहे.

सिंदबादच्या सात सफरीत हिंदी महासागरातील अनेक बेटांची वर्णने आहेत. अरबी व्यापाऱ्यांच्या पूर्वेकडील प्रदेशाच्या सफरी इराणी आखातावरील बसरा बंदरातून सुरू होत. याच्या एका बाजूस अरबस्तान व दुसऱ्या बाजूस इराणचा किनारा असल्याचे यथोचित वर्णन या सफरीत आहे. इराणी आखात संपल्यावर पूर्व समुद्र अथवा हिंदीमहासागर सुरू होतो. एका बाजूस हबसाण असून दुसऱ्या बाजूस 'वाक्‌वाक्' बेटापर्यंत हा समुद्र साडेचार हजार कोस पसरला आहे असे वर्णन लेखकाने केले आहे. वरील अंतर लक्षात घेता हे वाक्‌वाक् बेट सध्याच्या इंडोनेशियन द्वीपसमूहात असले पाहिजे हे उघड होते.

पहिल्या सफरीत मिऱ्हेज नावाच्या राजाच्या आधिपत्याखालील एका द्वीपसमूहाचा उल्लेख आहे. एका मोठ्या बंदरात या राज्याची राजधानी होती. त्यातील एका बेटाचे नाव 'कासेल' असे सांगितले आहे. या सर्व बेटात कापूर, शिसवी, चंदन इत्यादी वृक्ष असून जायफळ, लवंगा, सुंठ, मिरी इत्यादी मसाल्याचे पदार्थ होत असत.

दुसऱ्या सफरीत 'रोहा' नामक बेटाचा उल्लेख येतो. येथे कापराची प्रचंड झाडे, मोठाले गेंडे आणि गेंड्यांनाही उचलून नेणारे अजस्र रूख पक्षी असल्याचे वर्णन आहे.

चंदनाच्या झाडांनी भरलेल्या सालाहत बेटाचा तिसऱ्या सफरीत निर्देश आहे.

चौथ्या सफरीत 'केला' नामक एका बेटाचा उल्लेख आहे. येथे शिशाच्या खाणी, कापराची झाडे आणि वेत व वेळूची बने असल्याचे वर्णन आहे. कारोमांडेल किनाऱ्यावरील केल नावाचे एक बंदर मार्को पोलोने उल्लेखिले आहे. त्याच्या आसपासच्या प्रदेशास केलाद्वीप म्हटले असावे.

पाचव्या सफरीत कोमारी बेटांचा उल्लेख असून येथे चंदन, मिरी आणि मोतीही उपलब्ध होतात, आणि येथील लोक दारू पीत नाहीत व व्यभिचार करीत नाहीत असे वर्णन आहे. मादागास्कर जवळ कोमारी बेटे आहेत परंतु हिंदुस्थानातील कन्या-कुमारीचा प्रदेश लेखकाच्या मनात असावा. मार्को पोलोच्या प्रवासवृत्तान्तातही कोमारी असाच या भारतीय प्रदेशाचा उल्लेख केला आहे त्यामुळे वरील तर्कास पुष्टी मिळते.

सफरीत भेटणाऱ्या काही बेटात काळे, खुजे व सर्वांगावर केस असलेले लोक; तर काहीत नरभक्षक लोक; तर काहीत खेड्यात राहाणारे साधारण सुधारलेले लोक दिसतात. एका बेटात हत्ती व हस्तिदंताची टेकडी असल्याचे वर्णन आहे. चवथ्या सफरीत भेटणाऱ्या एका बेटात अरबी संस्कृती पोचली होती असे दिसते. इस्लामी किंवा अरबी संस्कृतीच्या ऐन प्रसाराचा काळ लेखकाच्या मनात असल्यामुळे वरील उल्लेख स्वाभाविक वाटतो. या बेटातील लोक खोगिरीशिवाय घोड्यावर बसत आणि मृत पती अथवा पत्नीबरोबर मागे उरलेल्या सहचरास, मृताच्या दरीत जिवंत लोटण्याची वहिवाट येथे होती अशीही माहिती मिळते.

सेरेंदिब

सहाव्या व सातव्या सफरीत सेरेंदिब नावाच्या बेटाचा उल्लेख आहे. तेथील राजाने सिंदबादमार्फत हरून अलरशीदला पत्र व नजराणा पाठविला व

रशीदनेही परत पत्र व भेट पाठविली. येथील नद्यांच्या मुखाशी मोत्ये मिळत व पर्वतात रत्नांच्या खाणी व सुवासिक झाडे असत. अलबेरुणी व मार्को पोलो यांच्या प्रवासवृत्तांतावर टीपा लिहिणाऱ्या व इतरही इतिहासकारांनी सेरेंदिब म्हणजे सिलोन असाच निर्वाळा दिला आहे. तथापि अरबी गोष्टीत सेरेंदिबचे जे विस्तृत वर्णन आले आहे ते पाहता सेरेंदिब हे सुमात्रा बेट असावे असे मानण्यास अधिक जागा सापडते.

'एबनी द्वीप' किंवा 'खालदान बेटे' यासारख्या काही अपरिचित भूप्रदेशांचे व स्थळांचेही निर्देश अरबी गोष्टीत आढळतात. त्यांचाही यथामती उलगडा केला पाहिजे.

एबनी बेट

उदाहरणार्थ, "कामर्लझमान व बदुरा" आणि 'अंग्रियाद व आसाद' या गोष्टीत एबनी द्वीपाबद्दल माहिती मिळते. या द्वीपावर आर्मनॉस नावाचा राजा राज्य करीत असे. त्याला ह्यातलनेफस नावाची कन्या होती. तिचे कामर्लझमानने पाणिग्रहण केले. हे द्वीप बरेच विस्तृत असून त्याच्या मध्यभागी एक उंच पर्वत होता. राजधानीच्या बंदरापासून सव्वा महिना खुष्कीचा प्रवास करून राजपुत्र अंग्रियाद व आसाद हा पर्वत उतरून पलीकडे गेले. तेथे अग्निपूजक मागींचे एक शहर होते. तेथे मुसलमान अल्पसंख्य असून त्यांचा छळ करण्यात येई. एका अग्निपूजक म्हाताऱ्याच्या कावमा व बोस्तना या दोन मुलींनी राजपुत्र आसादाचा असाच छळ केला. या शहरापासून काही अंतरावर समुद्र-किनाऱ्यावर एक ज्वालामुखी पर्वत असून तेथे अग्निपूजक प्रतिवर्षी नरबळी देत. बहराम नावाच्या अग्निपूजकाने आसादला अशाच प्रकारे बळी देण्यास आणले होते. मांगींच्या या शहरापासून चार दिवसाच्या खलाशी वाटेवर मॉर्ग्याना नावाच्या मुसलमान राणीचे राज्य होते असे वर्णन या गोष्टीत येऊन जाते.

झरथुष्ट्राचा पारशी धर्म हा प्राचीन इराणांतील अग्निपूजकांचा धर्म होता हे प्रसिद्धच आहे. सातव्या शतकात इराणी साम्राज्य अरबांनी हस्तगत केल्यावर पारशी धर्माची व मागी लोकांची इराणातून हकालपट्टी झाली. काही पारशांनी इराणच्या दक्षिणेस असलेल्या हॉर्मझ बेटात आश्रय घेतला. तेथून थोड्या वर्षांनी हे अग्निपूजक प्रथम हिंदुस्थानातील दीव बंदरात आले. तेथून सुमारे १९ वर्षांनी इ. स. ७१६ मध्ये दमणच्या दक्षिणेस संजाण येथे त्यांनी आश्रय घेतला.

इतिहास असेही सांगतो की, पुष्कळ पारशी लोक धर्मच्छळास प्रारंभ झाल्यावर इराणच्या उत्तरेस खोरासानच्या डोंगराळ प्रदेशात पळून गेले. तेथे सुमारे १०० वर्षे ते सुरक्षित होते. किंबहुना असीरियन सत्तेच्या काळातच इराणच्या उत्तरेस असलेल्या एलबुर्झ व झॅग्रॉस पर्वताच्या उतरणीवरील प्रदेशात आर्यवंशी मेदी लोकांनी आपले राज्य स्थापिले होते. एकबताना अथवा हल्लीचे हमादान ही त्याची राजधानी होती. पारशी धर्माचा संस्थापक झरथुष्ट्र हा ज्या आझरबैझान प्रांतातला तोही इराणच्या उत्तरेसच आहे. सारांश, या भागात पारशी धर्माचे आद्यपीठ असल्याने मुसलमानी सत्तेच्या काळातही तेथे काही दिवस अग्निपूजकांनी जोर धरला असल्यास नवल नाही.

वरील इतिहासावरून असा निष्कर्ष काढण्यास हरकत नाही की, काळ्या समुद्राच्या दक्षिण किनाऱ्यावरील तुर्कस्तानच्या प्रदेशास लेखकाने एबनी बेट म्हटले असावे. अरबी गोष्टीतील अनेक उल्लेखांवरून समुद्रकिनाऱ्यावरील कोणत्याही प्रदेशास बेट ही संज्ञा लेखकाने लावली असल्याचे दिसून येते. त्यामुळे 'बेट' ही संज्ञा येथेही स्थूल अर्थाने घ्यावयास हरकत नाही. पूर्वी आशियामायनरच्या सर्वच भागास ऐबेरिया म्हणत. नोहाचा मुलगा शेम; त्याचा पणतू एबर. त्याची संतती या भागात स्थिरावली. म्हणून या भागास एबरी अथवा ऐबेरिया हे नाव पडले असावे. इराणी सत्तेच्या काळात आशियामायनरच्या पश्चिम किनाऱ्यावर रोमन अमलाखालच्या अनेक वसाहती होत्या. त्यांच्या पूर्वेस असलेल्या काळ्या समुद्राच्या दक्षिण किनाऱ्यावरील प्रदेशास 'इबेरिया' म्हणत तेच हे एबनी द्वीप असावे. या द्वीपात ख्रिस्ती लोकांचा प्रवेश झाला होता. अशी माहिती अरबी गोष्टीत आहे तिला इतिहासाचा दुजोरा मिळतो. रोमन वसाहतीचे सान्निध्य लक्षात

घेता ख्रिस्ती लोकांचे येथील वास्तव्य स्वाभाविकही दिसते. एबनीच्या पूर्वेकडील कॅस्पियन समुद्रापर्यंतच्या प्रदेशात अग्निपूजकांची कांही शहरे असावीत. अग्निपूजक बळी देत तो ज्वालामुखी पर्वत कॅस्पियन समुद्रापाशीच असू शकेल. याच समुद्राच्या किनाऱ्यावर मॉर्ग्यांना या मुसलमान राणीचे राज्य कल्पिले असावे. या भागातून एबनी बेटास बेदाणा जात असे हे गोष्टीतील वर्णन यथातथ्य दिसते, कारण या भागातील आझरबैजान प्रांत आजही द्राक्षे व बेदाणा यावद्दल प्रसिद्ध आहे.

खालदन बेटे

'कामर्लझमान व बद्दूरा' या गोष्टीत अशीही माहिती मिळते की इराणच्या किनाऱ्यापासून वीस दिवसाच्या खलाशी वाटेवर महासागरात अनेक बेटे आहेत. त्यांना 'खालदनच्या वंशजांची बेटे' असे म्हणतात. या बेटांचे एक मोठे राज्य होते. त्यावर शाहझमान नावाचा एक मुसलमान राजा पूर्वी राज्य करीत असे. त्याची स्त्री फतिमा. कामर्लझमान हा त्यांचा पुत्र. कामर्ल म्हणजे अरबी भाषेत चन्द्र. यानेच चीनची राजकन्या बदूरा व एबनीची राजकन्या हयातलनेफस यांचे पाणिग्रहण केले. त्यांचेपासून त्याला अंग्रियाद व आसाद असे दोन पुत्र झाले. वरील व्यक्ती कल्पनिक असल्या तरी खालदन बेटांचा भौगोलिक उल्लेख खरा असला पाहिजे.

मात्र ही 'खालदन बेटे' नेमकी कुठे आहेत याचा गोष्टीत खुलासा नाही. इराणी आखातात इराणच्या दक्षिण किनाऱ्यालगत आणि अरबस्तानच्या पूर्व किनाऱ्यालगत अनेक बेटे आहेत. परंतु गोष्टीत सांगितल्याप्रमाणे ती वीस दिवसाच्या खलाशी प्रवासाच्या अंतरावर नाहीत आणि उघड्या समुद्रातही नाहीत. सीनाचे द्वीपकल्प आणि त्यालगतची अथवा तांबड्या समुद्रातील ही काही अवांतर बेटे असावी असे समजल्यास अंतर सामान्यतः बरोबर जमेल. पण याच गोष्टीतील एबनी बेटासंबंधीचा उल्लेख या उपपत्तीच्या आड येतो.

–कारण याच गोष्टीत असे सांगितले आहे की, चीनपासून खालदन बेटे हजारो कोस दूर होती. चीनपासून या बेटास जाणारा एक बहुतांशी खुष्कीचा पण दूरचा मार्ग होता. याच मार्गाने प्रवास करून मर्झवानाने कामर्लझमानाचे बदूरेशी लग्न लावून दिले. पण दुसरा एक जवळचा पण बहुतांशी सागरी मार्ग एबनी द्वीपावरून जात असे. याच मार्गाने मर्झवान खालदन बेटात व बदूरा एबनी बेटात पोचली होती.

खालदन बेटे तांबड्या समुद्रात होती. असे समजल्यास अरबस्तानच्या समुद्रकिनाऱ्यावरील काही भागास अथवा बलुचिस्तानास एबनी द्वीप समजावे लागेल. परंतु एबनी द्वीप बरेच विस्तृत असल्याचे वर्णन आहे ते बलुचिस्तानशी जुळत नाही. त्याचप्रमाणे मुसलमानी सत्तेच्या ऐन उत्कर्ष काळात अरबस्तानचा उल्लेख 'एबनी नावाचे बेट' असा कोणीही अरबी लेखक करणे शक्य नाही. त्यामुळेही एबनी द्वीपाचा व खालदन बेटांचा शोध अन्यत्र घेणे जरूर आहे. काळ्या समुद्राच्या दक्षिण किनाऱ्यावरील सध्याच्या तुर्कस्तानच्या प्रदेशास एबनी द्वीप हे नाव अरबी गोष्टींच्या लेखकानी दिले असावे ही कल्पना वर मांडलीच आहे. ती मान्य केल्यास खालदनच्या वंशजाची बेटे एजियन समुद्रात असावी असा कयास करिता येतो. ग्रीसच्या दक्षिणेस आणि आशियामायनरच्या पश्चिमेस इम्ब्रोज, लेसबॉस, सॅमॉस, ऱ्होडस्, क्रीट इत्यादी अनेक लहान मोठ्या बेटांचा एक पुंज आहे. त्यापैकीच काही बेटांच्या समूहास वरील नाव असावे. ही बेटे भूमध्य समुद्रात म्हणजे कथेतील वर्णनाप्रमाणे उघड्या समुद्रात आहेत. कथेचा काळ हा मुसलमानी सत्तेच्या उत्कर्षाचा काळ असल्याने या बेटावर कथेत वर्णिल्याप्रमाणे त्या काळी मुसलमान राजांचा अंमल असणेही असंभवनीय नाही. किंबहुना क्रीट व सिसिली बेटावर या काळात अरबांची सत्ता प्रस्थापित झाली होती असा इतिहासाचा स्पष्ट निर्वाळा आहे. किनाऱ्यावर रोमन वसाहती असल्याने एबनी द्वीपास वळसा घालूनच अरबी लोक या बेटात जात असावेत. त्यांच्या आसपासच्या काही बेटात ग्रीक वसाहती होत्या. त्यामुळेच कामर्लझमानाच्या एका सरदाराचे 'गियांडर' असे ग्रीक पद्धतीचे नाव आढळून येते.

'खालदनच्या वंशजांची बेटे' हे नाव उघडपणे खाल्डियन लोकांशी निगडित आहे. हल्लीच्या इराकवर

फार प्राचीन काळी यांची अधिसत्ता होती. हे मूळचे तुराणी असावे असे म्हणतात. त्यांनीच असीरियनांचा पराभव केला. हल्लींच्या बगदादजवळ बॅबिलोन येथे त्याची राजधानी होती. इ. स.पू. ५३८ मध्ये इराणच्या कैखुशरू ऊर्फ सायरसने या बॅबिलोनियन म्हणजेच खाल्डियन लोकांचा पाडाव केला. त्यानंतर त्यांनी ज्या अनेक ठिकाणी आश्रय घेतला त्यामध्येच 'खालदनच्या वंशजांच्या बेटांचा' समावेश होत असावा. पुढे मुसलमानी अमलातही प्राचीन परंपरा दाखविणारे हे नाव रूढ असावे.

खालदनद्वीपास एवनी द्वीपावरून जाणारा जो सागरी मार्ग होता त्यामध्ये 'तार्फ' नावाचे एक मोठ्या वस्तीचे व व्यापाराचे बंदर होते असा उल्लेख याच गोष्टीत येतो. हे बहुधा काळ्या समुद्राच्या पूर्व किनाऱ्यावरील (Taupses) किंवा अधिकांशी दक्षिण किनाऱ्यावरील ट्रॅब्झॉन (Trabzon) बंदर असावे. ग्रीक लोक याचाच Trapezus असा उच्चार करीत. चीनपासून चार महिने खुष्कीचा प्रवास करून कामर्लझमानाचा शोध लावण्यासाठी मर्झवान याच बंदरात आला होता. एथूनच जलमार्गाने बदूरा एवनी बेटात आली व मर्झवान खालदन द्वीपास पोचला, असे कथानिवेदकांचे वर्णन आहे. यावरून असे दिसते की चीनसारख्या पूर्व देशातील प्रवासी व व्यापारी या तार्फ बंदरातून निघून काळा समुद्र ओलांडून पुढे जात असावेत. बॉस्फरसच्या सामुद्रधुनीमुळे प्रथम काळ्या समुद्रातून मार्मोराच्या समुद्रात व डार्डानेल्सच्या सामुद्रधुनीमुळे एजियन अथवा भूमध्य समुद्रात उतरता येते. याच मार्गाने चीनचा मर्झवान खालदन बेटास पोचला, अशी वरील गोष्टीच्या लेखकाची कल्पना असावी. अशा पूर्व-पश्चिम समुद्रमार्गाने प्रवाशांची व व्यापाऱ्यांची रहदारी चालू असे हे तेराव्या शतकातील मार्को पोलोच्या प्रवासवृत्तान्तावरूनही उघड होते.

कृष्णद्वीप आणि फराशी व लाबिया – राणीची राज्ये

अरबी गोष्टीत कोणा कृष्णद्वीपच्या राज्याचाही उल्लेख येतो. या राज्याचे महंमद व इपितिमारस असे राजेही सांगितले आहेत. हे पूर्वी चार बेटांचे राज्य असून तेथे यहुदी, ख्रिस्ती, पारशी व मुसलमान वस्ती होती. एका चेटकिणीच्या करणीमुळे बेटांच्या टेकड्या, राजधानीचे तळे आणि वरील लोकांचे निरनिराळ्या रंगाचे मासे झाले असे या गोष्टीत वर्णन आहे. हा सर्व प्रदेश समुद्रातील बेटांचा बनला होता व तेथील वस्ती संमिश्र होती हे लक्षात घेता एवनी द्वीपाचा जो भाग वर वर्णन केला त्यामध्येच लेखकाने हे राज्य कल्पिले असावे असे दिसते.

समरकंदची राजकन्या गिऊहार हिच्या गोष्टीत असे सांगितले आहे की समुद्रातील राज्याची फराशी म्हणून राणी होती. तिची मुलगी गुलनार व मुलगा सालेह. गुलनारचे इराणच्या राजाशी लग्न होऊन तिला बेदर नावाचा पुत्र झाला. बेदर वयात आल्यावर समरकंदच्या गिऊहार नावाच्या राजकन्येवर त्याचे मन जडले. समरकंदच्या राजाची या लग्नाला संमती मिळेना, म्हणून सालेहने त्याला कैद केले. तेव्हा राजकन्या एका द्वीपात पळून गेली. तेथे बेदरची गाठ पडल्यावर तिने सूडबुद्धीने त्याला राघूचे रूप दिले. त्या राघूला तिच्या दासीने प्रथम एका पाषाण-द्वीपात व नंतर एका सुपीक बेटात नेऊन सोडले. या बेटाची राणी जादूगार होती. तिच्या कृपेने बेदरला पूर्वीचे रूप मिळाल्यावर तो समुद्रमार्गे स्वदेशी जाण्यास निघाला. दहा दिवसाच्या प्रवासानंतर जहाजाची वाताहत होऊन तो किनाऱ्याला लागला आणि तेथील लाबिया नावाच्या मांत्रिक राणीच्या तडाख्यात सापडला. अखेर तेथून सुटका झाल्यावर गैरसमज दूर होऊन त्याचे व राजकन्येचे लग्न झाले.

तांबड्या समुद्रात फरासान म्हणून बेटे आहेत. फराश अथवा फराशी राणीचे राज्य तेथे कल्पिले असावे. येथील लोकांची भाषा हिब्रू होती असा गोष्टीत उल्लेख आहे. ज्यू लोकांची भूमी फरासानपासून लांब नसल्याने ही गोष्ट स्वाभाविकच ठरते. लाबिया राणीचे राज्य काळ्या व कॅस्पियन समुद्राच्या दरम्यान कल्पिले असावे. इ. स. पूर्वीच्या काळात या प्रदेशात एक स्त्री-राज्य होते असे जुने इतिहासकार सांगतात. प्लूटार्कने आपल्या चरित्रावलीत त्याचा उल्लेख केला आहे. त्या राज्याच्या स्मृतीवरून अरबी गोष्टींच्या लेखकाने अथवा निवेदकाने लाबिया राणीची कल्पना बसविली असावी.

अनुक्रमणिका

प्रा. द. भि. कुलकर्णी

मर्ढेकर: नवे आकलन (उत्तरार्ध)

: ३ :

मर्ढेकरांची साहित्यमीमांसा

मर्ढेकरांची साहित्यमीमांसा हा त्यांच्या सौंदर्य-मीमांसेचाच एक सुसंगत आविष्कार आहे.

मर्ढेकरांच्या मते –

सौंदर्यसंबोधाची प्रतीती देणे हे सर्व ललितकलांचे एकमेव प्रयोजन होय.

साहित्य ही एक ललितकला होय.

म्हणून सौंदर्यसंबोधाची प्रतीती देणे हे साहित्य-कलेचे एकमेव प्रयोजन होय.

साहित्य ही जर एक ललितकला आहे तर मर्ढेकरांची कलास्वरूपमीमांसा साहित्यकलेला आपोआपच लागू पडावयास नको का? मग मर्ढेकरांनी वेगळी 'साहित्यमीमांसा' का केली? अशीच वेगळी 'संगीतमीमांसा' 'चित्रमीमांसा' का केली नाही?

याचे कारण 'साहित्य' ही ललितकला असली तरी इतर ललितकलांपेक्षा तिचे माध्यम मूलतः भिन्न आहे. संगीत, चित्रादी इतर सर्व ललितकलांचे माध्यम संवेदनारूप आहे. साहित्यकलेचे माध्यम मात्र संवेदनारूप नसून संवेदना-प्रतिमारूप ऊर्फ भावानु-भूतीरूप आहे. म्हणून संवेदनारूप ललितकलांना लागू पडणारी आपली कलास्वरूप मीमांसा संवेदना-प्रतिमारूप साहित्यकलेला कशी लागू पडते हे सांगण्याची जबाबदारी मर्ढेकरांवर होती.

आपली कलास्वरूपमीमांसा साहित्याला लावून दाखवून मर्ढेकरांनी आपली जबाबदारी पार पाडली आहे.

दुसरे कारण मर्ढेकर स्वतः साहित्यनिर्मिती करीत होते.

साहित्यनिर्मिती करीत असताना त्यांच्यासमोर जे कलाविषयक मूलभूत प्रश्न निर्माण झाले होते त्यांतूनच त्यांच्या कलास्वरूपविषयक चिंतनास प्रारंभ झालेला होता.

म्हणून आपली कलास्वरूपमीमांसा साहित्यकलेस कितपत लागू पडते हे पहाणे त्यांच्यातील कलावंतास फार अगत्याचे होते.

–अशा तऱ्हेने मर्ढेकरांच्या आत्मचिंतनाशी आणि कलास्वरूपमीमांसेशी त्यांच्या साहित्यमीमांसेचे आंत-रिक संबंध आहेत.

साहित्य हे शब्दांचे बनलेले दिसते. शब्द हे साहित्याचे माध्यम नसून साधन होय.

साहित्याचे माध्यम साहित्यात व्यक्त होणारी भावानुभूती (ऊर्फ संवेदना-प्रतिमा) हे होय.

भावानुभूती अभिव्यक्त करणे हे शब्दांचे कार्य असते. भाषेतील सर्वच शब्द प्रत्यक्षपणे भावानुभूती व्यक्त करू शकत नाहीत. प्रत्यक्षपणे भावानुभूती व्यक्त करणाऱ्या शब्दांस 'प्रसरणशील शब्द' अशी संज्ञा आहे. विशिष्ट क्रियापदे, विशिष्ट विशेषणे आणि विशिष्ट क्रियाविशेषणे ही प्रसरणशील शब्दांची उदाहरणे होत. भाषेतील उरलेले शब्द हे अप्रसरणशील असतात. प्रसरणशील शब्दांना साह्य करणे हे त्यांचे कार्य असते.

भाषा या साधनाद्वारे सिद्ध झालेली भावानुभूती हे साहित्यकलेचे माध्यम होय. हे माध्यम हाच साहित्यमीमांसेचा अभ्यासविषय असतो.

या माध्यमरूप भावानुभूतीचे मूल्यमापन कसे करावयाचे?

त्याबाबत पुढील तत्त्वे मार्गदर्शक ठरतात.

(१) साहित्यात माध्यमरूप घेणाऱ्या भावा-नुभूतीचा साहित्यिकास स्वतः **प्रत्यय** आलेला असावा.

–या मार्गदर्शक-तत्त्वास **लेखनपूर्व आत्मनिष्ठा** असे नाव आहे.

(२) अशी प्रत्यययुक्त भावानुभूती **मूळ स्वरूपात** शब्दांतून व्यक्त झाली पाहिजे.

–या मार्गदर्शक तत्त्वास **लेखनगर्भ आत्मनिष्ठा** असे नाव आहे.

अनुक्रमणिका

(३) अशी विशिष्ट भावानुभूती तुटक न वाटता संलग्न भावानुभूतींशी तिचा आंतरिक संबंध असला पाहिजे.

—या मार्गदर्शक तत्त्वास **वाङमयीन तादात्म्य** असे नाव आहे. ('अनेक संदर्भसूचकता' असे दुसरे नाव तिला देता येईल.)

(४) अशा विशिष्ट भावानुभूतींचा संबंध सत्य आणि सौंदर्य या अंतिम मूल्यांशी असला पाहिजे.

—या मार्गदर्शक तत्त्वास **वाङमयीन महात्मता** असे नाव आहे.

या चार तत्त्वांमुळे साहित्यातील भावानुभूतीचे, तिच्या पोताचे —साहित्यकृतीचे नव्हे— मूल्य ठरते. या तत्त्वांचे जितके आधिक्य तितकी ती भावानुभूती श्रेष्ठ. उत्कटता, उत्स्फूर्तता, चिंतनशीलता, सूक्ष्मता, वैचारिकता, व्यापकता, सामाजिक वास्तवता, मानसशास्त्रीय वास्तवता, शास्त्रशुद्धता, कल्पकता इत्यादी सर्व तत्त्वांचा समावेश या चार मार्गदर्शक तत्त्वांमध्ये होतो.

परंतु ही तत्त्वे साहित्यकृतीच्या मूल्यमापनाची तत्त्वे नसून साहित्यकृतीतील भावानुभूतीच्या मूल्यमापनाची तत्त्वे होत.

अशा श्रेष्ठ भावानुभूतीतच संपन्न लय असू शकतो.

कनिष्ठ भावानुभूती-म्हणजे आत्मनिष्ठा, तादात्म्य, महात्मता यांचा अभाव असलेली भावानुभूती— आणि संपन्न लय असा प्रकार संभवतच नाही.

कारण संपन्न लय निष्पन्न होण्यासाठी माध्यमात —भावानुभूतीत— विविध व जिवंत घटकांची उपस्थिती आवश्यक असते. भावानुभूती कनिष्ठ असेल-आत्मनिष्ठारहित, तादात्म्यरहित, महात्मतारहित असेल— तर त्या भावानुभूतीत विविध आणि जिवंत घटक असू शकत नाहीत. मग त्यावर आधारित लय, संपन्न लय कुठला? त्यातून घाट कसा निर्माण होणार?

म्हणून एखादी साहित्यकृती लयसंपन्न आहे याचा अर्थ 'ती साहित्यकृती भावानुभूतीसंपन्नही आहेच' असा होतो.

परंतु या उलट, एखादी साहित्यकृती 'भावानुभूतीसंपन्न आहे' याचा अर्थ 'ती लयसपन्न आहेच' असा होत नाही.

म्हणून 'भावानुभूतीसंपन्नता' या निकषापेक्षा 'लयसंपन्नता' हे तत्त्व अधिक समावेशक आहे.

या दोन्ही घटकांचे द्वैत सर्वार्थाने लोपवून टाकणारे घाट-तत्त्व या उभय-तत्त्वांकडून अधिक समावेशक आणि अंतिम तत्त्व होय.

साहित्यातील भावानुभूतीचा लय म्हणजे भाषेची नादमधुरता— अथवा तालबद्धता हा श्रुतिसंवेदनेचा गुण होय.

साहित्यातील भावानुभूतीचा लय म्हणजे तिच्यातील संपन्न, जिवंत, व विविध घटकांचा संवाद-विरोध समतोलात्मक आंतरिक संबंध.

या भावानुभूतीतील संवाद-विरोध-समतोलात्मक संबंधासच साहित्याच्या क्षेत्रात 'भावनानिष्ठ समतानता' असे नाव आहे.

भावनानिष्ठ समतानता म्हणजे भावानुभूतीतील विविध घटकांमधील लयसंबंध.

साहित्यातील भावानुभूती घटकरहित असेल तर भावनानिष्ठ समानता ऊर्फ भावानुभूतीतील लयबद्धता निर्माणच होणार नाही म्हणून अ-साहित्यिकाची भावानुभूती घटकरहित असू शकेल परंतु साहित्यिकाची साहित्यरूप घेऊ पाहणारी भावानुभूती कधी घटकरहित, एकपदात्मक असू शकत नाही.

संवाद-विरोध—समतोलसंबंधास साहित्याच्या संदर्भात 'भावनानिष्ठ समतानता' असे वेगळे नाव का द्यावे?

—साहित्येतर ललितकलांमधील व निसर्गामधील सौंदर्यप्रत्यय हा निरपवादपणे संवेदनाधिष्ठित असतो.

—साहित्यामध्ये संवेदना हे माध्यम नसते तर संवेदना प्रतिमा ऊर्फ भावानुभूती हे माध्यम असते. या माध्यमाद्वारे सौंदर्यप्रत्यय येत असतो.

म्हणजे साहित्यातील प्रत्ययच फक्त भावानुभूतीनिष्ठ असतो. इतर सर्वदूरचा सौंदर्यप्रत्यय हा संवेदनानिष्ठ सौंदर्यप्रत्यय असतो. साहित्यातील सौंदर्यप्रत्ययाची ही भिन्नता, हे वैशिष्टय स्पष्ट करण्यासाठी 'भावनानिष्ठ' हा शब्द वापरावयाचा.

'समतानता' हा 'संवाद-विरोध-समतोलसंबंध' याचा पर्यायी शब्द आहे. साहित्येतर ललितकलांतील संवाद-विरोध-समतोलसंबंध हा इंद्रियसंनिकर्षजन्य असतो. ज्ञानेंद्रियांच्या साहाय्याने त्याची प्रतीती घेता येते. साहित्यातील संवाद, विरोध-

समतोलसंबंध इंद्रियसंनिकर्षजन्य नसतो. कारण तो संवेदनांवर आधारित नसून संवेदना-प्रतिमांवर ऊर्फ भावानुभूतीवर आधारित असतो. त्याचा अनुभव इंद्रियसंनिकर्षाने नव्हे तर **कल्पनेने** घ्यावा लागतो. साहित्यातील संवाद–विरोध–समतोलसंबंधाची ही अस्तित्वभिन्नता आणि प्रतीतिमार्ग-भिन्नता स्पष्ट करण्यासाठी ' संवाद-विरोध-समतोलसंबंध ' या ऐवजी (भावनानिष्ठ) 'समतानता' असा शब्द वापरणे इष्ट ठरते.

साहित्याची नवीनता (ओरिजिनॅलिटी) भावनानिष्ठ समतानतेच्या म्हणजेच भावनानिष्ठ संवाद-विरोधसमतोलसंबंधाच्या नवीनतेवर (ओरिजिनॅलिटीवर) अवलंबून असते. सर्वच कलांतील नवीनता (ओरिजिनॅलिटी), नवीन (ओरिजिनल) संवाद-विरोध-समतोलसंबंधावर अवलंबून असते.

(१) आत्मनिष्ठापूर्ण, अनेकसंदर्भसूचक, सत्य-सौंदर्यसंबोध–संबंधित, अनेक घटकयुक्त भावानुभूती = श्रेष्ठ भावानुभूती.

(२) गणितीपद्धतीने आणि श्रेणीपद्धतीने ज्याची संपन्नता सिद्ध होऊ शकते असा लय = श्रेष्ठ लय.

(३) श्रेष्ठ भावानुभूतीतच संपन्न लय शक्य.

(४) भावानुभूती > लय > (घाट) = साहित्यकृती

(५) श्रेष्ठ भावानुभूती > संपन्न लय > (श्रेष्ठ संपन्न घाट) = श्रेष्ठ साहित्यकृती . .

अशा श्रेष्ठ साहित्यकृतीत नवीनता (ओरिजिनॅलिटी) असतेच. श्रेष्ठतेचे नवीनता हे एक अपरिहार्य लक्षण आहे. श्रेष्ठतारहित नवीनता हा नवीनतेचा केवळ आभास असतो.

मर्ढेकरांची साहित्यमीमांसा* थोडक्यात अशी आहे.

त्यांच्या सौंदर्यमीमांसेप्रमाणेच त्यांची ही साहित्य-मीमांसा अत्यंत मूलगामी आणि आत्मसुसंगत आहे. सौंदर्यमीमांसेशी तिचा इतका आंतरिक आणि सुसंगत संबंध आहे की, मर्ढेकरी सौंदर्यमीमांसेचाच एक साहित्यकलासापेक्ष आविष्कार, असे तिचे स्वरूप आहे.

: ४ :

मर्ढेकरांची कला-साहित्यसमीक्षा

मर्ढेकरांनी आपली सौंदर्यमीमांसा आणि साहित्य-मीमांसा अनेक कला-साहित्यकृतींना लावून दाखविली आहे. परंतु आपल्या कलातत्त्वांचे विशिष्ट कलाकृतींना उपयोजन करताना त्यांनी पढिक (अॅकेडेमिक) पद्धती स्वीकारली नाही. म्हणजे आपली संपूर्ण कलास्वरूपमीमांसा एखाद्या श्रेष्ठ समजल्या गेलेल्या कलाकृतीला लावून दाखवून तिची श्रेष्ठता सिद्ध करणे– किंवा– नाकारणे अथवा तिच्या आधारे आपली कलामीमांसा कशी तर्कशुद्ध आहे हे सिद्ध करणे असा प्रकार त्यांनी केला नाही.

कारण –


(१) विशिष्ट कला-तत्त्वे **सिद्ध करण्यासाठी** कलाकृतीचा आस्वाद घेणे, तिचे परीक्षण करणे हे त्यांच्या कलामीमांसेशी विसंगत होते.

(२) विशिष्ट कलाकृतीची **श्रेष्ठता** सिद्ध करण्यासाठी कलामूल्ये उपयोजून पाहणे हेही त्यांच्या कला मीमांसेशी विसंगत होते.

(३) त्यांच्या मते **कला-तत्त्वांची सिद्धी** तार्किक पद्धतीने करावयाची असते.

---

* **मर्ढेकरांची साहित्यमीमांसा**



–त्याप्रमाणे त्यांनी आपली कलास्वरूपमीमांसा शास्त्र रूपाने मांडली.

(४) त्यांच्यामते **कलाकृतीची श्रेष्ठता हा अनुभवाचा विषय** असतो. तिच्यातील भावानुभूतीची श्रेष्टता, लयाची संपन्नता, तिचा घाट, तिच्यातील नवीनता (ओरिजिनॅलिटी) यांचे **वर्णन, विश्लेषण** करता येत नाही. हे सर्व घटक तिच्यात असूनही ते वेगवेगळे काढता येत नाहीत. **त्यांचा एकात्म आस्वादच शक्य असतो**. किंवा या घटकांचे विशिष्ट कलाकृती-निरपेक्ष तात्विक आणि सर्वसामान्य (जनरल) विवेचन शक्य असते. उदाहरणादाखल म्हणून कलाकृतीविशिष्ट (पर्टिक्युलर) प्रयत्न केला तर तो 'कलाकृतीतील सर्व सौंदर्य स्पष्ट केले' या अर्थाने घ्यावयाचा **नसून कलातत्त्वांचे** स्पष्टीकरण म्हणून घ्यावयाचा असतो.

म्हणूनच 'लोकचित्रकलेचे सामर्थ्य[१]' 'खेड्यातील रात्र[२]' हे काय असे होई?[३]" इत्यादी प्रसंगीचे मर्ढेकरांचे विवेचन विशिष्ट घटकातील संपूर्ण सौंदर्य दाखविणारे नसून ज्या विशिष्ट मुद्याचे विवेचन मर्ढेकर करीत असतात तो मुद्दा स्पष्ट करणारे असते.

ही त्यांची अप्रत्यक्ष कला-साहित्यसमीक्षा होय. तिचे सर्व पूर्वसंदर्भ लक्षात घेऊन, तिचे मूल प्रयोजन कलाकृतींचे सर्वांगीण सौंदर्यदर्शन हे **नसून** विशिष्ट कलातत्त्वांचे स्पष्टीकरण हे आहे हे लक्षात ठेवून या कला-साहित्यसमीक्षेकडे पाहिले पाहिजे :

अ. साहित्येतर कलाकृतींचा आस्वाद घेताना संवेदनेकडे केवळ संवेदना म्हणून पाहणे आवश्यक असते. व्यवहारात मात्र संवेदनेकडे एक 'चिन्ह' म्हणून पाहणे सोयीचे असते. ज्ञान आणि अनुभव यांच्या वाढीबरोबर, वयाबरोबर संवेदनेकडे चिन्ह म्हणून पाहण्याचीही दृष्टी वाढत जाते, कलेच्या आस्वादाला ती घातक असते. बालकांमध्ये अशी 'चिन्ह-दृष्टी' नसते, कलावंत याच अर्थाने आपले 'शैशव' जपत असतो– हा मुद्दा स्पष्ट करताना मर्ढेकरांनी, लहान मूल संवेदनेचा कसा आस्वाद घेते याचे प्रत्ययपूर्ण वर्णन केले आहे.

"एकदा एक दीड वर्षाचे मूल आपल्या खोलीच्या खिडकीतून बाहेर असलेल्या झाडाच्या पानांकडे टक लावून पाहात होते. नुकतीच पावसाची सर येऊन गेली असल्याने त्या पानांचा ओलसर हिरवा रंग तुकतुकीत आणि अतिशय खुलून दिसत होता. त्यातच मंद वाऱ्याच्या झुळुकीबरोबरच ती पाने सळसळत डुलत होती. आणि अत्यंत कोवळ्या सूर्यकिरणांनी त्या ओलसर हिरव्या पानांना आतून प्रकाशित केले होते. या पानांकडे ते मूल इतक्या तन्मयतेने, एकाग्रतेने पाहात होते की, तिऱ्हाइताला आश्चर्यच वाटले असते. आता या संदर्भात नेत्र-संवेदनाच्या अंगभूत गुणांशिवाय दुसऱ्या कशाचे इतके आकर्षण त्या मुलाला वाटले असेल बरे?"[४]

हे लहान मूल पानाकडे 'दृक्संवेदनाचा एक विषय' या दृष्टीने पाहत आहे. हे पान अमुक झाडाचे आहे, त्याचे नाव अमुक आहे, त्याचा उपयोग तमुक आहे इत्यादी 'अर्थ' त्याच्या मनात नाही. त्यामुळे काय घडले? संवेदनातील विविध घटक त्याला विलक्षण उत्कटतेने प्रतीत होऊ लागले (१) हिरवा रंग (२) ओलसरपणा (३) तुकतुकीतपणा (४) सळसळ (५) डुलणे (६) कोवळ्या किरणांचे परावर्तन इत्यादी. यातील काही संवेदना स्पर्श आणि श्रुती यांच्याशी निगडित वाटल्या तरी येथे त्या दृक्संवेदनेचा विषय आहेत.

साहित्येतर ललितकला आणि निसर्ग यातील सौंदर्यप्रत्यय संवेदनानिष्ठ असतो, या संवेदना एकाच संवेदनावर्गातील असल्यास तो विशेष उत्कट होतो, इतर संवेदनावर्गाशी त्याचा संबंध आला म्हणजे तो तुलनेने क्षीण होतो, एका संवेदनावर्गातील संवेदनानुभूतीत अनेक घटक असतात, या विविध घटकांचा अर्थनिरपेक्ष आस्वाद घेणे ही सौंदर्य-

१. बा. सी. मर्ढेकर, "सौंदर्य आणि साहित्य" (दुं. आ.) मुंबई, १९६० पृ. ६०–६१

२. कित्ता, पृ. १०८–१११

३. कित्ता, पृ. १५२–१५६

४. कित्ता, पृ. २७

प्रत्ययाची पहिली पायरी होय इत्यादी मर्ढेकरांच्या मतांचे स्पष्टीकरण या बालक-पर्ण-दृष्टांताने होते.

आ. आजचे अनेक शहरी चित्रकार आपली दृकसंवेदनाक्षमता न वाढविता भावना आणि कल्पना यांच्या बळावर चित्रे काढतात; परंतु त्यामुळे त्यांची चित्रे रंग-रेषा या चित्रकलेच्या माध्यमापासून दूर जातात असा त्यांच्यावर आक्षेप घेऊन याच संदर्भात मर्ढेकरांनी खेड्यातील चित्रकारांची प्रशंसा केली आहे. खेड्यातील चित्रकार भावना-कल्पना यांचा आश्रय घेऊन आपली चित्रे अर्थपूर्ण करण्याच्या भरीस न पडता फक्त रंग आणि रेषा यांच्या साहाय्याने आपली चित्रकला साकार करतात. त्यामुळे रंग-रेषा त्यांचा अर्थरहित आविष्कार, त्यांची उत्कटता, त्यांचा संवाद-विरोध-समतोलात्मक संबंध इत्यादी गुणांनी त्यांची चित्रे श्रेष्ठ ठरतात.

"......सध्या आपली चित्रकला तथाकथित चित्रकारांच्या हिणकस चित्रांपेक्षा खेडेगावात घरांवर किंवा देवळांच्या भिंतींवर अशिक्षित पण कलावंत अशा खेडुतांनी जोरदार रेषात आणि प्राथमिक रंगात काढलेल्या चित्रातच अधिक आनंददायी अशा स्वरूपात प्रतीत होते, प्रकट होते.

माझ्या या म्हणण्यातील थोडासा अतिशयोक्तीचा भाग वगळल्यास एवढे निश्चित आहे की चित्रकाराची खरी स्फूर्ती आपल्याकडील कलामंदिरात शिक्षण घेतलेल्या चित्रकारापेक्षा खेडेगावातल्या रामाच्या किंवा विठोबाच्या मंदिरातल्या भिंतीवर सहज कुंचली फिरविणाऱ्या अडाणी कलावंतास अधिक यथार्थतेने दृष्टोत्पत्तीस येते. कलेच्या तत्त्वांची तोंडओळखही नसता चित्रकलेचा पहिला धडाही 'आर्टस्कूल' मध्ये न शिकता 'पर्स्पेक्टिव्ह' च्या किंवा पातळीच्या कल्पनांशी ओनाम्याइतकाही परिचय नसता नग्न मॉडेलच काय पण ॲनॅटमीतल्या साध्या गोष्टींचीही तमा न बाळगता, या खेडेगावातल्या नामशून्य चित्रकारांनी केवळ स्वतःच्या डोळ्यांवर आणि सभोवतालच्या जगाच्या दृश्य गुणांवर, दृश्य वैशिष्ट्यांवर भिस्त ठेवून फिरविलेल्या कुंचल्याच्या हातात जे सौंदर्य आढळते, त्याने माझ्या मनाची तरी अनेक वेळां विलक्षण पकड घेतली आहे. त्यांच्या चित्रातील रेषांची डौलदार गतिमानता, त्यांच्या तांबड्या, निळ्या, पिवळ्या रंगांची ठसकेदार योजना पाहून मनुष्य एकदा मोहून गेला, म्हणजे मग त्याला दर वर्षीच्या मोठमोठ्या शहरातल्या प्रदर्शनातील पुळपुळित, स्फूर्तिरहित, 'अर्थ' पूर्ण आणि म्हणूनच अर्थशून्य असे रंगांचे फरफाटे बघण्यात फारसे स्वारस्य वाटत नाही. आणि त्याला असा प्रश्न पडतो की, डोळे बंद ठेवून हृदय उघडे ठेवले, कितीही उघडे ठेवले, तरी हातातून सुंदर चित्रे निर्माण होऊ शकतील का? आणि हृदय उघडे ठेवावयाचे असेल, तर डोळे थोडेसे बंद केल्याशिवाय गत्यंतर आहे का?"[१]

इ. एप्स्टाइनने 'जेनेसिस' या आपल्या शिल्पकृतीचे 'सौंदर्य' प्रतीकात्मक अर्थाच्या आधारे स्पष्ट केले. परंतु प्रतीकात्मक अर्थ तर्क-संगतीवर आधारलेला असतो, त्यातून कलाकृतीचे 'सौंदर्य' निष्पन्न होऊ शकत नाही. 'जेनेसिस' ही शिल्पकृती सुंदर असेल तर ती लय-संगतीमुळेच असली पाहिजे. अशी आपल्या कलास्वरूपमीमांसेशी सुसंगत भूमिका घेऊन मर्ढेकरांनी 'जेनेसिस' चे सौंदर्य संवाद-विरोध-समतोलसंबंधजन्य असल्याचे दाखवून दिले आहे.

"'जेनेसिस' मधील मूर्ती मांड्यापर्यंतच का घेतली, तर एप्स्टाइन म्हणतो त्याप्रमाणे, "ती प्रत्यक्ष धरणीतूनच वर येत आहे" असे भासावे म्हणून! जणू काही मांड्यांच्याखाली फक्त पोटऱ्यांपर्यंत ती घेतली असती, तर ती "प्रत्यक्ष धरणीतूनच" वर येत आहे असे भासले नसते! कदाचित 'प्रत्यक्ष धरणीतून वर येण्याचा आभास निर्माण करावयाला पोटऱ्यांपेक्षा मांड्या जास्त योग्य, अशी एप्स्टाइनप्रमाणे वाचकांचीही श्रद्धा किंवा खात्री असल्यास न कळे. पण या सर्व द्राविडी कल्पनेची खरोखरच जरूरी आहे का? त्यापेक्षा साध्या सरळ शिल्पकलादृष्टीने ही मूर्ती फक्त मांड्यांपर्यंतच घेणे कसे अपरिहार्य आहे याचा प्रत्यय येत नाही का? कारण ही सर्व मूर्ती एका त्रिकोणात बसविली आहे. त्या मूर्तीच्या आकारातील सर्व घन आकृतींचे आणि रेषांचे वळण,

१५. किता, पृ. ६०–६१

त्यांचा लय असा आहे की त्या त्रिकोणाच्या निमुळत्या शेंड्यांपासून खाली त्रिकोणाच्या पायाकडे अधिकाधिक रुंद, भरीव होत जातात. या भरीव, रुंद लयाचा परमोच्च बिंदू त्रिकोणाच्या पायाजवळ आणि मूर्तीच्या मांड्यांजवळ , मांड्यांच्या खाली हा भरीव लय उतरविणे अशक्य. ही मूर्ती जर मांड्यांच्याही खाली घेतली असती, तर तिच्या रचनेतील हा भरीव लय संपून त्या लयाची दोन गुडघे आणि दोन पोट्या यांच्या कमी भरीव अशा दोन क्षीण आकारात विभागणी करावी लागली असती. कारण मानवी देहाच्या मुख्य आकारानुसारच मूर्तीचा आकार त्रिकोणात बसवावयाचा आहे. जेथे मांड्या संपतात तेथेच हा सलग घटनेचा भरीव लय संपतो. त्याखाली दोन वेगवेगळ्या गुडघ्या-पोट्यांचे अलग अलग असे कमी घनतेचे आकार येतात. म्हणजे मूर्ती मांड्यांखाली घ्यावयाची, तर तिच्या भरीव लयाची दोन क्षीण लयात विभागणी होणे अपरिहार्य. आणि मुख्य लयच जर असा क्षीण केला, तर त्या शिल्पकृतीच्या एकंदर रचनेचाही लय आपोआपच क्षीण होणार. शिल्पकार एप्स्टाइन घन लयाची ही अपरिहार्यता स्वयंस्फूर्तीने ओळखू शकला आणि मूर्ती त्याने अंतःप्रेरणेनेच मांड्यांपर्यंत घेतली." [१]

बालक-पर्ण-दृष्टांत, लोकचित्रकला आणि जेनेसिस या तीनही उदाहरणात मर्ढेकरांनी आपली कलामीमांसा विशिष्ट कृतींच्या संदर्भात उपयोजून दाखविली आहे. मात्र– मर्ढेकरांची संपूर्ण कलामीमांसा विशिष्ट कृतीतील संपूर्ण सौंदर्यप्रत्यय.

--असे त्याचे स्वरूप नाही. तरीही मर्ढेकरी कलामीमांसेशी विसंगत असा एक अणूही त्यामध्ये नाही. उलट मर्ढेकरांनी **सुचविलेल्या** या दिशेने आपण त्या त्या विशिष्ट कृतीचा **आस्वाद** घेतला तर संपूर्ण-सौंदर्यप्रत्यय येऊ शकेल. मर्ढेकरी कला-स्वरूपमीमांसेचा **पडताळा** येऊ शकेल– अशी मर्ढेकरांची भूमिका आहे.

अ. कलास्वरूपमीमांसेतील लयतत्त्व साहित्यकृतीस कसे लावावयाचे ? साहित्येतर कला संवेदनानिष्ठ आणि साहित्य संवेदना-प्रतिमानिष्ठ ऊर्फ भावानुभूतीनिष्ठ असल्यामुळे हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो. त्यासाठी मर्ढेकरांनी बालकवींच्या 'खेड्यातील रात्र' या कवितेतील "लयस्वरूप त्रोटकपणे" [२] उकलून दाखविले आहे. या त्यांच्या उपयोजनावरून बालकवींच्या प्रस्तुत **कवितेत** किती लय आहे किंवा या प्रात्यक्षिकातून त्या **कवितेतील** संपूर्ण 'सौंदर्य व्यक्त झाले का हे महत्त्वाचे नसून कलास्वरूपमीमांसेतील **लयतत्त्व** भावानुभूतीच्या, साहित्याच्या संदर्भात कसे लागू पडते, एवढेच मर्ढेकरांना दाखवावयाचे होते. म्हणून मर्ढेकरांनी आत्मनिष्ठा, अनेक संदर्भसूचकता (वाङ्मयीन तादात्म्य), सत्य-सौंदर्य-संवधितता, नवीनता (ओरिजिनॅलिटी) इत्यादी भावानुभूतीच्या धर्मांचे येथे विवेचन केलेले नाही. फक्त संवेदनांप्रमाणेच भावानुभूतीतही लय कसा असू शकतो, ते दाखविले आहे. [३]

आ. या उलट, '**हे** काय असे होई ?' या माधव जूलियन यांच्या कवितेतील लय दाखविणे ही मर्ढेकरांची भूमिका नव्हती. या कवितेतील आत्मनिष्ठा –आत्मवंचना त्यांना स्पष्ट करावयाची होती. 'आत्मनिष्ठा' या धर्मामुळे भावानुभूती कशी संपन्न होते हे त्यांना दाखवावयाचे होते. [४]

या दोनही ठिकाणी भावानुभूतीतील लय आणि भावानुभूतीतील आत्मनिष्ठा यांचे दिग्दर्शन करण्यात मर्ढेकर यशस्वी झाले आहेत.

इ. 'संगीतक' या लेखात एका वैशिष्ट्यपूर्ण कलाप्रकाराचे परीक्षण मर्ढेकरांनी केले आहे.

संगीतकात (ऑपेरा) काव्य, नाट्य आणि संगीत या तीन कलांचा समावेश झालेला असतो. या कलाप्रकारात या तीनही कला एकमेकींना पूरक असतात, संगीत–नाटकात नाट्य आणि संगीत या कला एकमेकींना पूरक ठरत नाहीत, संगीतकात

---

१. कित्ता, पृ. ४९–५०
२. कित्ता, पृ. १११
३. कित्ता, पृ. १०८–१११
४. कित्ता, पृ. १५२–१५६

आणि संगीत–नाटकात संगीत ही शुद्ध कला (=एकसंवेदनाधिष्ठित) इतर कलांवर मात करते इत्यादी विचार प्रस्तुत लेखात मर्ढेकरांनी मांडले आहेत. हे विचारही त्यांच्या कलास्वरूपमीमांसेशी सुसंगत व उपयोजनरूप आहेत.[१]

ई. 'लुईजी पिरांदेल्लो' या परिचयपर लेखात मर्ढेकरांनी साहित्यान्तर्गत भावानुभूतीतील **सत्य**-संबोधाचे स्थान स्पष्ट केले आहे. ते म्हणजे पिरांदेल्लोची बुद्धिनिष्ठता (Intellectualism) "पिरांदेल्लोच्या जीवनरहस्यलेखनाचा प्रारंभ एका विचारसमाधीत होतो[२]...." त्याच्या प्रतिभेचा उगम मानसशास्त्र व तत्त्वज्ञान या दोन सरोवरांवरून येणाऱ्या दोन प्रवाहांच्या संगमावर होतो." [३] असे मर्ढेकरांनी म्हटले आहे.

उ. 'गंगाधर गाडगीळ' या लेखात गाडगीळांच्या कथांतील भावानुभूतीतील काव्यात्मता, विनोद इत्यादी घटक स्पष्ट करून त्यातील 'मानसिक प्रक्रियांचे रमणीय संगीत' म्हणजे भावानुभूतीतील संवाद-विरोध-समतोलसंबंध < लय ते स्पष्ट करतात. हा लय विरोध-प्रधान आहे असेही मर्ढेकर म्हणतात. "गाडगीळ आपल्या कथांची उभारणी सामान्यतः दुहेरी, तिहेरी, चौफेरी विरोधी लयात करतात आणि आशयातला हा विरोधी लय ते आविष्कारातही टिकवितात." [४] असे लेखकाचे शब्द आहेत.

ऊ. तर्कशुद्धतेच्या अभावी साहित्यातील भावानुभूती कशी उथळ होते त्याचे दिग्दर्शन मर्ढेकरांनी 'राक्षसविवाह' या लेखात केले आहे.[५] हे त्यांच्या साहित्यमीमांसेतील आत्मनिष्ठा > वाङ्मयीन तादात्म्य > वाङ्मयीन महात्मता या तत्त्वाचे उपयोजन होय.

ए. 'व्याधाची चांदणी' या लेखातही मर्ढेकरांनी हेच तत्त्व (आत्मनिष्ठा इत्यादी) वेगळ्या शब्दात सांगितले आहे. मर्ढेकर लिहितात, "पण श्री. पाध्ये यांच्या इतर लिखाणातून दिसून येणाऱ्या तर्कबुद्धीचा सूर्यप्रकाश या बगीचावर फारसा न पडल्याने त्याची जमीन गुळगुळीत पण ठिसूळ झाली आहे; आणि त्यातील पानांफुलांवरील तकाकीला चैतन्याची छटा जरा कमी आली आहे".[६]

लुईजी पिरांदेल्लो, गंगाधर गाडगीळ, श्री. के. क्षीरसागर आणि प्रभाकर पाध्ये यांच्या साहित्याचा आस्वाद घेऊन आपली ही आस्वादप्रक्रिया आपल्या कलास्वरूपमीमांसेतील अनेक तत्त्वांशी वेळोवेळी कशी जुळते ते मर्ढेकरांनी दाखविले आहे.

मर्ढेकरांची सौंदर्यमीमांसा जितकी महत्त्वाची, त्यांची साहित्यमीमांसा जितकी महत्त्वाची तितकीच त्यांची कला-साहित्यसमीक्षाही महत्त्वाची होय.

कारण –

(१) सौंदर्यमीमांसा आणि साहित्यमीमांसा यांच्याशी ही कला-साहित्यसमीक्षा सुसंगत आहे.

(२) सौंदर्यमीमांसा आणि साहित्यमीमांसा यांचा परस्परांशी जसा शरीर-अवयवसंबंध आहे तसाच त्या उभयतांशी कला-साहित्यसमीक्षेचा शरीर-अवयव-संबंध आहे.

(३) सौंदर्यमीमांसा, साहित्यमीमांसा आणि कला-साहित्य–मीमांसा हे मर्ढेकरी कलास्वरूप-मीमांसेचे तीन पैलू आहेत.

(४) हे तीन पैलू एकमेकांवर भाष्य करणारे आहेत.

मर्ढेकरांची कला-साहित्यमीमांसा थोडक्यात अशी आहे.

---

१. कित्ता, पृ. १७१–१८२
२. कित्ता, पृ. १८५
३. कित्ता, पृ. १८६
४. कित्ता, पृ. १९१
५. कित्ता, पृ. २०४
६. कित्ता, पृ. २०७

वाचकांचा पत्रव्यवहार –

(१)

श्री. संपादक नवभारत यांस;

मार्च १९६७च्या अंकात ' निष्काम कर्माचे भ्रान्त तत्त्वज्ञान ' या माझ्या लेखावर डॉ. नारायणशास्त्री द्रविड यानी काही बहुमोल विचार एप्रिलच्या अंकात प्रदर्शित केले आहेत त्या संबंधी माझे विचार मी थोडक्यात मांडतो.

' भगवद्गीता ' हा ' सांख्य ' अथवा ' संन्यास ' व ' ज्ञान ' मत प्रदर्शित करणारा ग्रंथ आहे. ' कर्मयोग ' प्रतिपादणारा नाही. हे डॉ. नारायणशास्त्री यांना मान्य आहे. अर्थात कर्मयोगवादींना गीता ग्रंथ मान्य होणारा नाही. म्हणून " गीतेचे तत्त्वज्ञान सर्वमान्य होऊ शकत नाही " हे माझे विधान विचित्र कसे ? गीतेत, ' ब्रह्म ' ' आत्मा ' व तो आत्माही अविनाशी पुनर्जन्म इत्यादि जे मानलेले आहे, ते जगातील इतर धर्मीयाना मान्य होण्यासारखे नाही. म्हणून गीता सर्वमान्य होऊ शकत नाही. हे माझे विधान सत्यच ठरते. २ रे – बहुसंख्य नव्हे सर्व प्राणिमात्र सुखप्राप्तीचीच इच्छा करतो, आणि त्यासाठीच आयुष्यभर धडपडत असतो. हा सिद्धान्त सर्वमान्य आहे. पण या सर्वमान्य सिद्धान्ताला अपवाद म्हणून हजार प्राण्यातील एखादा प्राणी प्राप्तसुखावर लाथ मारून, जाणुनबुजून दुःखास कवटाळतो असे दिसले, तरी त्या अपवादाने सामान्य सिद्धान्तास बळकटीच येते. आणि हा जो हजारातील एखादा, दुःखास कवटाळतो त्यासच त्यास सुख वाटते म्हणून ! असेच म्हणावे लागेल. स्वा. वीर सावरकरांनी जाणून बुजून देहदंड सोसण्याचा, खडतर कारावास भोगण्याचा जो स्वीकार केला, तो आपल्या " स्वातंत्र्य " प्राप्तीच्या ध्येयास ते आवश्यक होते म्हणून. अर्थात पुढच्या सुखासाठीच, हे दुःख भोगण्यास ते तयार झाले.

याचा अर्थ फलाकांक्षेच्या प्रेरणेशिवाय कर्म होऊ शकत नाही. हा सिद्धान्त अबाधित आहे.

डॉ. नारायणशास्त्र्यांनी आणखी कोणासही न पटणारी एकदोन विधाने केली आहेत. त्यातील पहिले विधान. सकाम कर्मप्रवृत्ती प्रमाणेच निष्काम कर्मप्रवृत्ती होऊ शकते. हे त्यांचे विधान मानसशास्त्रास पटणारे नाही. आणि त्यांचे दुसरे विधान ' सकाम कर्मप्रवृत्तीपेक्षा निष्काम कर्मप्रवृत्ती ज्यास्त यशस्वी होऊ शकते ' हे मत मात्र मला विचित्र वाटते ! निष्काम कर्म करण्याचे फायदे दाखविताना ते म्हणतात, ' कर्माचे फळ मिळाले नाही तरी मनुष्य हताश होत नाही. फळ मिळाले नसले तरी नुसते कर्म करण्यातच तो आनंद मानतो. परंतु कर्माचे फल जर मिळाले नाही, तर माणसाने हताश होता कामा नये. ही शिकवण प्रयत्नवाद्याना आरंभापासूनच असते. ' फलाकांक्षा ' तर सदोदित पाहिजे ! व ती तीव्र पाहिजे ! तरच अपयशाची कारणे तो शोधून काढू शकतो. आणि दुसऱ्या प्रयत्नात त्याला यशसिद्धी होते. फलप्राप्तीशिवाय नुसत्या कर्मातच आनंद मानण्याची सवय झाली, तर तो प्रयत्नातील दोष कधीच सुधारणार नाही.

तात्पर्य फलाकांक्षेच्या प्रेरणेशिवाय कर्म होऊच शकत नाही. हेच मानसशास्त्रदृष्ट्या सिद्धच आहे.

डॉ. नारायणशास्त्री आपल्या पत्रात म्हणतात : " वेळोवेळी मनात उत्पन्न होणाऱ्या तात्कालिक इच्छेच्या तृप्तीसाठी माणसाची धडपड चालू राहिली, तरी त्या योगे, त्याची अध्यात्मिक तर नाहीच, पण ऐहिक प्रगतीही होऊ शकणार नाही. " हा शास्त्रीबुवांचा सिद्धान्त मानवोन्नतीच्या प्रगतीच्या इतिहासाला हरताळ फासणारा आहे !

मानवाच्या आजपर्यंतच्या ऐहिक उन्नतीचे एक मात्र कारण मानवांच्या मनात वेळोवेळी ज्या सुखप्राप्तीच्या इच्छा उत्पन्न होत गेल्या, त्या त्याने प्रयत्नपूर्वक तृप्त करून घेतल्यामुळेच आज जग इतके जवळ आले. मानवाने आपल्या सुखसोयीसाठी पंचमहाभूतांना राबविले. पर्णकुटीचे तीस तीस मजली भव्य प्रासाद झाले.

ऐहिक उन्नती फलाकांक्षेने युक्त सतत कर्में करीत गेल्यानेच झाली हे कबूल करावेच लागेल.

अध्यात्मिक उन्नती म्हणजे मानवता, समानता, बंधुता इ. सौहार्द मानवाच्या मनाच्या उन्नतीचे प्रयत्नही चालूच आहेत, पण आम्ही भारतीय ज्या काल्पनिक अध्यात्माच्या मागे लागलो आणि जंगलात ध्यानधारणा करून आत्मोन्नती करण्याचे प्रयत्न केले व समाजापेक्षा स्वतः या काल्पनिक आत्मोन्नतीच्या मागे लागलो. त्याचा परिणाम म्हणजे दहा शतकांची परकीयांची गुलामगिरी !

वा. दा. गाडगीळ

(२)

वर्ण, जाति वगैरे

नवभारताच्या एप्रिल ६७ च्या अंकात श्री. ग. आ. गवई यांचे एक पत्र प्रसिद्ध झालेले आहे. डॉ. पटब-

र्धन यांच्या विचारसरणीवर त्यानी घेतलेले आक्षेप विचारार्ह असून हिंदू समाजधारणेच्या मूलभूत सिद्धांतांची शास्त्रीय दृष्टीने चिकित्सा करण्याची केवढी निकड आहे हे त्यावरून कोणाही समाजहितचिंतकाच्या लक्षात येऊ शकेल. पत्राच्या शेवटी त्यानी माननीय संपादकांना जी कोपरखळी मारलेली दिसते तिच्याशी मात्र विचारस्वातंत्र्याची चाड असलेली कोणतीही व्यक्ती सहमत होणार नाही हे त्यांच्या लक्षात आणून देण्याच्या हेतूनेच हे पत्र मुद्दाम लिहीत आहे. प्रगति हा शब्द सापेक्ष असल्याने अंतिम साध्य नक्की केल्याशिवाय अमुक विचार प्रगतिपर आहेत की नाहीत याचा निर्णय करता येणार नाही. अंतिम साध्य कोणते असणे जरूर आहे याचा निश्चय करताना फक्त चालू जमान्यातील राजकीय घोषवाक्ये अथवा लोकमत यावर विसंबणे हे उथळपणाचे लक्षण होय. ही घोषवाक्ये अथवा लोकमत शास्त्रीय कसोटीला कितपत उतरतात हे पाहिले पाहिजे. प्रस्तुत वादात हे शास्त्र म्हणजे मूलतः समाजशास्त्र होय. समाजशास्त्र अद्याप बाल्यावस्थेत असून समाजविषयक अनेक कूटप्रश्नांचा निर्णायक स्वरूपाचा उकल करण्याइतके ते अजून प्रगल्भ झालेले नाही. स्वाभाविकपणेच या बाबतीत नुसती मतभिन्नताच नव्हे तर परस्परविरोधी मतेही मोठमोठ्या अभ्यासकात आढळून येतात. यापैकी कोणत्या अभ्यासकाचे मत अंती स्वीकार्य ठरेल हे काळच ठरवील. कदाचित प्रत्येकात सत्याचा थोडथोडा अंश आहे असेही प्रतीत होण्याचा संभव आहे. अशा स्थितीत कोणत्याही प्रश्नाबाबत अमुकच विचारसरणी उच्च दर्जाची अथवा प्रगतिपर आहे असे समजून तद्विरुद्ध मतप्रणाली जनतेसमोर येऊच नये असा आग्रह धरणे इतर मासिकांच्या संपादकांच्या बाबतीत उपेक्षणीय मानले तरी शास्त्रीय विचारांना उत्तेजन देण्याची कोशीस करणाऱ्या नवभारताच्या बाबतीत उपेक्षणीय मानता येणार नाही. विचारांची अशा प्रकारे मुस्कटदाबी करणे हे शास्त्रीय ज्ञानाच्या क्षेत्रात तर खपणारे नाहीच पण चालू लोकशाहीच्या जमान्यातही ते बसू शकत नाही. परस्परविरोधी विचारांच्या द्वंद्वयुद्धातूनच ज्ञान व प्रगति आपला मार्ग काढीत असतात. असहिष्णुतेच्या आहारी जाऊन यापैकी एकाद्या विचारसरणीची मुस्कटदाबी करण्यात आली तर प्रगति व ज्ञान याच्या विकासाचा मार्गच कुंठित होईल डॉ. पटवर्धनांचे अमुक मत अमुक कारणासाठी मान्य करता येत नाही असे प्रतिपादण्याचा श्री. गवई यांना अथवा इतर कोणासही पूर्ण अधिकार आहे परंतु या कारणास्तव डॉ. चे मत छापावयासच नको होते असे संपादकांना ठणकावण्यात ते या अधिकाराबाहेर जात आहेत असे स्पष्ट म्हटल्यावाचून रहावत नाही. छापण्यास घेतलेल्या लिखाणात बीभत्स मजकूर, वैयक्तिक निंदा वा चिखलफेक, सदभिरुचीचा अभाव इत्यादि नसावेत हेच संपादकांनी मुख्यतः पहावयाचे असते. असा कोणताही भाग डॉ. पटवर्धनांच्या लेखात आढळून येत नाही म्हणून तो प्रसिद्ध करण्यात संपादकांची काही व्यावसायिक स्वरूपाची चूक झाली आहे असे म्हणता येत नाही.

पूर्वीही एकदा कोणी एकाने असीच कोपरखळी देण्याचा प्रयत्न केला होता. या वृत्तीला आळा बसावा व तोही शास्त्रीय भूमिकेवरून असे वाटल्याने वरील ऊहापोह केला आहे. वादविषयात कोणाचे मत बरोबर वा चूक आहे याबद्दल या पत्रात मला काहीही म्हणावयाचे नाही.

प्रि. डॉ. र. चिं. बडवे.

(३)

संपादक ' नवभारत ' यांस—

स. न. वि. वि. ' नवभारत ' मार्च, ६७ च्या अंकात प्रा. रा. ग. जाधवांनी माझ्या पत्राला (' नवभारत ' फेब्रु. ६७) दिलेले उत्तर प्रसिद्ध झाले आहे. त्यातील काही मुद्यांचा परामर्श घेणे आवश्यक वाटते.

माझ्या पत्रातील ' Academic चौकसपणा ' आणि ' दुर्मिळ शिस्त ' प्रा. जाधवांना आवडली त्याबाबत मी त्यांचा आभारी आहे.

(१) " वाङ्मयीन समीक्षेत भौतिक शास्त्रातील निर्णायक प्रमेयासारखी प्रमेये अपेक्षिणे चुकीचे ठरते " हे बाळबोध सत्य सांगण्याची प्रा. जाधवांना वास्तविक आवश्यकता नव्हती. वाङ्मयाचा सुजबी व्यासंग असणारा कोणीही माणूस तशी अपेक्षा बाळगणार नाही.

(२) " आता श्री. सुर्वे यांच्या आक्षेपांना उत्तरे द्यावयाची म्हणजे खऱ्या अर्थाने पुन्हा माझा लेख लिहून काढण्यासारखे आहे " असे प्रा. जाधव म्हणतात. ते कसे काय ! माझे आक्षेप मी साधार मांडले आहेत अशी माझी समजूत आहे. ते आक्षेप साधार खोडून काढण्याचे सोडून वर उद्धृत केलेल्या

एका गोलमोल वाक्याने प्रा. जाधवांनी त्यांची बोळवण करण्याचा प्रयत्न केला आहे. प्रा. जाधवांची केशवसुतांबाबत जी काही मते आहेत त्यातील काही चुकीची कशी आहेत हे मी माझ्या पत्रात दाखवून दिले होते. पण प्रा. जाधव म्हणतात " आणि ही मते श्री. सुर्वे यांना पटत नाहीत, याला काय उपाय ? खरे तर वाङ्मयीन समीक्षेत पटवापटवी करण्यात काही अर्थ नाही. असो." पटवापटवीचा प्रश्न बाजूला ठेवला तरी एवढे निश्चित म्हणता येईल की, एखाद्या समीक्षेतील चुका आणि विसंगती दाखवून देणे किंवा त्या चुका आणि विसंगती कशा नाहीत हे उलट दाखवून देणे अशाप्रकारे होणारी वैचारिक देवाणघेवाण आजवरच्या वाङ्मयीन समीक्षेस पोषकच ठरली आहे. प्रा. जाधवांच्या म्हणण्यातून हे ओघानेच येते की, कोणाही वाङ्मय-समीक्षकाने उठावे आणि माझी ही ही मते आहेत हे सांगत सुटावे, मात्र त्यावर कोणीही साधार आक्षेप घेऊ नयेत.

(३) प्रतिमांविषयी प्रा. जाधवांनी त्यांच्या पत्रातून ('नवभारत' मार्च, ६७) मांडलेली भूमिका सर्वस्वी वेगळी आहे. तिचा त्यांच्या मूळलेखाशी (जानेवारी, ६७) काहीही संबंध नाही. कारण मूळलेखात त्यांनी प्रतिमा = काव्य किंवा प्रतिमामूल्य = काव्य-मूल्य ह्या पत्रातील अर्थाने प्रतिमा ही संकल्पना (concept) वापरलेलीच नाही. प्रतिमेचा हा अर्थ त्यांना माझ्या पत्रास उत्तर देताना मागाहून सुचला. मूळलेखात ते म्हणतात " स्वर्ग पृथ्वी, इंद्रत्व, देव, दानव, वेदकालचा सोमरस व ऋषिवर्य ह्या पौराणिक व अर्थशून्य प्रतिमातून केशवसुतांनी क्रांतीची कविता लिहिली " (जाने. ६७). तेव्हा मूळलेखात प्रतिमा-संकल्पना त्यांनी ज्या अर्थाने वापरली त्याच अर्थाने (Imagism ला अभिप्रेत असलेल्या अर्थी) मी ती स्वीकारून त्यांच्या विधानावर आक्षेप घेतला होता. वस्तुस्थिती अशी असूनही प्रा. जाधव आपल्या पत्रात म्हणतात " प्रतिमा म्हणजे अलंकार किंवा विभ्रम असे मला वाटत नाही." आता त्यांच्या ह्या म्हणण्याला मी " तसे मलाही वाटले नव्हते " असे तितकेच भाबडे उत्तर द्यावे काय ?

(४) 'आत्मसमर्थन' आणि 'आत्माभिव्यक्ती' ह्या शब्दांच्या अर्थभिन्नतेबाबतचा घोटाळा मला मान्य आहे. तो निदर्शनास आणून दिल्याबाबत प्रा. जाधवांचा मी ऋणी आहे.

(५) (अ) शेवटच्या परिच्छेदात प्रा. जाधवांनी मी दाखविलेल्या त्यांच्या लेखातील विसंगतीची सुसंगती दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु प्रश्न असा आहे की, कवी आपले काव्य निर्माण करतो ते त्यातून नंतरच्या कवींनी स्फूर्ती किंवा प्रेरणा घ्याव्यात म्हणून करतो काय ? काव्याचे जर हे प्रयोजनच, नसेल तर प्रा. जाधवांच्या प्रतिपादनातून सूचित होणारा श्रेष्ठ काव्याचा निकष हा 'स्फूर्ती-प्रेरणावाद' होऊ शकत नाही. कवीच्या काव्यातून समाजाला, सच्चा कवींना, भुरट्या कवींना किंवा अन्य कुणाला स्फूर्ती वा प्रेरणा मिळतील किंवा मिळणार नाहीत. श्रेष्ठप्रतीच्या कवित्वाचा किंवा काव्याचा निकष म्हणून प्रस्तुत बाब येथे उद्भवूच नये. 'रामायण', 'महाभारत', 'इलिअड' इत्यादी काव्यांच्या काळातील सामाजिक, मूल्यामध्ये आतापर्यंत अनेक उलथापालथी झाल्यात; तरीही त्या कृतींची कलात्मक श्रेष्ठता आजच्या (मूल्यहीन समाजामध्ये जगणाऱ्या) रसिकांना (यात समाज, सच्चे कवी, भुरटे कवी इत्यादी सर्वमंडळी आलीच) वाटतेच. सामाजिक मूल्यांमध्ये अनेक उलथापालथी होऊनही प्रस्तुत कलाकृतींमध्ये आणि त्यांचा आस्वाद घेणाऱ्या आजपर्यंतच्या रसिकांमध्ये एकप्रकारचे कलात्मक आशय-संचरण (Communication) होत राहिले. तेव्हा 'केशवसुती विश्वबंधुत्व' आजच्या 'समाजाला' कुचकामी वाटावे या ऐवजी 'सच्चा कवींना' ते कुचकामी वाटावे असे म्हटल्याने मी दाखविलेल्या विसंगतीची सुसंगती कशी काय होते ?

(आ) केशवसुतांच्या 'क्रांतीकारक' कवितांतून प्रेरणा घेऊन नंतरच्या कवींनी काव्यनिर्मिती केली याची प्रा० जाधवांना उदाहरणेच हवी असतील तर तीही देता येतील. गोविंदाग्रज, 'बी', तांबे आणि कुसुमाग्रज ह्यांच्या अनुक्रमे 'दसरा', 'डंका', 'रुद्रास आवाहन' आणि 'क्रांतीचा जयजयकार' ह्या कवितांची प्रेरणा केशवसुतांच्या 'तुतारी'तील असल्याचे स्वच्छ आहे. तेव्हा प्रा० जाधवांच्या 'प्रेरणा-निकषाने' देखील केशवसुत श्रेष्ठ कवी ठरतात. अर्थात वरील कवींना प्रा० जाधव सच्चे कवी मानावयास तयारच नसतील, तर मात्र प्रश्न अलाहिदा आहे.

— भा० ग० सुर्वे

सार-संकलन

परकीय मदत चांगली पण स्वावलंबन जास्त चांगले:—

भारताला जिवंत रहाण्यासाठी परकीय धान्याची गरज आहे हे सर्व जगाला माहीत आहे. गेली अनेक वर्षे पाकिस्तानच्या बाबतीतही ते खरे आहे हे बऱ्याच शहाण्यांना माहीत नाही. १९६५ पर्यंत पाकिस्तानची दर डोईस धान्य-आयात भारतापेक्षाही जास्त होती. पण आज मात्र परिस्थिती उलटी झालेली आहे. आज दोन्ही राष्ट्रांची परिस्थिती सारखीच आहे. गेल्या वर्षाच्या अवर्षणाने दोन्ही राष्ट्रांना सारखाच तडाखा दिला. या वर्षी पाकिस्तानाला अडीच मिलियन टन धान्य परदेशातून आणावे लागणार आहे तर भारताला ११ मिलियन टन आयात करावी लागेल. हे आकडे दोन्ही देशातील राष्ट्रीय उत्पादनाच्या एक सप्तमांश आहेत. दोन्ही देशातील लोकसंख्या दरवर्षी २.५ टक्यांनी वाढत आहे. व जास्त तोंडांना तेवढेच धान्य पुरवावे लागत असल्याने भाववाढ होणे अपरिहार्य आहे. कारण धान्याचा पुरवठा होण्यासाठी मदत म्हणून मिळणाऱ्या धान्यात बाजारभावाने धान्य विकत घेऊन मिळवावे लागत आहे.

अमेरिकेवरील बोजा

दोन्ही राष्ट्रांना मुख्य पुरवठा अमेरिकेकडून होत आहे. परंतु गेल्या काही दिवसात अमेरिकेची कोठारे रिकामी पडू लागल्यामुळे अध्यक्ष जॉन्सनना मदत पाठविणे कठीण होऊ लागले आहे. फेब्रुवारी महिन्यात भारताला २ मिलियन टन धान्याची मदत देण्याचे अमेरिकेने कबूल केले. पण आणखी ३ मिलियन टन देताना मात्र इतर समृद्ध राष्ट्रांनी तेवढीच मदत दिली तरच आपण ही मदत देऊ अशी अट घातली.

गेल्या दहा दिवसात मदतीचा बोजा वाटून घेण्याच्या दृष्टीने अध्यक्ष जॉन्सन यांनी दोन विजय मिळविले आहेत. पॅरिसमध्ये झालेल्या भारत मदतनिसांच्या परिषदेने जॉन्सनचे म्हणणे तत्त्वतः मान्य केले आहे. व आर्थिक मदत व धान्याची मदत यातील वाटा अनेकांनी उचलला पाहिजे ह्या त्यांच्या म्हणण्यास पाठिंबा दिला आहे. "अमेरिका व कॅनडा यांनी देऊ केलेल्या मदतीनंतर १० मिलियन टनातील जेवढे धान्य कमी पडेल ते परकीय बाजारपेठेत विकत घ्यावयास लागणारा पैसा भारताला देण्याची जबाबदारी इतर राष्ट्रांनी मान्य केली आहे. कारण यंदाही भारताचे उत्पन्न ८० मिलियन टनाच्या आसपासच असेल असा अंदाज आहे (सात वर्षापूर्वी ते तेवढे होते.) ब्रुसेल्स येथे भरलेल्या युरोपिअन इकॉनॉमिक कमिशनच्या (EEC) परिषदेनेपण जवळ जवळ ३ मिलियन टन धान्य देण्याचे कबूल करून अमेरिकेचा बोजा कमी करण्याचे ठरविले आहे. यामुळे अमेरिकेचा बोजा तर कमी होईलच पण जबाबदारी सामुदायिकरीत्या पत्करण्याचे तत्त्व प्रत्यक्षात उतरेल हे विशेष होय.

मदत घेणारांची जबाबदारी— अमेरिकन धोरणाची दुसरी बाजू मदत घेणाऱ्या राष्ट्राबद्दलची आहे. 'शांततेकरता अन्न' हे या धोरणाचे सूत्रवाक्य आहे. 'जे स्वतःच्या पायावर उभे रहाण्याची धडपड करतील त्यांनाच मदत मिळेल,' या जॉन्सनच्या घोषणेने अनेकांची मने दुखावली गेली असली व त्यात जॉन्सनला स्वतःला मोठेपणा मिळत असला तरी त्यात वावगे काही आहे असे म्हणता येणार नाही. या घोषणेनंतर भारत व पाकिस्तान यातून येणाऱ्या बातम्या जरी विषण्णतेच्या द्योतक असल्या तरी दोन्ही राष्ट्रात धडपड सुरू झाली असून वाटते त्यापेक्षा लवकर ही राष्ट्रे स्वतःच्या पायावर उभी रहाण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

दोन्ही राष्ट्रांनी आपले लक्ष शेतीवर केंद्रित केले असून धान्याचा तुटवडा भरून काढण्याचे आटोकाट प्रयत्न सुरू झाले आहेत. दोन्ही देशातील उत्पादन जागतिक पातळीवर आणणे फारसे कठीण नसून प्रयत्न केल्यास दोन्ही राष्ट्रे जरूरीपेक्षा जास्त उत्पादन करू शकतील. दोन्ही राष्ट्रातील प्रगतिशील शेतकऱ्यांची संख्या कमी असली तरी ते आधुनिक अवजारे, साधने, खते व बी बियाणे वापरण्यास तयार आहेत. आज या

सर्वांचाच तुटवडा आहे हे पाश्चिमात्य राष्ट्रांनी विसरू नये.

–दि इकॉनॉमिक लंडन १५ एप्रिल १९६७

पक्षाचे वरिष्ठ नेते सर्व भांडवलशाहीवादी ?

"साप मारावयाचा असेल तर त्याचे डोके ठेचून टाका व झाड मारावयाचे असेल तर मुळासकट उपटा" अशी एक चिनी म्हण आहे. ही म्हण पेकिंगच्या सर्व प्रमुख वर्तमानपत्रांनी गेल्या सोमवारी मथळा म्हणून वापरली होती याचा अर्थ समजणे व कोणाविरुद्ध ती वापरली जात होती हे समजणे फारसे कठीण नव्हते. लागोपाठ तीन दिवस पेकिंगच्या रस्त्यातून माओ-त्से-तुंग चे फोटो फडकावीत हजारो चिनी नागरिक ल्यु-शाओ-ची व तेंग-त्सिओ-पिंग विरोधी घोषणा करीत होते. 'वरिष्ठ नेते भांडवलशाही मार्ग आक्रमत आहेत, सावध रहा' अशा घोषणा चीनच्या सर्व मोठमोठ्या शहरातून ऐकू येत होत्या. ल्यु–शाओ–ची यांची अनेक ठिकाणी क्रुश्चेव्हशी तुलनाही करण्यात येत आहे.

दोन गटातील झगडा

चीनच्या सांस्कृतिक क्रांतीच्या चळवळीत गेला महिना बराचसा शांततेचा होता असे म्हणावे लागेल. परंतु त्यानंतर मात्र माओ–त्से–तुंगच्या प्रतिस्पर्ध्यांचा पाडाव करण्याकरता पुन्हा जोरदार उठाव झालेला दिसत आहे. हा कशाचा परिणाम आहे ? अशी काय घटना घडली की त्यामुळे ल्युचा पाडाव करणे तातडीचे झाले ? खरे म्हणजे गेल्या नोव्हेंबर पासून सार्वजनिकरीत्या ल्युचे दर्शनही कोणास घडलेले नाही. परंतु जोपर्यंत माओचे विरोधक पक्षसंघटनेत परिणामकारक असून त्यांच्या माओविरोधी कारवाया चालू आहेत तोपर्यंत ल्युचा पुरता पाडाव झालेला नाही हे उघड आहे. ल्युचे पक्षातील दोस्त माओच्या कामात म्हणजेच सांस्कृतिक क्रांतीत अडथळा आणण्यास समर्थ आहेत. संघटनेतील विरोध दोन पातळीवर होत असलेला दिसून येत आहे. एकतर दोन नेतृत्त्वातील झगडा तेथे लढला जात आहे व दुसरे म्हणजे सांस्कृतिक क्रांतीच्या वेगाबद्दल वाद चाललेला दिसून येत आहे.

मवाळांची सरशी

गेला महिनाभर चाउ-एन–लायच्या मवाळ अनुनयांची सरशी होत आहे असे वाटत होते. अराजकाविरुद्ध वेळोवेळी इशारे देण्यात येत होते. लाल रक्षकांच्या अतिरेकी वागणुकीस आळा घालण्याचे प्रयत्न होत आहेत असे वाटत होते. त्याचप्रमाणे प्राथमिक व माध्यमिक शाळा पुन्हा सुरू करण्याचे आदेश देण्यात आले होते. लाल रक्षकाना रस्त्यातून शाळात पाठविण्याचा तो निर्णय होता. पंधरा दिवसापूर्वी चँगचेंग (माओची पत्नी) व चाऊ-एन्-लाय माध्यमिक शाळातील लाल रक्षकासमोर भाषणे करणार होते. "आपल्या वर्गातून परत जाऊन अभ्यास करा, जास्त शिस्तबद्ध व्हा व लोकानी आपली स्तुती करावी या लालुचीला बळी पडू नका" असा उपदेश चँग-चेंग देणार असेही जाहीर झाले होते.

शेती व कारखाने यांचेतील उत्पादन सुरळीत चालावे असे प्रयत्न तातडीने हाती घेण्यात येत आहेत. अनेक ठिकाणी त्या करता लष्कराची मदत घेण्यात येत आहे. शासनातील पक्षातील अधिकाऱ्यांच्या बडतर्फीबद्दलही इशारे देण्यात येत होते. काढून टाकलेल्या अधिकाऱ्यांना परत बोलावण्यात येत होते. क्रान्तिवादी जनता, क्रान्तिकारी लाल रक्षक व लष्कर या त्रिदलाच्या सहकार्याची भाषा सर्वत्र ऐकू येत होती.

परंतु माओने सांस्कृतिक क्रान्तीची मोहीम सुरू करून परिस्थिती अशा थराला आणली आहे की ती काबूत आणण्याचा प्रयत्न करणे सुद्धा कठीण झाले आहे. लाल रक्षकांच्या कारवाईस ब्रेक लावल्याने कट्टर माओवादी तर हवालदील होतीलच पण त्यामुळे मवाळांचे सुद्धा समाधान होणार नाही. अराजकापर्यंत परिस्थिती चिघळू नये म्हणून जरी प्रयत्न सुरू केले तरी त्यातून फारसे काही निष्पन्न होईल असे वाटत नाही. लष्कराचा वचक मात्र नागरी व ग्रामीण भागातून वाढत आहे. परंतु त्याचा अर्थ लष्कर आणीबाणीच्या प्रसंगी माओच्या पाठीशी उभे राहील किंवा चीनमध्ये थोड्याच दिवसात स्थिरस्थावर वातावरण निर्माण होईल असा करणे चुकीचा होईल. कामगारांना लष्कराची आपल्या व्यवहारातील लुडबूड पसंत नाही असेही दिसून येत आहे.

वाढता असंतोष

क्रांतिवादी जनतापण फारशी संतुष्ट दिसत नाही. कारण त्यांनी पदच्युत केलेले अनेक अधिकारी पुन्हा

आपल्या अधिकारपदावर आरूढ झालेले दिसत आहेत. त्याचप्रमाणे लाल रक्षकांना शाळेत जा हे सांगणे सोपे आहे. त्यांना प्रत्यक्ष तसे करावयास लावणे अशक्य झाले आहे. त्यांच्या स्वाभाविक अनिच्छेबरोबरच गेल्यावर्षी रद्द केलेल्या अभ्यासक्रमाऐवजी नवा अभ्यासक्रम आखणे जड झाले आहे. लालरक्षकांना माओवादी तत्त्वज्ञानाचे शेवटी अजीर्ण होणार अशी चिन्हे दिसू लागली आहेत. त्यातच त्रिदली क्रांतिकारक कमिट्या सर्वत्र स्थापन होण्याची शक्यताही दिसून येत नाही. आतापर्यंत फक्त चार कमिट्यांना पेकिंगची मान्यता मिळाल्याचे समजते.

चिघळणारी परिस्थिती

अशा परिस्थितीत मवाळ व जहाल गटात सतत तेढ रहाणे व त्यात आज एकाची तर उद्या दुसऱ्याची सरशी झाल्यासारखी दिसणे साहजीकच आहे. परंतु जेवढा जास्त वेळ जाईल तेवढा जहालांच्या पथ्यावर पडेल अशी चिन्हे दिसत आहेत. ल्यु विरोधी गटाची सरशी होत आहे याची दुसरीही काही चिन्हे स्पष्ट होत आहेत. चाउ-एन्-लायच्या सहकाऱ्यावर भिंतीफलकावरून टीका होऊ लागली आहे. लाल रक्षक पुन्हा उजेडात येऊ लागले आहेत. रेडफ्लॅग पत्राने लालरक्षकावर टीका करणाराविरुद्ध झोड उठविली आहे. गेल्या महिन्यात केव्हातरी सेंट्रल कमिटीची सभा होऊन त्यात काही नवे निर्णय घेतले गेले असण्याची शक्यता आहे.

या सर्वांचा अर्थ मवाळानी लढा सोडून दिला आहे असा मात्र नाही. चाऊ हा वादळाने घाबरणारा नसून वाऱ्याच्या दिशेला पाठ फिरवणारा आहे. भिंतीपत्रकामुळे विरोधकांचा वाटा निघून जाईल असे त्याला वाटते. आणि माओला सुद्धा क्रांतिकारकांना जोरदार उठाव करण्याची आज्ञा देताना आपण सहज जिंकून जाऊ इतके बलवान आहोत असे वाटत आहे असे दिसत नाही. कारण आज सांस्कृतिक क्रान्तीची चळवळ एकप्रकारच्या कोंडीत सापडलेली आहे. याचाच अर्थ ल्यु-शाओ-ची विरुद्ध सुरू असलेली जोरदार मोहीम चीनला गोंधळातून बाहेर काढण्यास असमर्थ आहे. चीनचा छळ बरेच दिवस चालणार हे स्पष्ट आहे.

– दि इकॉनॉमिस्ट लंडन, ८ एप्रिल १९६७

रशियाचा दर्दभरी आवाज –

" सत्तेचा वापर म्हणजे जनतेविरुद्ध वापरलेली हिंसा होय. एक काळ असा येईल की ज्यावेळी राज्यकर्ते असणार नाहीत, हुकूमशहा असणार नाहीत की कोणत्याही प्रकारचे सत्ताधारी शिल्लक रहाणार नाहीत."

कम्युनिझमचे अंतिम ध्येय सर्वशासनकर्त्यांचा नायनाट करणे हा असला तरी सध्याच्या सोव्हिएट सरकारला वर दिलेले वचन पसंत पडणे शक्य नाही. आणि अशा तऱ्हेचे वाक्य सोव्हिएट वाङ्मयात अनेक वर्षांनी पुन्हा प्रगट होणाऱ्या येशू खिस्ताच्या तोंडातून आलेले तर बिलकूलच चालणार नाही. त्यातच हे वाक्य १९४० साली रशियाची नालस्ती करणारा म्हणून ज्याचा उल्लेख केला जातो त्या मायकेल बुल्गाकॉव्ह या लेखकाच्या 'दि मास्टर अॅण्ड मार्गारीटा' या कादंबरीतील आहे. मायकेल बुल्गाकॉव्ह १९४० साली सोव्हिएट सरकारच्या रोषात असतानाच मरण पावला.

आजच्या रशियात मात्र या कादंबरीचा पुष्कळच गवगवा झालेला आहे. मॉस्कोव्हा या उदारमतवादी मासिकाने ही कादंबरी दोन हप्त्यात प्रसिद्ध केली असून त्याच्या दीड लाख प्रती संपल्या आहेत (पुस्तकरूपाने ती अजून प्रसिद्ध व्हावयाची आहे.) अनेक सोव्हिएट टीकाकारांच्या मते ही कादंबरी म्हणजे वाङ्मयाचा उत्कृष्ट (masterpiece) नमुना आहे. त्यावर सर्वत्र चर्चा होत आहे. बुल्गाकॉव्ह यांनी एकंदर सहा नाटके व पाच कादंबऱ्या लिहिल्या आहेत. दि मास्टर अॅंड मार्गारीटा या कादंबरीचे अस्तित्व अनेकांना माहीत असले तरी ती प्रकाशात मात्र आली नव्हती. ती लिहिण्यात लेखकाने दाखवलेले धाडस तर मोठे आहेच पण त्याचे रशियात होणारे प्रकाशन म्हणजे रशियातील वाङ्मयीन बंडाची सुरवात आहे. ते सर्वत्र पसरत आहे हे नक्कीच. क्रेमलीनने अजून या नव्या स्वातंत्र्यावर घाला घातलेला नाही पण त्याकडे त्यांचे लक्ष नाही असे मात्र म्हणता येणार नाही. ते दिङ्मूढ झाल्यासारखे वाटत आहे.

कादंबरीत सैतान (the master) हा १९३० साली मास्कोच्या नागरिकावर आपली मोहिनी घालण्याकरता आलेला दाखवला आहे. त्यात

बोलणाऱ्या मांजरापासून ते आपल्या मालकाच्या घरात नग्नावस्थेत वावरणाऱ्या मोलकरणीपर्यंत अनेक प्रकारच्या व्यक्तींचा समावेश असला तरी त्यांचेत सनातनी मार्क्सवादी गांभीर्याचा अभाव आहे. त्यातील सर्वात महत्त्वाचा प्रसंग म्हणजे येशू खिस्त व पायलेट नावाच्या रोमन मध्यस्थातील संवाद होय. खिस्त त्याला सांगतो की, ' सत्यासमोर सत्तेचा पाडाव झालाच पाहिजे. पायलेट हा हुकूमशाही वृत्तीचा असून मानसिक व्याधींनी पिडलेला व त्यामुळेच डोकेदुखी लागलेला माणूस असतो. तो बायबलमधला सत्य म्हणजे काय हा प्रश्न खिस्ताला विचारतो. खिस्त त्याचा कैदी असून मोठा हुषार माणूस असतो. तो त्याला म्हणतो. " तुझे डोके दुखत आहे हे आताचे सत्य आहे. ते इतके दुखत आहे की तुझ्या डोक्यात मृत्यूच्या कल्पना येत आहेत. आणि नाइलाजाने मी तुझा मारेकरी बनलो आहे. "

जोरदार वादविवाद–मॉस्कोव्हा किंवा नोव्ही मिर ही उदारमतवादी मासिके बाजारात आली म्हणजे क्रेमलीनमधील नेत्यांची डोकी दुखावयास लागतात. नोव्ही मिरने पास्टरनाकच्या स्मृतिप्रीत्यर्थ नुकताच एक खास अंक प्रसिद्ध केला (पास्टरनाकच्या डॉ. झिव्हॅगो या पुस्तकाच्या ४५ लाख प्रती विकल्या गेल्या आहेत.) पास्टरनाकने सोव्हिएट रशियाचा अधिकृत वाङ्मयीन देव व्हाडिमिर मायकोव्हास्की यांवर टीका करणारे उपरोधिक पत्र स्टालीनला लिहिले होते. त्यात मायकोव्हास्कीप्रमाणे मला अधिकृतरीत्या मान्यता न देऊन गर्वाने फुगून जाण्याचा मोका न दिल्याबद्दल स्टालीनला धन्यवाद दिले होते. कॅथरिन दि ग्रेट ने जशी बटाटे खाण्याची सर्वांवर सक्ती केली होती तशाच सक्तीने मायकोव्हास्कीचे वाङ्मय सरकारने वाटण्याचा प्रयत्न केला होता असे पास्टरनाक म्हणत असे. हे पत्र या खास अंकात प्रसिद्ध केले आहे. दुसऱ्या एका उदारमतवादी मासिकाने– मोलोडाया गॅव्हरडियाने– रशियाच्या आणखी एका देवावर– मॅक्झिम गॉर्कीवर हल्ला चढविला आहे गॉर्कीचे ' दि लोअर डेप्थस् ' हे पुस्तक म्हणजे नुसती ' डाक्युमेंटरी ' आहे असे त्यांचे म्हणणे.

अशा तऱ्हेची बंडखोरी बरेच ठिकाणी चालू असता क्रेमलिनने नोव्ही मीरला शिक्षा करून इतरांना वठणीवर आणण्याचे ठरविलेले दिसते. या मासिकाचा संपादक ॲलक्झँडर व्हार्डोव्हास्की हा स्वतःला अंतरबाह्य कम्युनिस्ट म्हणत असला तरी पक्षाने त्याला सेंट्रल कमिटीतून काढून टाकले आहे. त्याचे आणखी दोन सहसंपादक कमी करण्यात आले असून त्यांचे जागी विश्वासू व बिनधोक वाटणारे असे तीन नवे सहसंपादक नेमले आहेत. दोन आठवड्यापूर्वी हे मासिक एकांगी असून त्यात सत्याचा विपर्यास केला असून वैचारिक चुका व मागसलेपणा पण भरपूर आहे असाही आरोप त्यावर केला गेला आहे.

विसरता न येणारे पाप– तरीसुद्धा व्हार्डोव्हास्की आज जे प्रसिद्ध करीत आहे त्यावरून अधिकृत नियंत्रणे पुष्कळच सैल झाली आहेत असे वाटते. एक वर्षापूर्वीच ॲंड्री सिन्या. व्हास्की व युली डॅनियल या दोन लेखकांना लेबरकॅम्पमध्ये पाठविण्यात आले आहे. त्यांचे सर्वात मोठे पाप म्हणजे त्यांनी आपले लिखाण पाश्चिमात्य देशात प्रकाशित केले हे होय. पुढच्या महिन्यात सोव्हिएट लेखकांची चौथी परिषद भरणार आहे. गेली आठ वर्षे ही परिषद भरलीच नाही. त्या पूर्वी कट्टर मार्क्सवादी व उदारमतवादी यांचेतील वादविवाद रंगात येईल अशी चिन्हे दिसत आहेत. डॉ. झिव्हॅगो रशियात प्रकाशित करण्याची महत्त्वाकांक्षा व्हार्डोव्हास्की बाळगून आहे व ती पुरी करण्याची आशाही त्याला वाटत आहे.

–टाइम, १४ एप्रिल १९६७

अमेरिकेतील गलिच्छवस्त्या उच्चाटण मोहीम

गलिच्छ वस्तीतून लहान लहान उद्योगधंदे सुरू केल्याने तेथील एकंदर परिस्थिती सुधारेल असे अनेक तज्ञांचे मत आहे. " त्यातील किंवा सभोवतालच्याच लोकांना या उद्योगधंद्यात काम देण्याचे धोरण ठेवले म्हणजे त्या विभागाचा विकास स्वाभाविकपणे होऊ लागेल. कॉंप्युटर व इतर स्वयंचलित यंत्रामुळे विकास पावणाऱ्या उद्योगधंद्यांचे अनेकांना आकर्षण वाटून विभागविकासाचे काम सोपे होईल. बाहेरून येणारे लोक चांगली घरे, शाळा, रस्ते, करमणुकीची साधने व आरोग्य राखण्याच्या सोई या सर्वांचीच

अनुक्रमणिका

अपेक्षा ठेवणार व त्या निर्माण करण्यासाठी धडपडणार. त्याचा परिणाम या गलिच्छ वस्त्यावर होऊन त्या सुधारण्यास मदत होईल असे मत डेप्युटि ॲडमिनिस्ट्रेटर यार्क बॅटल यांनी व्यक्त केले आहे.

औद्योगिक क्षेत्रातील अनेकांचे लक्ष गलिच्छ वस्तीवर गेले असून काही उद्योगधंदे अशा ठिकाणी सुरू पण करण्यात येत आहेत. अमेरिकन नागरिकांचे लक्ष या वस्त्यांवर केंद्रित होण्याचे मुख्य कारण म्हणजे राष्ट्राची प्रतिष्ठा त्यातील सर्वच नागरिकांच्या प्रतिष्ठेवर अवलंबून आहे याची सर्वत्र नव्याने जाणीव होत आहे. अनेक मोठमोठ्या शहरातून गलिच्छ वस्त्यांचे प्रश्न निकडीचे होत असून ते तात्वडतोब सोडविले नाहीत तर त्याचे दुष्परिणाम सर्व शहरावर होण्याची भीती निर्माण झाली आहे. या करता खालील गोष्टींची प्रामुख्याने गरज आहे :

१) मुलांच्या गरजांना प्रतिसाद देणाऱ्या शाळा;

२) सोईची, सर्वंकष व स्वस्त अशी आरोग्य राखण्याची सोय असलेल्या संस्था, नुसते निदान न करता प्रत्यक्ष उपचार करणारे दवाखाने;

३) कमी उत्पन्नाच्या लोकांना परवडतील अशी सोईची घरे, मोठी शहरे सोडून या वस्त्यातून रहाणे सोईचे व आल्हाददायक वाटेल अशातऱ्हेचे वातावरण;

४) वाचनालयांच्या शाखा, करमणुकीच्या साधनांचे अस्तित्व, नाट्यगृहे, सिनेमागृहे गायन-हॉल इत्यादींचे अस्तित्व;

५) त्याच वस्तीत नोकरीधंदा मिळण्याची सोय.

६) जलद व सोइस्कर वहातुकीची साधने.

७) भिन्नभिन्न धंद्यांच्या, रीतिरिवाजाच्या व अनुभवाच्या लोकांचे एकत्र अस्तित्व. विभागात वैचित्र्य व नावीन्य आणण्याचा प्रयत्न.

या सात गोष्टी एकत्र आणल्यानंतरही एक महत्वाची गोष्ट शिल्लक रहाते व ती म्हणजे या वस्त्या सुधारण्याच्या योजना तेथील रहिवाशांकरता करून भागणार नाही तर त्या योजना त्यांचे समवेत बसून त्यांच्या सल्यानुसार करावयास पाहिजेत. या वस्त्यातील जनतेचा एक खास मानसिक प्रश्न असतो व तो म्हणजे त्यांना बाह्य जगापासून वेगळे काढल्यासारखे वाटत असते. त्यांना माणसात घेण्याची क्रिया जर गलिच्छ वस्त्या सुधारताना झाली नाही तर या वस्त्या कधीही सुधारणार नाहीत. येथे समान वागणूक जर कृतीत उतरली नाही तर अनर्थ होईल. हा समाज काय आहे, त्याच्या गरजा काय आहेत हे चांगले समजले नाही तर तेथील नियोजन फोल ठरेल. येथे वस्तुनिष्ठ कार्यक्रम आखले पाहिजेत. त्यांची अंमलबजावणी तातडीने व कार्यक्षमतेने झाली पाहिजे येथे नानाविध पद्धतीची साधने उपलब्ध करून दिली पाहिजेत व त्याचा वापरही व्यवस्थित होत आहे इकडे लक्ष दिले पाहिजे सर्व व्यवहार कार्यक्षम व परिणामकारी पाहिजे.

—अमेरिकन लेबर एप्रिल १९६७

योजनेशिवाय नियोजन

१९६६ ते ७० च्या पंचवार्षिक योजनेला मान्यता मिळविण्यासाठी पक्षाच्या सेंट्रल कमिटीची तातडीची सभा नजीकच्या काळात बोलावली जाण्याची शक्यता मॉस्कोमध्ये बोलली जात आहे. ही सभा तांत्रिक कारणाकरता नसून राजकीय आहे असाही समज आहे. 'योजनेशिवाय नियोजन' हा मथळा काहीसा गैरसमज निर्माण करणारा आहे. रशियाजवळ आजही दीर्घकालीन योजना तयार आहे; परंतु तो एक नुसता आराखडा आहे. बदलत्या परिस्थितीबरोबर तो बदललाही जात आहे. ही योजना १९६६ च्या सुरवातीस प्रसिद्ध झाली व पक्षाचे त्यावर फेब्रुवारी महिन्यात शिक्कामोर्तबही झाले. परंतु त्यानंतर ती पुन्हा तज्ञांकडे पाठविण्यात आली. हा नवा आराखडा अजून प्रकाशात आलेला नाही. ही योजना दुरुस्त करावी लागण्याचे पहिले कारण म्हणजे व्यवस्थापनात झालेले बदल होत.

नवे व्यवस्थापन :

एकॉनॉमिस्काया गॅझेटच्या संपादकांच्या म्हणण्याप्रमाणे सोव्हिएट रशियातील पंचवीसशेहून अधिक उद्योगधंद्यांनी व्यवस्थापनपद्धती स्वीकारली असून त्यात रशियातील एक दशांश कामगारांचे हितसंबंध गुंतले आहेत. या वर्षाचे शेवटापर्यंत रशियातील अर्धे उद्योगधंदे या नव्या पद्धतीचा स्वीकार करणार असून

१९६८ च्या शेवटापर्यंत जवळ जवळ सबंध रशियात त्याची अंमलबजावणी होईल असा अंदाज आहे. या सुधारणेमुळे अनेक नवे प्रश्न उपस्थित झाले असून व्यक्तिगत व्यवस्थापकाला निर्णय घेण्याची किती सत्ता द्यावी हा त्यातील सर्वात महत्वाचा प्रश्न आहे. योजनेची उद्दिष्टे नक्की ठरवून द्यावीत का ? उत्पादनाचा नुसताच आराखडा देऊन व्यवस्थापकाला त्याच्या मर्यादेत स्वातंत्र्य द्यावे का ? त्याच्या सत्तेत किती लवचिकपणा ठेवावा ? अशातऱ्हेच्या अनेक प्रश्नांवर आजचे रशियन नेतृत्व दुभंगलेले दिसत आहे.

योजना पुन्हा तपासण्याचे दुसरे एक कारण म्हणजे कोणत्या उद्योगधंद्यात किती भांडवल गुंतवावे याबद्दल कमिटीत झालेले दुमत होय. गेल्यावर्षीचा मसूदा म्हणजे दोन्ही बाजूतील समन्वय होता. धातूंचे उत्पादनावर भर देणारांनी पोलाद व अवजड यंत्रसामुग्री याकडे जास्त पैसा ओढण्याचा प्रयत्न केलाच. तरीसुद्धा भारी उद्योगधंदे व जीवनोपयोगी वस्तूंचे उत्पादन यातील खिंडार बरेचसे भरले गेले आहे. त्याचप्रमाणे बरेचस श्रेष्ठ नेते अनेक बाबतीत अमेरिकेशी मिळते घेण्याच्या मनःस्थितीत आहेत असाही रंग दिसत आहे.

नियोजनाची अनेक उद्दिष्टे राजकीय आहेत जीवनोपयोगी वस्तु नागरिकांचे हातात जास्त जास्त प्रमाणात देण्याची वेळ आली आहे की रशियाने परिस्थिती सुधारण्याची आणखी वाट पहावी हा महत्त्वाचा प्रश्न आज रशियन नेतृत्वासमोर उभा आहे. इतक्या महत्वाच्या मुद्यावर सामुदायिक निर्णय घेणे किती कठीण आहे याची जाणीव सर्वांनाच आहे व म्हणूनच सध्याचा योजना अजून आराखड्याच्या स्थितीतच आहे. योजनेने आतापर्यंत आक्रमलेला मधला मार्ग सोडून दिला तर सोव्हियट वरिष्ठ नेतृत्वात महत्वाचे बदल झाल्याखेरीज रहाणार नाहीत.

—दि इकॉनॉमिस्ट, लंडन, ८ एप्रिल १९६७

आंतरराष्ट्रीय कुटुंबपरिषद, नवी दिल्ली

नुकत्याच नव्या दिल्लीस भरलेल्या आंतरराष्ट्रीय कुटुंबपरिषदेत आशियातील बदलती कुटुंबव्यवस्था हा विषय प्रामुख्याने चर्चिला गेला. भारतातील अनेक संस्थातर्फे ही परिषद बोलावण्यात आली होती. पंतप्रधान श्री. इंदिरा गांधी यांनी परिषदेचे उद्घाटन केले.

सतत व झपाट्याने बदलणाऱ्या परिस्थितीचा आशिआयी कुटुंबसंस्थेवर दूरगामी परिणाम होत असून तेथील माणसाचे जीवन बदलून जात आहे हे सत्य सर्वांनी मान्य केले. या परिषदेत—

१) बदलत्या समाजातील लग्नसंस्था व कुटुंबसंस्था;

२) कुटुंब व लोकसंख्येचा प्रश्न;

३) आशिआयी पत्नी व माता यांची नवी जबाबदारी;

४) जबाबदार जीवन जगण्यासाठी नव्या पिढीची करावयाची तयारी.

— या चार विषयावर चर्चा करण्यात आली.

" आशिया व लॅटिन-अमेरिका या खंडातील वाढती लोकसंख्या जागतिक स्थैर्याला व सुखी कुटुंबव्यवस्थेला धोका निर्माण करीत आहेत. " असे डॉ. सुशिला नायर यांनी सांगितले. " भारतीय विकासाचा कुटुंबनियोजन हा पाया असून सुखी संसाराचा व स्थिर कुटुंबव्यवस्थेचा तो केंद्रबिंदू आहे. भारतात आतापर्यंत १२००००० स्त्रियांनी लूप बसवून घेतले असून १६००००० लोकांनी शस्त्रक्रिया करून घेतली आहे. साधारणपणे इतर २०००००० नागरिक कुटुंबनियोजनाची दुसरी साधने वापरीत आहेत " असेही त्यांनी जाहीर केले.

" घराबाहेर पडून नोकऱ्या करणाऱ्या बायकांची संख्या वाढीस लागली म्हणजे कुटुंबनियोजनाचा प्रसार जास्त झपाट्याने होईल व असा प्रसार झाल्यावर स्त्रियांसाठी बाहेरची कामे जास्त प्रमाणात निर्माण करावी लागतील असे डॉ. सी. चंद्रशेखरन् यानी सांगितले. " आशियातील आठ देशांनी कुटुंबनियोजनाचा कार्यक्रम राष्ट्रीय पातळीवर स्वीकारला असून लोकसंख्येचे नियंत्रण झपाट्याने न झाल्यास मागस राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थेवर त्याचे भयंकर दुष्परिणाम होतील " असेही डॉ. चंद्रशेखरन् म्हणाले.

सिलोनमधील चहाच्या मळ्यातील कामगारवस्तीतील जननसंख्या सर्वात कमी असून तेथील अशिक्षित स्त्रियासुद्धा कुटुंबनियोजनाची साधने व्यवस्थित वापरीत आहेत अशी माहिती सिलोनी प्रतिनिधींनी दिली.

— इंटरनॅशनल फ्लॅन्ड पेरेंटहूड न्यूज, मार्च १९६७

प्राज्ञपाठशाळामंडळ ग्रंथमाला

(१) धर्मकोश- व्यवहारकाण्ड भाग १ ते ३		किंमत
	साधी बांधणी	८०·००
	कापडी बांधणी	१०४·००
(२) धर्मकोश - उपनिषत्काण्ड भाग १ ते ४		
	साधी बांधणी	१५०·००
	कापडी बांधणी	१८२·००
(३) धर्मकोश- संस्कारकाण्ड भाग १ ला		४५·००
	कापडी बांधणी	५३·००
(४) मीमांसादर्शन		३०·००
(५) मीमांसाकोश ... भाग १ ते ७ (संपूर्ण)		२५०·००
(६) कौषीतकिब्राह्मणारण्यकविषयकोश		६·००
(७) बौद्धागमार्थसंग्रहः		२०·००
(८) नवमानवतावाद		२·५०
(९) मानवाचा आदर्श		३·००
(१०) चार्वाक – इतिहास आणि तत्त्वज्ञान		
	(प्रा. सदाशिव आठवले) ...	३·००
(११) गीता-प्रवेश (डॉ. गो. वि. देवस्थळी) ...		२·५०
(१२) महाराष्ट्रांतील दुष्काळ व त्यावरील उपाययोजना		
	(श्री. चा. अ. दाभोलकर)	२·००
(१३) सिंधु संस्कृती, ऋग्वेद व हिंदु संस्कृती		
	(प्र. रा. देशमुख)	४·००
(१४) इतिहासाचे तत्त्वज्ञान (प्रा. सदाशिव आठवले)		६·००

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका